# पाकिस्तान

: लेखक :
गणेश वामन जोशी
बी.ए. एल्एल्. बी.

किंमत एक रुपया

: प्रकाशक :
**गणेश वामन जोशी**, बी.ए. एल्एल्. बी.
पंढरपूर

[ सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन ]

: मुद्रक :
**शं. मो. पाटील**
विश्वास छापखाना
२९१, शनिवार, पुणें

प्रिय मातेच्या चरणीं
सादर समर्पण

# प्रकाशकांची विनंति

प्रकाश ग्रंथमालेच्या वतीनें, कागदाची अत्यंत महर्गता असतांहि हें पंहिले पुस्तक प्रसिद्ध करण्यास आम्हांस आनंद होत आहे. या मालेच्या वतीनें दरवर्षी, बहुधा टिळक पुण्यतिथीच्या दिवशीं, एकतरी ग्रंथ प्रकाशित करण्याचा विचार आहे. वारकरी पंथाचें मुख्य स्थान असल्यामुळें, पंढरपूर हें महाराष्ट्राचें आध्यात्मिक आणि बौध्दिक विद्यापीठ आहे. येथें येणाऱ्या सज्जनांच्या लिखाणाचा लाभ मालेस होईल अशी अपेक्षा आहे. मालेचे कायम ग्राहक होण्यास फक्त एक रुपया वर्गणी ठेवली आहे. कायम ग्राहकांस मालेच्या वतीनें प्रसिद्ध होणारीं सर्व पुस्तकें पाऊणपट किंमतीस मिळतील तरी सर्वांनीं कायम ग्राहक होऊन प्रकाशनास मदत करावी अशी आग्रहाची विनंती आहे.

ता. १।८।४२

आपला नम्र,
**पां. तु. उत्पात**
कार्यवाह, प्रकाश ग्रंथमाला.

# प्रस्तावना.

हिंदुस्तानचें प्रचलित राजकारण समजूं इच्छिणाऱ्या कोणाही मनुष्यास मुस्लीम लीगच्या पाकिस्तानच्या मागणीचें स्वरूप समजून घेतल्यावांचून चालणार नाहीं. पाकिस्तानची संपूर्ण व स्पष्ट व्याख्या मुस्लीम लीगनें केव्हांही जाहीर केली नसल्यामुळें त्याचे खरें स्वरूप व दूरवरचे परिणाम कोणीही वर्णन करूं शकणार नाहीं. तथापि संपूर्ण स्वातंत्र्य ज्याप्रमाणें कॉंग्रेसचे ध्येय आहे त्याचप्रमाणें पाकिस्तान हें मुस्लीम लीगचें आतां ध्येय झालें आहे. अशा स्थितींत हिंदुस्तानच्या भवितव्याचा विचार करतांना नुसतें "पाकिस्तान" "पाकिस्तान" "आहे कांहीतरी मुसलमानांचें खूळ" असें म्हणून भागणार नाहीं. चौधरी रहमतुल्ला यांनीं एक पत्रक सर्वांस मतप्रचारासाठीं पाठविलें त्यांत पुढें उस्मानिस्तान वगैरेंची व मि. खली-कुज्जमान यांनीं पॅन इस्लामची घोषणा केलीच आहे. या छोट्याशा पुस्तकांत अवघ्या १०४ पानांत पाकिस्तानबद्दल जेवढें जाणणें अवश्य आहे तें सर्व अत्यंत सुबोध स्पष्ट व असंदिग्ध भाषेंत लिहून वाचकापुढें मांडलें आहे. तें सर्व राजकारणांत भाग घेणाऱ्या कार्यकर्त्यांनीं जरूर वाचून या विषयाचें वास्तविक स्वरूप समजून घ्यावें.

अलका
खार २७-७-४२

**बाळ गंगाधर खेर**

# दोन शब्द

येरवडा मंदिरांत सत्याग्रह संग्रामातील एक वर्ष सक्तमजुरीची शिक्षा भोगीत असतां वाचनास व लेखनास बराच वेळ सांपडला. १५ एप्रिल १९४१ रोजीं डॉ. अंबेडकर यांचे 'थॉट्स् ऑन पाकिस्तान' हें पुस्तक वाचावयास घेतलें. हें पुस्तक वाचीत असतां 'पाकिस्तान आणि जातीय शांतता' या सहाव्या प्रकरणांत डॉ. अंबेडकर यांनीं पाकिस्तानांतील मुसल्मानांची संख्या ४ कोटि ७८ लक्ष १७ हजार ३०१ अशी दिलेली आढळली. ब्रिटिश हिंदुस्तानांत ठोकळ मानानें ६॥ कोटि मुसल्मान आहेत. त्यांपैकीं ४॥ कोटींपेक्षां अधिक मुसल्मान मुस्लीम प्रांतांत जातील व उरणाऱ्या ब्रिटिश हिंदुस्तानांत २ कोटीहि मुसलमान रहाणार नाहींत त्यामुळें जातीय सलोखा अतिशय सुलभ होईल वगैरे विधानें डॉक्टर महाशयांनीं केलीं आहेत. पाकिस्तानांतील मुसलमानांची खरोखरीच ४॥ कोटि लोकसंख्या होते काय, या प्रश्नाचा विचार करतांना डॉ. अंबेडकरांनीं जी संख्या धरली आहे तींत कमींत कमी एक कोटीची तरी चुक आहे असें आढळून आलें. त्यामुळें या प्रश्नाकडे अधिक लक्ष वेधलें. पाकिस्तानसंबंधींचीं शक्य तीं सारीं पुस्तकें वाचावींव आपल्या मनाशीं तरी पाकिस्तानबद्दलचा निर्णय यावा असें ठरविलें वांचन पूर्ण झाल्यानंतर लिहिण्यानेंच विचार व्यवस्थित व पक्के होतील असें वाटून लिहिण्यास प्रारंभ केला. खास पाकिस्तानसंबंधानें जे ग्रंथ वांचले त्याची यादी शेवटीं दिली आहे. जुलै १९४१ च्या अखेरीस पाकिस्तानांवरील विचार लिहून संपले. ३१ आक्टोबरला माझी सुटका झाली. परंतु माझ्याबरोबर पुस्तकाची सुटका झाली नाहीं. त्याची तपासणी होऊन आणि त्यांतील कांहीं मजकूर खोडला जाऊन जानेवारींत तें पुस्तक मला मिळालें. त्या नंतर हा पुस्तक प्रकाशनाचा योग येत आहे.

येरवडा मंदिरांत पुस्तक लिहिलें जात असतां हॉस्पिटल बरॅक, टिळक बरॅक आणि गांधी बरॅकींतील माझ्या सर्व स्नेह्यांची मला मदत झाली. मित्रवर्य वासुदेव आत्माराम ऊर्फ भाऊसाहेब करंदीकर वकील ( डहाणू )

यानीं तर पुस्तकाच्या सुरवातीपासून अखेरीपर्यंत अतीशय मदत केली. संस्थान प्रजापरिषदेचे सर चिटणीस श्री. बळवंतराय मेहता आणि मित्रवर्य तात्यासाहेब शिखरे यांच्या मदतीनेच मी संस्थानासंबंधीचा भाग लिहूं शकलों. कुराण, मुस्लीम धर्म आणि मुस्लीम संस्कृतीसंबंधीची सर्व माहिती श्री. फकी आणि 'अजमलचे' संपादक श्री. हॅरिस यांनीं दिली. मित्रवर्य अच्युतराव पटवर्धन यांनीं आपलें तयार होत असलेले पाकिस्तानचें पुस्तक मला वाचावयाला दिले व माझ्या पुस्तकासंबंधीं उपयुक्त सूचना केल्या. मित्रवर्य आप्पासाहेब तारकुंडे ( पुणें ), आचार्य भिसे ( बोर्डि ), बाबा-साहेब घोरपडे, संपादक सकाळ ( पुणें ), शांतिलाल शहा ( मुंबई ), नरू-भाऊ लिमये ( सातारा ), त्रिं. शि. भारदे वकील ( शेवगांव ), लक्ष्मीदास श्रीकांत ( मुंबई ), दादासाहेब लिमये ( पेण ), नानासाहेब टिळक ( नागोठणा ), भाऊसाहेब रानडे ( पुणें ), आचार्य ढवण ( सासवनें ), भाऊसाहेब परांजपे ( अंबरनाथ ) बापूसाहेब लिमये ( पाली ), हरीभाऊ फाटक ( पुणें ), पांडुरंगराव उत्पात ( पंढरपूर ), वगैरे कारागृहांतील स्नेह्यांनीं वेळोवेळीं पुस्तक वाचून, संदर्भ तपासून, आंकड्यांचे परीक्षण करून निरनिराळ्या सूचना केल्या. या सर्व मदतीबद्दल या स्नेही मंड-ळींचें आभार मानणें हें माझें कर्तव्य आहे.

मी तुरुंगांत असतांना बाहेरची लागतील तीं पुस्तकें व माहिती वेळो-वेळीं व वेळेवर दिल्याबद्दल मित्रवर्य पांडुरंग डिंगरे, पांडुरंगराव आराध्ये, गणपतराव कोळी व जगन्नाथ आठवले यांचें मी आभार मानतो.

या पुस्तकाच्या वाचनानें पाकिस्तानसंबंधीच्या वाचकांच्या कल्पना स्पष्ट, खुलासेवार आणि माहितीपूर्ण होतील अशी मला आशा आहे. पाकिस्तानसंबंधीचा निर्णय ज्याचा त्यानें ध्यावा. तो निर्णय घेण्याला दिशा दाखविण्याच्या दृष्टीनें, माहितीच्या दृष्टीनें या पुस्तकाचा उपयोग झाला तरी मला त्यांत समाधान आहे. पाकिस्तानचा विषय हिंदी राज-कारणांत अजून कांहीं दिवस गाजणार असें दिसत आहे. तेव्हां हिंदी राजकारणाच्या अभ्यासुला त्यावरील हें पुस्तक वाचनीय होईल अशी उमेद आहे.

मुंबईचे माजी मुख्य प्रधान श्री. बाळासाहेब खेर यांनीं आपल्या मागें अनेक कामाची निकड असतां माझ्या विनंतीला मान देऊन छोटीशी सुंदर प्रस्तावना लिहून दिली याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

१ ऑगस्ट १९४२ टिळक पुण्यातिथि ] लेखक

# प्रास्ताविक : : : : : १

पाकिस्तानची कल्पना सन १९४० सालीं लाहोर येथें झालेल्या मुस्लिम लीगच्या ठरावानें हिंदुस्थानसमोर प्रामुख्यानें आणि अधिकृत रीतीनें मांडली. त्यानंतर मद्रास येथें जनाब जीना यांच्या अध्यक्षतेखालीं मुस्लिम लीगचें १९४१ चें अधिवेशन झाले. सदर अधिवेशनांत पाकिस्तानच्या ठरावास संमति देण्यांत आली, एवढेंच नव्हे तर पाकिस्तानच्या योजनेचा अंतर्भाव लीगच्या ध्येयवाक्यांत करण्यांत आला. पाकिस्तान मुस्लीम लीगची मागणी आहे एवढें म्हणून आतां काम भागणार नाहीं तर पाकिस्तान हें मुस्लीम लीगचे ध्येय आहे. या दृष्टीनें पाकिस्तानच्या प्रश्नास सध्यां हिंदी राजकारणांत एकप्रकारचें विशिष्ट महत्व प्राप्त झालें आहे. पाकिस्तानसंबंधीं अनुकूल आणि प्रतिकूल विचारांनीं हिंदी राजकारण गजबजून गेलें आहे. "हिंदूंना आणि मुसल्मानांना आपापली प्रगति आपापल्या रीतीनें करून घ्यावयाची असेल तर हिंदुस्थानचें पाकिस्तान आणि हिंदुस्तान असे दोन भाग करण्याखेरीज दुसरा मार्गच नाहीं. हिंदु-मुस्लिम प्रश्न अतिशय सोईवार रीतीनें सोडविणें म्हणजेच पाकिस्तानच्या योजनेला संमति देणें होय. हिंदूंनीं आणि हिंदूंची प्रतिनिधि-

भूत संस्था म्हणून राष्ट्रीय सभेनें जर पाकिस्तानला संमति दिली नाहीं तर हिंदु-मुस्लिम ऐक्य कधींहि होणें शक्य नाहीं. पाकिस्तानखेरीज मुस्लिम राष्ट्राच्या आकांक्षा संतृत होणार नाहींत. हिंदूंच्या अडवणुकीच्या धोरणामुळें हिंदुस्तानची आणि पाकिस्तानची दोघांचीहि राजकीय प्रगति दुरावणार आहे. हिंदु आणि मुस्लीम हीं दोन स्वतंत्र राष्ट्रें आहेत. मुस्लिम राष्ट्राला स्वतःच्या उद्धारासाठीं स्वदेश तोडून पाहिजे आहे. हिंदूंच्या जांच-जुलमांखालीं दासदेश म्हणून राहण्यास मुसलमान कधींहि तयार होणार नाहींत. मुसलमान हे हिंदूंचे जेते म्हणून येथें आले. शेंकडों वर्षें त्यांनीं येथें साम्राज्य गाजविलें. सबंध हिंदुस्तानऐवजी मुसल्मान फक्त पाकिस्तानची न्याय्य मागणी करीत आहेत त्यांत वाईट तें काय आहे? अखंड हिंदुस्तानचें मध्यवर्ती सरकार हें हिंदुमताधीन होणार. हिंदु बहुमताखालीं चिरडून जाण्यास मुस्लीम राष्ट्र तयार नाहीं. हिंदूंनीं आणि ब्रिटिशांनींहि हें ओळखले पाहिजे आणि मुस्लीम राष्ट्राची न्याय्य मागणी त्वरित कबूल केली पाहिजे. ब्रिटिशांना पाकिस्तान कबूल नसेल तर ज्यानां पाकिस्तान कबूल आहे असे लोक येथें येतील आणि ही गोष्ट घडवून आणतील" वरील प्रकारची विचारसरणी पाकिस्तानच्या बाजूनें आज जोरानें पुढें येत आहे. तर याच्या उलट "हजारों वर्षांपासून हिंदुस्थान-भारतवर्ष हें एक आणि अविभाज्य राज्य-राष्ट्र राहिलेलें आहे. भारतवर्षाची संस्कृति, भारतवर्षाची भौगोलिक परिस्थिति, प्राचीन परंपरा या सर्व गोष्टी भारताच्या एकत्वाचीच साक्ष देत आहेत. हिंदुस्तानची शकलें पाडणें ही कल्पनासुद्धां आम्हांला सहन होणार नाहीं. हिंदुस्तानांतील मुसल्मान हे धर्मानें भिन्न आहेत हें खरें; पण वंशानें, रक्तानें, संस्कारानें, आचारविचारानें, बोलीनें ते हिंदूच आहेत. हिंदुस्थानांत हिंदू बहसंख्य आहेत हा कांहीं हिंदूंचा दोष-हिंदूंचा अपराध नाहीं. हिंदुस्तानांत हिंदूंचें राज्य असणेंच उचित आणि क्रमप्राप्त आहे. जर्मनांचा ज्याप्रमाणें जर्मनी, अफगाणांचे ज्याप्रमाणें अफगाणिस्तान त्याचप्रमाणें हिंदूंचा हिंदुस्थान आहे. मुसल्मानांचा धर्म, संस्कृति यांना जरूर तें संरक्षण मिळेल पण अखंड भारतांत ते राहिले तरच" अशी हिंदुमहासभेची विचारसरणी पुढें येत आहे.

अशा रीतीनें पाकिस्तानच्या आरोळीनें हिंदी राजकारणांत प्रचंड कोलाहल माजवून दिला आहे. या वादळांत प्रकाश नाहीं; धूळ मात्र खच्चून भरलेली आहे; स्थैर्य नाहीं, तर्कशुद्धता नाहीं; आवेष मात्र भरपूर आहे. वेग सपाटून आहे. अशा परिस्थितींत थोडा वेळ बाजूला सरून पाकिस्तानच्या योजनेचें स्वरूप समजून घेणें आवश्यक झाले आहे. विरोधासाठीं किंवा समर्थनासाठीं कशासाठीं कां होईना पण पाकिस्तानची वृत्ति, स्वरूप, योजना समजावून घेणें व त्याबद्दलचें आपलें तर्कशुद्ध, स्थिर आणि निश्चित धोरण आंखणें हिंदी राजकारणाला आवश्यक होवून बसले आहे.

'फोडा आणि झोडा' या इतिहासप्रसिद्ध ब्रिटिश राजनीतीचा पाकिस्तान हा एक कुटिल डाव आहे. पाकिस्तानच्या मागणीचा गैरफायदा घेऊन हिंदुस्थानच्या आकांक्षा ब्रिटिशांना लथाडावयाच्या आहेत. ब्रिटिशांनीं मनांत आणलें तर पाकिस्तानची चळवळ तात्काळ नामशेष होईल असेंहि म्हणणारें आणि मानणारे लोक आहेत.

डॉ. आंबेडकरांनीं ज्याप्रमाणें धर्मांतराची आरोळी मध्यंतरी ठोकली होती त्याचप्रमाणें जनाब जीनांची ही आरोळी आहे. स्वतःचा मोठेपणा कायम टिकविण्यासाठीं जनाब जीनांनीं **शोधून काढलेली** ही खास जादुगारी आहे. माणूस मोठेपणाच्या आहारीं गेला म्हणजे तो काय बोलेल आणि काय करील याचा नियम नाहीं या सिद्धांताचें उद्भट उदाहरण म्हणजे जनाब जीना हे आहेत. जनाब जीनांचें मोठेपणाच्या आहारी जाऊन झालेलें अधःपतन म्हणजे पाकिस्तान असेंहि समजणारे समंजस लोक आहेत.

ब्रिटिश राजनीतीचा कुटिल डाव म्हणून किंवा जनाब जीनांचा अधःपात म्हणून हा प्रश्न डावलून भागत नाहीं. हिंदु-मुसलमानांतील बेबनावरूपी रोगाचें हें कदाचित निदान होऊं शकेल; परंतु निदान केल्यानें रोग बरा होत नाहीं. फार तर औषधायोजना सुलभ होते. ब्रिटिश सरकार आमच्यासाठीं हा प्रश्न सोडवील अशा भोळ्या समजुतीवर रहाणारांची कींवच केली पाहिजे. हिंदुस्थानांतील चिकट प्रश्न सोडविण्या-

साठीं ब्रिटिश सरकारचा अवतार हिंदुस्थानांत झालेला नाहीं. बिकट प्रश्न निर्माण करणें, ते प्रश्न सुटूं लागले तर सोडवणुकीच्या मार्गांत अडथळे उत्पन्न करणें हा ब्रिटिश राजनीतीचा मार्ग आहे. हिंदु-मुसल्मानांचा प्रश्न कोणी तिऱ्हाईत येऊन आपल्यासाठीं सोडवणार नाहीं. तो प्रश्न आपला आपणच सोडविला पाहिजे. त्यासाठीं परकीयांची मदत होणें शक्य नाहीं.

" हिंदुस्थान अखंड राहिला तर हिंदुस्थानचे मध्यवर्ती सरकार हिंदूंचें होईल यासाठीं हिंदुस्तानचे पाकिस्तान आणि हिंदुस्तान असे दोन भाग केले पाहिजेत '' ही मागणी पाकिस्तानांत प्रमुख आहे. अर्थातच हिंदुस्तानची कोणतीहि नवीन राज्यघटना पूर्ण होण्यापूर्वीं हिंदुस्थानचें मध्यवर्ती सरकार कसें होणार हा प्रश्न उत्पन्न होतो व या प्रश्नाशींच पाकिस्तानचा संबंध येत असल्यामुळें नवीन राज्यघटना म्हटल्याबरोबर पाकिस्तानचा विचार क्रमप्राप्त येतो. या सर्व गोष्टी ध्यानीं घेऊन पाकिस्तानचा म्हणजेच हिंदु-मुस्लीम प्रश्नाचा सखोल, शास्त्रशुद्ध संपूर्ण अभ्यास होऊन या प्रश्नासंबंधीं ठाम निर्णय किंवा ठाम निर्णयाची निश्चित रूपरेषा आंखणें निकडीचें झाले आहे. या कामीं उपयोगी व्हावें हा या पुस्तकाचा प्रधान हेतू आहे.

## पाकिस्तानची पूर्वपिठिका : : : : : २

मुस्लिम लीगच्या लाहोर येथील अधिवेशनांत ता. २६-१-४० रोजीं एक क्रान्तीकारक ठराव एकमतानें पास झाला. या ठरावानें हिंदी राजकीय क्षेत्रांत एक मोठें वादळ निर्माण केलें. हा ठराव पास होण्यापूर्वी या ठरावावर चर्चा झाली नाहीं. एकदम तो ठराव आला आणि सर्वानुमतें पास झाला. या ठरावाला 'पाकिस्तानचा' ठराव या नांवानें आतां सर्वांकडून संबोधण्यांत येत आहे. हैद्राबादच्या राजेसाहेबांचें संपूर्ण नांव ज्याप्रमाणें प्रायः कोणासच माहीत नसतें, सारें काम निझाम साहेब या नांवानेंच भागतें तसेंच पाकिस्तानचेंहि झालें आहे. पाकिस्तान संबंधीं मुस्लिम लीगनें केलेला संबंध ठराव फारच थोडयांना माहीत असेल. असा हा फार गाजलेला पण फार थोडयांना माहीत असणारा ठराव खालीलप्रमाणें आहे.

(१) राजकीय घटनेसंबंधीं मुस्लिम लीगच्या वर्किंग कमिटीनें आपल्या ता. २७-८-१९३९ व ता. १७-९-१९३९ व ता. २२-९-१९३९ व ता. ३-२-१९४० च्या बैठकींत जे देशाच्या राजकीय घटनेसंबंधीं ठराव

केले आहेत ते या सभेस मान्य आणि कबूल आहेत. सन १९३५ च्या गव्हर्मेंट ऑफ इंडियाच्या कायद्याखालीं जी संयुक्त राज्यघटनेची (फेडरेशनची) योजना आखण्यांत आली आहे ती योजना देशाच्या सध्याच्या विशिष्ट परिस्थितींत अव्यवहार्य आणि बिलकुल अनुपयुक्त आहे आणि मुस्लीम हिंदुस्थानला ती सर्वस्वी नापसंत आहे.

(२) हिंदुस्थानांतील सर्व पक्ष, हितसंबंध आणि जाति यांच्या सल्ल्यानेंच, सन १९३५ च्या गव्हर्मेंट ऑफ इंडियाचा कायदा ज्या योजनेवर आणि धोरणावर आंखला आहे त्याचा पुनर्विचार होईल अशासंबंधीं साम्राज्य सरकारच्या वतीनें व्हॉइसरॉय साहेबांनीं जी ता. १८।१०।१९३९ रोजीं जाहीर घोषणा केली ती समाधानकारक आहे. परंतु सन १९३५ च्या कायद्याचा आमूलाग्र फेरविचार झाल्याखेरीज मुस्लिम हिंदुस्थानला बिलकुल समाधान होणार नाहीं. मुस्लिम लीगच्या संमतीशिवाय आणि मुस्लिम लीगच्या सल्ल्याशिवाय तयार झालेली कोणतीहि योजना मुस्लिम हिंदुस्थान कबूल करणार नाहीं.

(३) खालील मूलभूत तत्वावर आंखलेली असल्याशिवाय कोणतीहि राजघटना या देशांत कामचलाऊ होऊं शकणार नाहीं व मुसलमानांना ती पसंत पडणार नाहीं असें या ऑल इंडिया मुस्लिम लीगच्या अधिवेशनाचें विचारपूर्वक मत झालें आहे. ज्या मूलभूत तत्वांवर योजना आंखली जावीं तीं तत्वें खालीलप्रमाणेंः—

(१) ज्या ठिकाणीं मुसलमान बहुसंख्य आहेत उदाहरणार्थ हिंदुस्थानचा वायव्य सरहद्द भाग व हिंदुस्थानचा पूर्वेकडील भाग त्या ठिकाणच्या प्रदेशांना "स्वतंत्र राष्ट्रांचा" दर्जा देण्यांत यावा व त्यांतील प्रत्येक राष्ट्र सार्वभौम आणि पूर्णपणें स्वयंशासित असावे. यासाठीं सध्यांच्या प्रादेशिक विभागणींत जरूर ते फेरफार करण्यांत येऊन भौगोलिक सलग विभागांची फेर आंखणी जरूर तेथें करण्यांत यावी. या प्रदेशांतील (या मुस्लिम राज्यांतील) अल्पसंख्यांकांना त्यांच्याशीं विचारविनिमय करून धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय राज्यकारभार विषयक

आणि इतर हक्कासंबंधीं आणि हितासंबंधी पुरेशी, परिणामकारक आणि बंधनकारक संरक्षणें राज्यघटनेंत स्पष्टपणें नमूद करण्यांत यावींत. त्याचप्रमाणें ज्या ठिकाणीं मुसल्मान अल्पसंख्य आहेत त्याठिकाणीं मुसल्मान आणि इतर अल्पसंख्यांक यांचेसाठीं त्यांच्याशीं विचारविनिमय करून धांर्मिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय, राज्यकारभारीविषयक आणि इतर हक्कासंबंधीं आणि हितासंबंधीं पुरेशी परिणामकारक आणि बंधनकारक संरक्षणें राज्यघटनेंत स्पष्टपणें नमूद करण्यांत यावींत.

संरक्षण, परराष्ट्रीय राजकारण, दळणवळणाचीं साधनें, जकात आणि इतर सर्व बाबतींतील अधिकार अखेरीस या नवीन स्वतंत्र राष्ट्रांना उपभोगतां यावेत या दृष्टीनें वरील मूलभूत सिद्धांतावर आधारलेली अशी नवीन राजकीय घटना आंखण्यासाठीं हें अधिवेशन लीगच्या कार्यकारी मंडळास सर्व अधिकार देत आहे.

वरीलप्रमाणें पाकिस्तानचा मूळ आणि संपूर्ण ठराव आहे. या ठरावाचे तीन भाग आहेत. पहिल्या भागांत १९३५ च्या कायद्यांतील संयुक्त राज्यघटनेचा (फेडरेशनचा) धिःकार करण्यांत आलेला आहे. दुसऱ्या भागांत मुसलमानांची संमति घेतल्याशिवाय कोणतीहि योजना आखण्यांत आली तर ती मुसल्मानांना मान्य होणार नाहीं असें स्वच्छपणें बजावण्यांत आले आहे. आणि तिसऱ्या भागांत पाकिस्तानचीं तत्त्वें ग्रथित करण्यांत आलेलीं आहेत. हिंदुस्थानच्या ज्या विभागांत मुसल्मान बहुसंख्य आहेत ते भाग वेगळे करण्यांत येऊन त्यांना स्वतंत्र राष्ट्राचा दर्जा देण्यांत यावा ही तिसऱ्या भागांतील मुख्य मागणी आहे. वायव्य सरहद्द प्रांत, बलुचिस्तान, सिंध, पंजाब, बंगाल या प्रांतांत स्वतंत्र मुस्लिम राष्ट्रें निर्माण करण्यांत यावी अशी ही मागणी आहे. सार्वभौम, अखंड हिंदुस्थानचे प्रांत म्हणून राहण्यास हे मुस्लिम विभाग तयार नाहींत. त्यांना हिंदुस्तानांतून फुटून निघून स्वतंत्र राष्ट्र प्रस्थापित करावयाचे आहे. अशा रीतीनें हा पाकिस्तानचा ठराव लाहोर येथील अधिवेशनांत पास झाला. त्यानंतर पाकिस्तानच्या मागणीला मद्रास

येथील मुस्लीम लीगच्या अधिवेशनांत ध्येयवाक्यांत समाविष्ट करण्यांत आलें. राष्ट्रीय सभेचें ध्येय ज्याप्रमाणें संपूर्ण स्वातंत्र्य हें आहे व त्यामुळें ज्यांना संपूर्ण स्वातंत्र्य मान्य आहे त्यांनाच राष्ट्रीय सभेचे सभासद होता येतें त्याचप्रमाणें यापुढें मुस्लीम लीगचें ध्येय 'पाकिस्तान' हें ठरविण्यांत आल्यामुळें पाकिस्तान मान्यतेशिवाय कोणाहि मुसलमानास मुस्लीम लीगचा साधा सभासदहि होता येणार नाहीं. एवंच मद्रासच्या ठरावानें पाकिस्तानच्या मागणीचा उच्चांक गांठला आहे.

ऑल इंडिया मुस्लिम लीगनें पहिल्या प्रथम सन १९४० सालीं लाहोर येथें पाकिस्तानचा ठराव केला ही गोष्ट खरी आहे; पण पाकिस्तानच्या मनोवृत्तीचा उगम पुष्कळ वर्षांपूर्वींचा आहे यांत संशय नाहीं. पाकिस्तान चा शब्दशः अर्थ 'पाक लोकांचें स्थान' असा आहे. पाक याचा अर्थ खऱ्या धर्माचे अनुयायी असा आहे. 'खरा धर्म' या शब्दसमुच्चयानें मुस्लिम धर्म-इस्लामी धर्मच या ठिकाणीं अभिप्रेत आहे. शब्दार्थानें पाकिस्तान याचा अर्थ मुस्लिमस्थान असाच होईल. पाकिस्तानची कल्पना 'सारे जहांसे अच्छा हिंदोस्तां हमारा' या प्रसिद्ध पदाचे कवि सर महंमद इकबल यांनीं मुस्लिम लीगच्या लखनौ येथील अधिवेशनापुढें सन १९३० सालीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत मांडली पण ती कल्पना त्यावेळीं स्वीकारली गेली नाहीं. त्यापूर्वींहि* बरीच वर्षें पाकिस्तानच्या योजनेची सुखस्वप्नें कांहीं मुसलमानांनां पडत होती यांत शंका नाहीं. १९२३ सालीं सर डेनिस ब्रे यांच्या अध्यक्षतेखालीं नॉर्थ वेस्ट फ्रान्टीयर कमिटी नेमण्यांत आली होती. त्या कमिटीचे कै. समर्थ हे एक सभासद

---

* Iqbal went on to say that he thought the Pakistan plan would be disastrous to the British Government, disastrous to the Hindu Community, disastrous to the Moslem community. ' But I am the president of the Muslim league and therefore it is my duty to support it."

Enlist India for freedom by

Edward Thompson, page 58

होते. सदर कमिटीपुढें डेरा इस्माईलखान येथील इस्लामिक अंजुमानचे अध्यक्ष खानसाहेब सरदार महमद गुलखान यांची महत्वाची साक्ष झाली. समर्थ यांनीं विचारलेल्या प्रश्नात रोख ठोक उत्तर देतांना हे गृहस्थ म्हणाले " हिंदुस्थानांतील हिंदूंचे आणि मुसलमानांचें विभक्तीकरण झालेलें मला फार आवडेल. २३ कोटी हिंदू दक्षिणेला व ८ कोटी मुसलमान उत्तरेला. आग्र्यापासुन पेशावरपर्यंतचा प्रांत मुसलमानांना देऊन टाकावा. बाकीचा हिंदुंचा."* सन १९२४-२५ सालांतील मौलाना महंमदअल्ली यांच्या कांहीं भाषणांतून या कल्पनेचा पुरस्कार झालेला आढळतो. परंतु सन १९२३ ते १९३७ पर्यंत या योजनेला विस्तृत स्वरूप असें कोणीही दिलें नव्हते. सन १९३० सालीं सर महमद इकबल यांनीं अध्यक्षीय भाषणांत ही योजना पुढें मांडल्याबरोबर त्या योजनेचा परिणाम जनाब रहिमतअल्ली यांचेवर झाला व त्यांनीं ही कल्पना आत्मसात करून या कल्पनेला 'पाकिस्तान' असें नामाभिधान दिलें. पंजाब, अफगाणिस्तान (वायव्य सरहद्द प्रांत), काश्मीर, सिंध आणि बलुचिस्तान हे मुसल्मानी प्रांत एकत्र करून पाकिस्तान स्थापण्याची त्यांची मनीषा होती. या पांच प्रांतांचीं इंग्रजी आद्याक्षरें निर्दिष्ट करण्यासाठीं पंजाबमधील प, अफगाणिस्थान (वायव्य सरहद्द प्रांत) मधील ए, काश्मीरमधील के व सिंधमधील एस् घेवून पाकिस्तान ही शब्द योजना तयार करण्यांत आली अशी व्युत्पत्ति जनाब रहीमतअल्ली यांनीं दिल्याचें 'इनसाइड इंडिया' (Inside

---

* I, as a member of the Anjuman, am expressing this opinion, We would very much rather see the separation of the Hindus and Muhamedans, 23 Crores of Hindus to the South and 8 Crores of Muslims to the North. Give the whole portion from Kanyakumari to Agra to Hindus and from Agra to Peshawar to Muhamedans. I mean trans-migration from one place to another. This is an idea of exchange. It is not an idea of annihilation.

Report of the N.W.F. inquiry committee 1923 Page 122-123

India ) या पुस्तकांत राउंड टेबल कान्फरन्सच्या वेळीं नमूद केले आहे.* ही कल्पना खाजगी रीतीनें सभासदांपुढें मांडण्यांत आली होती आणि ब्रिटिश सरकारचा या योजनेस पाठिंबा मिळविण्याचाही प्रयत्न झाला; परंतु "मुस्लीम साम्राज्याच्या पुनर्जीवनाचा हा प्रयत्न आहे" असा शेरा बसून त्या योजनेचा विचार करण्याचें नाकारण्यांत आलें. त्यानंतर मध्यंतरीच्या काळांत या योजनेचा उघड पुरस्कार करण्यांत आला नाहीं. अल्पसंख्यांक या नात्यानें मुसलमानांसाठीं जेवढीं संरक्षणें व हक्क मिळण्यासारखें होते ते मिळविण्याचे प्रयत्न या काळांत चालू होते व जातीय निवाड्यानें तर मागणीपेक्षां अधिक हक्क आणि संरक्षणें मुसलमानांना ब्रिटिश सरकारनें दिल्यामुळें या काळांत पाकिस्तानच्या कल्पनेस उघड चालना देण्याची जरूरी पडली नसावी परंतु अल्पसंख्यांक या नात्यानें जितकें जास्तींत जास्त हक्क मिळवितां येण्यासारखे होते; तेवढें मिळविल्यानंतर ते अपुरे मानून पाकिस्तानची ही वाढवलेली आवृत्ति सध्यां प्रसिद्ध करण्यांत आली आहे. मूळ योजनेंत पंजाब, सिंध, काश्मीर बलुचिस्तान, वायव्य सरहद्द प्रांत एवढेंच प्रांत समाविष्ट होते परंतु आतां त्यांत मुस्लिम लीगच्या ठरावानें 'पूर्व विभाग' म्हणून बंगालचाहि समावेश करण्यांत आला आहे. पाकिस्तानच्या योजनेंत मूलभूत धरलेल्या तत्वानुसार आंखण्यांत आलेली राज्यघटना निर्माण करण्यासाठीं लाहोरच्या ठरावानें मुस्लिम लीगच्या कार्यकारी मंडळास अधिकार दिले होते; परंतु अद्यापपर्यंत तरी मुस्लिम लीगच्या कार्यकारी मंडळानें पाकिस्तानची आपली अधिकृत योजना पुढें मांडलेली नाहीं. उलट डॉ. राजेंद्रप्रसाद यांनीं पाकिस्तानची योजना तपशीलवार पुढें मांडण्याबद्दल जाहीर रीतीनें सांगितले असतांहि मुस्लिम लीगचे अध्यक्ष जनाब जीना यांनीं पाकिस्ता-

* First, The Muslims had their homelands in Pakistan: that is Punjab, North-west frontier Province [ also called Afgan Province], Kashmir, Sind and Baluchistan. The name Pakistan, is derived from the names of these five provinces.
Halida Edib Inside India Page 352

नमधील अनुस्यूत तत्वांना संमति द्या म्हणजे तपशील पुढें मांडतो असें उत्तर देऊन या प्रश्नाची टाळाटाळ केली आहे.

पाकिस्तानच्या योजनेची वरीलप्रमाणें पूर्वपीठिका आहे. इजिप्त, तुर्कस्तान, अरबस्थान, इराक, इराण, अफगाणिस्थान आणि हिंदुस्थानांतील पाकिस्तान असा कान्स्टन्टिनोपलपासून लाहोरपर्यंतचा सर्व प्रदेश इस्लामी छत्राखालीं यावा या पॅन–इस्लामिझमच्या कल्पनेंत पाकिस्तानचा उगम असावा. इस्लामी धर्माला अनुकूल असें हें सुखस्वप्न आहे यांत शंका नाहीं. मुस्लिम लीगवाल्यांच्या मनांत पाकिस्तानची कल्पना प्रामुख्यानें पुढें येण्यास हें पॅन इस्लामिझमचें सुखस्वप्न कारणीभूत झाले असेल असें मानले तरी आज मुस्लिम लीगची पाकिस्तानची मागणी इस्लाम धर्माच्या प्रेमामुळें पुढें करण्यांत आली नसून तो एक राजकीय डाव आहे व त्या दृष्टीनेंच त्याचा उपयोग करून घेण्यांत येत आहे. आंधळ्यानें एक डोळा मागावा व देवानें दोन डोळे द्यावेत यासारखे मुसलमानांनीं मागितले त्या हक्कांपेक्षां जादा हक्क त्यांना द्यावयाचे अशी ब्रिटिश राजनीति आहे आणि पाकिस्तानची अंतिम मागणी केली तर मिळाले त्यापेक्षां अधिक हक्क व सवलती मिळूं शकतील या धोरणानें ही मागणी होत आहे.

## मुसलमानांच्या वाढत्या मागण्या : : : : ३

इंग्रजी सत्तेमुळें उत्पन्न झालेल्या असंतोषाची पहिली ज्वाळा सन १८५७ सालीं भडकली आणि या असंतोषाचीं कारणें व उगम पारखून हिंदुस्थानांत असले साम्राज्य चिरस्थायी करण्यासाठीं ब्रिटिश साम्राज्य-वादी मुत्सद्यांनीं हिंदुस्थानची विशिष्ट परिस्थिति लक्षांत घेऊन आपले धोरण ठरविलें. तें धोरण खालील तत्वांवर करण्यांत आले आहेः —

*१ फोडा आणि झोडा हें तत्व पूर्णपणें लागूं करावयाचे, हिंदुस्थानांत जे नानाविध भेद आहेत किंवा उत्पन्न करण्यासारखे आहेत ते सर्व भेद उत्पन्न करून त्या भेदांचा भरपूर उपयोग करून घ्यावयाचा आणि साम्राज्याच्या स्थैर्यासाठीं हिंदु विरुद्ध मुसलमान यांना झगडत ठेवावयाचे हें ब्रिटिश राजनीतीचें अद्ययावत् चालत आलेलें पहिलें तत्व आहे.

---

* There is no question that in former times we frankly practiced "divide and rule" method in India. From Warren Hastings' times onwards, men made no bones of the pleasure Hindu and Moslem conflict gave them. Even such men as

( २ ) राजकीय असंतोषाचा पारा चढूं लागला आणि कांहींतरी करणें प्राप्त आहे असें दिसूं लागलें, कीं चौकशीसाठीं एखादें कमिशन नेमून मोकळे व्हावयाचें. या कमिशनचें काम 'आशां कालवतीं कुर्यात्। कालं विघ्नेन योजयेत्' हेंच नेहमीं असतें. या कमिशन कमिटीच्या नेमणुकीपासुन नवीन शोध लागावयाचा अशी बिलकूल स्थिति नसते. कमिशन–कमिटीचें काम चालू आहे या सबबीवर कालहरण करावयाचें व कांहींतरी करण्याची आमची इच्छा आहे असें भासवावयाचे हा यांतील हेतू असतो. न कर्त्याचा वार शनिवार असतो म्हणतात. ब्रिटिश राजनीतींतील न कर्त्यांचे हत्यार कमिशन कमिटी आणि कान्फरन्स् हें झालें आहे.

( ३ ) अगदीं गळ्याशींच आलें आणि कांहीं घोषणा करणें भाग झाले तर घोषणेची शब्दयोजना अशी करावयाची कीं जिचे अर्थ भिन्न भिन्न आणि आपण म्हणूं त्याप्रमाणें होऊ शकतील. एका वयस्क बाईनें मुलासाठीं एकदां नवस केला. मुलगा झाला तर सोन्याची कुंची देवाला वहायाचीं. नवसाला देव पावला. पुढें बाईला मुलगा झाला आणि बाईनें मुलाचें नांव सोन्या ठेवलें आणि सोन्याची कुंची देवाला वाहून आपला नवस शब्दशः फेडला. ब्रिटिश राजनीति कल्पकतेच्या बाबतींत या बाईलाहि मागें टाकणारी आहे. Responsible Government, Dominion status, non-interference वगैरे शब्दांचे इतके निरनिराळे अर्थ आतांपर्यंत करण्यांत आले आहेत कीं, ब्रिटिश राजशाहीनें हिंदी देवतेला केलेला आपला नवस वेळोवेळीं फेडला त्यावेळीं हिंदी देवतेच्या हातीं साधी कुंचीहि पडली नाहीं.

---

Elphinstone and Malcom and Metcalfe admitted its value to the British. . . .The fifth colum is no invention of the present day, only the phrase has been invented.

Page 50 Enlist India for freedom by
Edward Thomson - Third Edition 1940

(४) कांहीं अधिकार देणें प्राप्त झाले तर संरक्षणाच्या बंधनांनीं त्या हक्कांतील सारा रस शोषून घेऊन मगच ते हक्क द्यावयाचे आणि त्या अधिकार दानाचे वेळीं दडपशाहीचा वरवंटाही जोरानें फिरावयाचा. कोणतेंहि अधिकारदान म्हटलें कीं त्याठिकाणीं दडपशाही आणि संरक्षण-बंधनेंआलीच. आणि अशा रीतीनें आतांपर्यंत एका हातानें दिलेलें दुसऱ्या हातानें काढून घेण्याचें ब्रिटिश राजनीतीचें धोरण आहे.

वरील चार महान तत्वांवर ब्रिटिश राजनीति अवलंबून आहे. हिंदु-मुस्लिम प्रश्नाच्या बाबतींत या चारींहि तत्वांचा उपयोग पूर्णपणें करून घेण्यांत आला आहे.

सन १८८५ सालीं मुख्यतः सुराज्य मागण्यासाठीं हिंदुस्तानांत राष्ट्रीय सभेची स्थापना झाली. राष्ट्रीय सभेंत त्यावेळीं हिंदुमधील सुशिक्षितांचा भरणा जास्त प्रमाणांत होता. त्यांच्या चळवळीचा जोर वाढूं लागला तेव्हां सन १८९२ सालीं Indian Council's Act पास करण्यांत आला. या कायद्याप्रमाणें मुसलमानांना स्वतंत्र प्रतिनिधित्व मिळाले नव्हते तरीही हिंदुस्थान सरकारनें माल या कायद्याखालीं केलेल्या नियमांत मुसल्मानांना स्वतंत्र प्रतिनिधित्व दिलें व अशा रीतीनें जातवार प्रतिनिधीत्वाचा जन्म झाला. याबद्दल मुसल्मानांनीं मागणी केली नव्हती तरीही हा उपद्व्याप हिंदुस्थान सरकारनें आपल्या अधिकारांत केला. अशा रीतीनें मुसल्मानांच्या मागणीशिवाय, पार्लमेंटच्या खास आदेशाशिवाय, हिंदुस्थान सरकारनें सन १८९२ सालीं मुसल्मानांसाठीं जातवार प्रतिनिधित्व सुरू केलें. 'फोडा आणि झोडा' या तत्वाचा हा केलेला उपयोग होय.

राष्ट्रीय सभेची चळवळ जोरानें सुरू होतींच, क्रांतिकारकांचा मार्गहि देशांतील तरुणांकडून अवलंबिला जात होता. या सर्व परिस्थितीला तोंड देण्यासाठीं थोडे अधिकार देणें, ते अधिकार संरक्षण बंधनांनीं जखडणें आणि दडपशाही सुरू करणें हा मार्ग चोखाळण्याचें सरकारनें ठरविलें. Explosive and Newspapers Bill पास करण्यांत आलें. Criminal Law amendment Act पास झाला, चौकशी

शिवाय हद्दपारी सुरूं झाली व त्याबरोबरच मोर्ले–मिंटो सुधारणाही आल्या. या सुधारणांचा सुगावा लागल्याबरोबर मुसलमानांच्या शिष्ट-मंडळानें हिज हायनेस आगाखान यांच्या नेतृत्वाखालीं त्यावेळचे व्हॉईसराय लॉर्ड मिंटो यांची भेट घेतली व मुसलमानांच्या वतीनें खालील मागण्या व्हॉईसरॉय साहेबांसमोर मांडल्या. त्या मागण्या खालीलप्रमाणें:–

( १ ) जिल्हा बोर्डांतून आणि म्युनिसिपल बोर्डांतून मुसलमानांनां त्यांच्या संख्येस, सामाजिक दर्जास आणि स्थानिक वजनांस अनुसरून जातवार प्रतिनिधित्व देण्यांत यावे.

( २ ) विद्यापीठाच्या कार्यकारी मंडळावर मुसलमानांचे प्रतिनिधि घेतले जातील याबद्दल आश्वासन देण्यांत यावें.

( ३ ) प्रांतिक विधिमंडळांतून मुसलमानांना जातवार प्रतिनिधित्व स्वतंत्र मुसलमान मतदारसंघ निर्माण करून देण्यांत यावे. जमीनदार, वकील, व्यापारी इतर महत्वाच्या हितसंबंधाचे प्रतिनिधि, जिल्हा आणि म्युनिसिपल बोर्डाचे प्रतिनिधि, कांहीं वर्षे घालविलेले पदवीधर या सर्व मुसलमानांना मतदानाचा हक्क असावा.

( ४ ) वरिष्ठ विधिमंडळांतील मुसलमानांच्या प्रतिनिधित्वाचें प्रमाण केवळ त्यांच्या लोकसंख्येवर अवलंबून नसावें. तें कधीहि अपरिणामकारक अल्पमताचे नसावेत. मुसलमान प्रतिनिधींची शक्य तो मुसलमान मतदारसंघांतून निवड व्हावी. मतदारसंघ जमीनदार, वकील, व्यापारी, प्रांतीक विधिमंडळाचे सभासद आणि विद्यापीठाचे फेलोज यांचा असावा.

या सर्व मुसलमानांच्या मागण्या सरकारनें मान्य केल्या एवढेच नव्हे तर प्रांतीय विधिमंडळांतील जादा प्रतिनिधित्व आणि सर्वसाधारण मत-दार संघांतूनहि मत देण्याचा अधिकार त्यांना बहाल करण्यांत आला. लोकसंख्येपेक्षां जादा प्रतिनिधित्व आणि जातीय मतदार संघाचें तत्व पंजाब आणि मध्यप्रांत या दोन प्रांतांना लावण्यांत आले नाहीं. मध्य-प्रांताला या कायद्याखालीं सन १९१४ पर्यंत विधिमंडळच देण्यांत आले

नव्हते व पंजाबमधील मुसलमानांना स्वतंत्र मतदारसंघाची आवश्यकता नसावी असें सरकारला वाटलें. वरीलप्रमाणें व्यवस्था सन १९१६ सालापर्यंत चालली. पुनः नवीन सुधारणा येणार असें कळल्याबरोबर मुसलमानांनीं आपल्या मागणीची यादी पुढें मांडली. त्यावर वाटाघाट होऊन सन १९१६ च्या अखेरीस हिंदु मुसलमानांच्या दरम्यान प्रसिद्ध असा लखनौचा करारनामा झाला. त्या करारनाम्यांतील कलमें खालीलप्रमाणें आहेत.

( १ ) प्रांतिक किंवा वरिष्ठ विधिमंडळांतील हिंदु किंवा मुसलमान सभासदांपैकीं तीन चतुर्थांश सभासदांनीं एखाद्या बिलास किंवा बिलांतील एखाद्या कलमास किंवा ठरावास तें बिल, तें कलम किंवा तो ठराव त्यांच्या जातीसंबंधीं आहे असें ठरवून विरोध केल्यास त्या बिलाचा किंवा त्या कलमाचा किंवा त्या ठरावाचा विचार केला जाऊं नये.

( २ ) वरिष्ठ विधिमंडळांतील लोकनियुक्त सभासदांपैकीं एक त्रितियांश जागा मुसलमानांसाठीं राखून ठेवण्यांत याव्यात. या जागांची निवड स्वतंत्र मुसलमान मतदारसंघांतून व्हावी. प्रत्येक प्रांतांतून किती मुसलमान प्रतिनिधि घ्यावेत हें शक्यतों प्रांतीय विधिमंडळांतील त्यांच्या संख्येवरून ठरवावें.

( ३ ) प्रांतीय विधिमंडळांत मुसलमान प्रतिनिधींचें प्रमाण खालीलप्रमाणें असावें.

| | | |
|---|---|---|
| पंजाब | शेंकडा | ५० |
| संयुक्तप्रांत | ,, | ३० |
| बंगाल | ,, | ४० |
| बिहार, ओरिसा | ,, | २५ |
| मध्यप्रांत | ,, | १५ |
| मद्रास | ,, | १५ |
| मुंबई | ,, | ३३⅓ |

वरीलप्रमाणें करारनामा हिंदु–मुसलमानांच्या सलोख्यानें झाला असतांहि पंजाब आणि बंगालमधील मुसलमानांवर त्यामुळें अन्याय झाला आहे असें मानून त्यामध्यें बदल करण्याबद्दल हिंदुस्थान सरकारनें ब्रिटिश

सरकारकडे शिफारस केली. जो करारनामा हिंदुमुसलमानांनीं परस्पर संमतीनें मान्य केला, त्या करारांतहि मुसलमानांच्या मागणीपेक्षां त्यांना अधिक हक्क द्यावेत अशी शिफारस हिंदुस्थान सरकारनें केली, ही घटना हिंदुस्तान सरकारच्या राजनीतीवर विदारक प्रकाश पाडील. या करारांतील नंबर दोन आणि तीनच्या मागण्या पार्लमेंटनें सर्वस्वी स्वीकारल्या व नंबर एकच्या मागणीऐवजी "ब्रिटिश हिंदुस्तानांतील कोणत्याहि धर्मासंबंधीं किंवा धार्मिक चालीरीतिसंबंधीं कोणताहि प्रश्न विधिमंडळांत आणावयाचा असेल तर त्यास गव्हर्नर-जनरलची पूर्व संमति पाहिजे" असें बंधन कलम ६७ नें कायद्यांत समाविष्ट करण्यांत आलें आणि जो हक्क ज्या त्या धर्माच्या ¾ सभासदांच्या हातीं रहावयास पाहिजे होता तो हक्क सर्वस्वी गव्हर्नर-जनरलच्या हातीं देण्यांत आला. अशा रीतीनें सन १९१९ च्या सुधारणा कायद्यानें मुसलमानांच्या सर्व मागण्या पुरविण्यांत आल्या. या कायद्यानुसार अस्तित्वांत आलेल्या विधिमंडळांतील सभासदांच्या संख्येंत मुसलमानांना ज्या सवलती मिळाल्या त्या खालील कोष्टकांवरून दिसून येतील.

## विधिमंडळांतील सभासदांच्या संख्येचें कोष्टक.

| विधिमंडळाचें नांव | किमान संख्या | लोकनियुक्त सर्व | लोकनियुक्त मुस्लीम | लोकनियुक्त बि. | नियुक्त सभासद अधि. | नियुक्त सभासद बि.अ. | प्रत्यक्ष संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| वरिष्ठ विधिमंडळ | १४५ | १०४ | ५२ | ५२ | २६ | १५ | १४५ |
| कौन्सिल ऑफ स्टेट | ६० | ३३ | ११ | २२ | १७ | १० | ६० |
| मद्रास प्रांतीय | ११८ | ९८ | १३ | ८५ | ११ | २३ | १३२ |
| मुंबई ,, | १११ | ८६ | २७ | ५९ | १९ | ९ | ११४ |
| बंगाल ,, | १२५ | ११४ | ३९ | ७५ | १६ | १० | १४० |
| संयुक्त ,, | ११८ | ११० | २९ | ७१ | १७ | ६ | १२३ |
| पंजाब ,, | ८३ | ७१ | ३२ | ३९ | १५ | ८ | ९४ |
| बिहार ,, | ९८ | ७६ | १८ | ५८ | १५ | १२ | १०३ |
| मध्यप्रान्त ,, | ७० | ५५ | ७ | ४८ | १० | ८ | ७३ |
| आसाम ,, | ५३ | ३९ | १२ | २७ | ७ | ७ | ५३ |

सन १९१९ च्या कायद्यांत दहा वर्षांनीं कायद्याची फेर तपासणी करावी असें कलम होतें. त्यानुसार सन १९२७ सालीं ब्रिटिश सरकारनें सायमन कमिशन नेमलें. लगेच मुसलमानांच्या वतीनें मुस्लिम लीग, अखिल हिंदुस्तान मुस्लिम परिषद, सर्व पक्षीय मुस्लिम परिषद, जमायत-उल्-उलेमा, खिलाफत परिषद वगैरे संस्थांनीं आपल्या मागण्या जाहीर करण्यास प्रारंभ केला. त्या मागण्या बहुतांशीं एकच होत्या. मुस्लिम लीगच्या वतीनें जनाब जीनांनीं ज्या चौदा मागण्या पुढें केल्या त्यांत इतर सर्व मागण्यांचा समावेश होतो. त्या मागण्या खालील प्रमाणेंः—
( सदर मागण्या पंधरा आहेत परंतु जनाब जीनांच्या चौदा मागण्या या नांवानें त्या ओळखल्या जातात )

( १ ) हिंदुस्तानची भावी राज्यघटना संयुक्त स्वरूपाची असावी आणि शेषाधिकार प्रांतांच्या हातीं असावेत.

( २ ) सर्व प्रांतांनां प्रांतीय स्वायत्तता सारख्या स्वरूपाची असावी.

( ३ ) कोणत्याही प्रांतांतील बहुसंख्यांक वर्गाला अल्पमतांत किंवा समान दर्जाला आणील असें प्रतिनिधित्व अल्पसंख्यांकांना देण्यांत येऊं नये. त्याचप्रमाणें अल्पसंख्यांकांनां पुरेसे आणि परिणामकारक असें प्रतिनिधित्व देण्यांत यावें. हीं तत्वें लक्षांत घेऊन सर्व विधिमंडळें आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांची पुनर्घटना करण्यांत यावी.

( ४ ) मध्यवर्ती विधिमंडळांत मुसलमानांनां एक तृतियांशा पेक्षां कमी नाहीं इतके प्रतिनिधित्व मिळालें पाहिजे.

( ५ ) जातीय प्रतिनिधी हे पूर्वीप्रमाणें जातीय स्वतंत्र मतदारसंघांतून निवडले जावेत. कोणत्याहि जातीला संयुक्त मतदार संघ कधीं काळीं घ्यावे असें वाटल्यास तें स्वीकारण्याची मोकळीक असावी.

( ६ ) पंजाब, बंगाल आणि वायव्य सरहद्द प्रांत यांतील मुस्लिम बहु-संख्यांकत्वाला बाध येईल अशा प्रकारें या तीन प्रांतांची पुनर्रचना, ती करणें झाल्यास, होऊं नये.

(७) सर्व जमातींना धार्मिक स्वातंत्र्य म्हणजे पूजास्वातंत्र्य, आचार-स्वातंत्र्य, प्रचार स्वातंत्र्य, संगतिस्वातंत्र्य आणि शिक्षणस्वातंत्र्य याबद्दल ग्वाही देण्यांत यावी.

(८) कोणत्याहि बिलासंबंधीं, बिलांतील कलमासंबंधीं किंवा ठरावा-संबंधीं विधिमंडळांतील एखाद्या जमातीच्या तीन चतुर्थांश सभासदांनीं तें बिल, बिलांतील कलम अगर ठराव जातीय हितसंबंधांना विघातक आहे अशी तक्रार केल्यास तीं गाळण्यांत यावीत.

किंवा वरील प्रकारच्या हितसंबंधांच्या सुरक्षिततेसाठीं दुसरी कोण-तीहि व्यवहारी आणि उपयुक्त योजना अंमलांत आणावी.

(९) मुंबई इलाख्यापासून सिंध प्रांत म्हणून स्वतंत्र करण्यांत यावा.

(१०) वायव्य सरहद्द प्रांत आणि बलुचिस्तान यांना इतर प्रांताप्रमाणें सुधारणा लागू करण्यांत याव्यात.

(११) सरकारी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांतील सर्व नोकरींत लायकीकडे लक्ष देऊन मुसलमानांना योग्य प्रमाणांत हिस्सा मिळेल अशी तरतूद राज्यघटनेंत करण्यांत यावी.

(१२) मुसलमानांचा धर्म, संस्कृति, व्यक्तिगत कायदा या लयीच्या संरक्षणासाठीं आणि त्यांचे शिक्षण, भाषा, धर्म, व्यक्तिगत कायदा, धार्मिक संस्था, स्थानिक स्वराज्य संस्थेंतून सरकारनें दिलेल्या मदतींतील हिस्सा यांच्या संवर्धनासाठीं पुरेशी संरक्षणें घटनेंत नमूद करण्यांत यावींत.

(१३) कोणत्याहि प्रांतीय अगर वरिष्ठ प्रधानमंडळांत मुसलमान मंत्र्यांची संख्या कमींतकमी एक तृतियांश असली पाहिजे.

(१४) हिंदी संयुक्त राज्यघटनेंतील सर्व घटकांच्या संमतीशिवाय राज्यघटनेंत मध्यवर्ती विधिमंडळानें फरक करूं नये.

(१५) स्वतंत्र जातीय मतदारसंघांतून मुसलमानांसाठीं स्वतंत्र प्रति-निधित्व विधिमंडळांत आणि स्थानिक स्वराज्य संस्थांत सद्यःस्थितींत असणें अपरिहार्य आहे व तें देण्यास सरकारनें स्वतःला वचनबद्ध करून

घेतले आहे म्हणून जोपर्यंत मुसलमानांना स्वतंत्र मतदारसंघ आणि स्वतंत्र प्रतिनिधित्व पाहिजे आहे तोंपर्यंत तें चालू ठेवण्यांत यावेत.

सूचनाः—ज्या प्रांतांत मुसलमान अल्पसंख्य आहेत त्या प्रांतांत लोकसंख्येपेक्षां त्यांना किती अधिक जागा द्यावयाच्या तें पुढें ठरविण्यांत यावें.

या मुसलमानांच्या मागण्या वाचल्यास त्यांतून नवीन धोरण निर्माण झालेलें स्पष्ट दिसतें. आतांपर्यंत मुसलमानांची मागणी ही स्वतंत्र मतदारसंघ आणि स्वतंत्र प्रतिनिधित्व यापुरतींच मर्यादित होती. आतां सिंध, पंजाब, बंगाल, वायव्यसरहद्दप्रांत आणि बलुचिस्तान या पांच प्रांतांत मुसलमानांना विधिमंडळांतून कायद्यानें बहुमत प्रस्थापित करून पाहिजे; आणि या प्रांतांवर मध्यवर्ती सत्तेचा दाब राहूं नये म्हणून फक्त जरूरीपुरतेंच अधिकार मध्यवर्ती सत्तेला देण्यांत येऊन सर्व शेषाधिकार प्रांताकडे रहावेत अशी मागणी करण्यांत आली. त्याचप्रमाणें कांहीं बाबतींत संरक्षणाची भाषा जाऊन संवधर्नाची भाषा आली आहे. मुसलमानांचें शिक्षण, भाषा, व्यक्तिगत कायदा, धार्मिक संस्था वगैरे बाबींच्या संवर्धनासाठींहि राज्यघटनेंत मागणी करण्यांत आली आहे. या मागणीला हिंदूंनीं विरोध केला हें साहजीकच होतें. पण मुसलमानहितविरोधी नसणाऱ्या सायमन कमिशनलाहि या सर्व मागण्या पुऱ्या करणें इष्ट वाटलें नाहीं. "पंजाब आणि बंगालमध्यें कायद्यानें बहुमत प्रस्थापित करून पाहिजे आणि इतर प्रांतांतून लोकसंख्येपेक्षां कितितरी पट अधिक दिलेलें प्रतिनिधित्वहि पाहिजे हें मागणें न्याय्य नाहीं" असें सायमन कमिशननें आपल्या रिपोर्टांत नमूद केलें. त्यानंतर तीन गोलमेज परिषदा झाल्या. त्यानंतर ब्रिटिश सरकारनें सन १९३५ चा कायदा व जातीय निवाडा जाहीर केला. परिणामीं या पैधरा मागण्यांपैकीं कोणत्या मागण्या कितपत पुरविल्या गेल्या तें आपण आतां क्रमवार पाहूं.

(१) राज्यघटना संयुक्त स्वरूपाची करण्यांत आली. शेषाधिकार प्रांताकडे असावेत ही मागणी स्पष्टपणें पुरविण्यांत आली नाहीं. शेषाधिकार मध्यवर्ती सत्तेकडे म्हणजे हिंदूंच्या हातीं राहूं नयेत हा जो माग-

णीचा भावार्थ होता तो पुरविण्यांत आला व शेषाधिकार सन १९३५ च्या कायद्यांतील कलम १०४ वरून गव्हर्नर जनरल यांच्या हातीं देण्यांत आले आहेत. हिंदुमुसलमानांच्या परस्परांतील संशयी वृत्तीमुळें सरकार प्रत्येक वेळीं आपला अधिकार कसा बळकट करून घेते याचे हें एक नामी उदाहरण आहे.

( २ ) सर्व प्रांतांना प्रांतीय अधिकार सारख्या स्वरूपाचे देण्यांत आले आणि वायव्य सरहद्द प्रांत हा गव्हर्नरांचा स्वतंत्र प्रांत करण्यांत आला.

( ३ ) पंजाब आणि बंगालमध्यें हिंदूपेक्षां अधिक प्रतिनिधि प्रांतीय विधिमंडळांत मुसलमानांनां देण्यांत आले; सबंध विधिमंडळांत बंगालमधील मुसलमानांना बहुमत देण्यांत आलेलें नाहीं. बहुमताचें पारडें या किंवा त्या बाजूस झुकविण्याचा अधिकार बंगाल विधिमंडळांत युरोपियन सभासदांकडे ठेवण्यांत आला आहे. लखनौ करारामुळें जे जादा प्रतिनिधित्व इतर प्रांतांतून मुसलमानांना लाभलें होतें तें पूर्णपणें कायम ठेवण्यांत आले.

( ४ ) मध्यवर्ती विधिमंडळांत एक तृतियांश जागा मुसलमानांनीं मागितल्या होत्या. त्यांना खालीलप्रमाणें जागा सन १९३५ च्या कायद्यानें देण्यांत आल्या.

| विधिमंडळाचें नांव | एकंदर जागा | हिंदूंना | मुसलमानांना |
|---|---|---|---|
| कौन्सिल ऑफ स्टेट | ११० | ७५ | ४९ |
| फेडरल असेंब्ली | २५० | १०५ | ८२ |

वरीलप्रमाणें जागा देऊन त्यांची एक तृतियांश जागांची मागणी पुरविण्यांत आली.

( ५ ) जातीय प्रतिनिधित्व आणि जातीय मतदार संघ कायम ठेवण्यांत आले.

( ६ ) पंजाब, बंगाल आणि वायव्य सरहद्द प्रांत यांच्या चतुःसीमा पूर्वीच्याच कायम ठेवण्यांत आल्या.

( ७ ) आणि ( ८ ) च्या मागण्या अप्रत्यक्षपणें पुरविण्यांत आल्या.

( ९ ) सिंधप्रांत मुंबई इलाख्यांतून वेगळा करून स्वतंत्र गव्हर्नरचा* प्रांत करण्यांत आला.

( १० ) वायव्य सरहद्द प्रांत आणि बलुचिस्थान यांना इतर प्रांता-प्रमाणें अधिकार देण्यांत आले आणि वायव्य सरहद्द प्रांत गव्हर्नरचा प्रांत करण्यांत आला.

( ११ ) वरिष्ठ आणि प्रांतीय नोकरींत मुसलमानांना शेंकडा पंचवीस टक्के जागा देण्यांत येतील असें ठरविण्यांत आले.+

( १२ ) धर्म आणि संस्कृति वगैरे संरक्षणाची मागणी गव्हर्नर आणि गव्हर्नर-जनरल यांचे हातीं अधिकार ठेऊन अप्रत्यक्षरीत्या पुरविण्यांत आली.

( १३ ) मध्यवर्ती आणि प्रांतीय प्रधान मंडळांत प्रधान मंडळाच्या संपूर्ण संख्येपैकीं कमीतकमी एक तृतियांश सभासद मुसलमान असावेत ही मागणी जशीच्या तशी मान्य करण्यांत आली नाहीं. परन्तु सन१९३५ च्या कायद्यास अनुसरून गव्हर्नरांना जे आदेश( instrument of instructions ) देण्यांत आले त्यांत प्रधानमंडळांत अल्पसंख्यांकांचा प्रतिनिधि असावा असा आदेश देण्यांत आला. वरीलप्रमाणें मुसल्मानांच्या मागण्या जातीय निवाडयाच्या द्वारें व अन्य साधनांनीं पूर्ण करण्यांत आल्या आहेत.

या सर्व मागण्या पूर्ण झाल्यानंतर मिळालेले अधिकार व सत्ता टिकविण्यासाठीं मुस्लिम लीग फार तर जागरूक राहील, नवीन मागण्यांची वाढ होणार नाहीं असा सार्वत्रिक समज होता. परन्तु तसें झालें नाहीं. पंडित जवाहरलाल नेहरू आणि जनाब जीना यांच्या दरम्यान जो पत्र-

---

* सन १९३५ च्या कायद्यांतील कलम २८९ ( १ ) प्रमाणें ऑर्डर इन्-कौंसिल काढण्यांत येऊन सिंध ता. १।४।१९३६ पासून स्वतंत्र झाला.

+ Resolution issued by The Secretary of State for India and published on 7th July 1934.

व्यवहार सन १९३८ सालीं झाला त्यावरून या मागण्यांची यादी वाढलेलीच दिसून आली. या पत्रव्यवहारावरून जनाब जीनांच्या ज्या मागण्या मुस्लिम लीगच्या वतीनें दिसून आल्या त्या खालीलप्रमाणें:—

( १ ) सन १९२९ सालीं मुस्लिम लीगनें ज्या पंधरा मागण्या केल्या होत्या त्या पुरविण्यांत याव्यात. ( यापैकी बहुतेक मागण्या पूर्ण झाल्या हें आपण मागें पाहिलेंच. शेषाधिकार प्रांताकडे रहावेत, प्रधानमंडळांत एक तृतियांश जागा मुसलमानांनां देण्यांत याव्यात वगैरे मागण्या पूर्ण होण्यासाठीं ही मागणी आहे. )

( २ ) राष्ट्रीय सभेनें जातीय निवाड्याला विरोध करण्याचें सोडून द्यावें आणि राष्ट्रीयत्वाला विरोधक असें जातीय निवाड्याला संबोधूं नये.

( ३ ) सरकारी नोकरींतील मुसलमानांचा हिस्सा निश्चित करून कायद्यांत नमूद करण्यांत यावा.

( ४ ) मुसलमानांचा व्यक्तिगत कायदा आणि संस्कृति यांच्यासंबंधीं कायद्यानें हमी देण्यांत यावी.

( ५ ) शहीदगंज मशीदीची चळवळ कॉंग्रेसनें आपल्या हातीं घ्यावी व आपल्या नैतिक वजनानें ती मशीद मुसलमानांच्या ताब्यांत मिळेल असें करावें.

( ६ ) मुसलमानांचा आझान म्हणण्याचा आणि इतर सर्व धार्मिक हक्क अप्रतिहत चालविण्यांत यावेंत.

( ७ ) मुसलमानांना गोहत्या करण्याची मुभा असावी.

( ८ ) प्रांतांची पुनर्रचना होत असतांना ज्या प्रांतांत मुसलमान बहुसंख्य आहेत त्या प्रांतांतून ते अल्पसंख्य होतील अशा रीतीनें पुनर्रचना करण्यांत येऊं नये.

( ९ ) ' वंदे मातरम् ' हें राष्ट्रगीत म्हणून सोडून देण्यांत यावे.

( १० ) उर्दू हीच राष्ट्रीय भाषा व्हावी असें मुसलमानांना वाटतें म्हणून उर्दूचा उपयोग कमी केला जाणार नाहीं अशी कायदेशीर हमी मुसलमानांनां देण्यांत यावी.

 /जोशी गणेश

( ११ ) जातीय निवाडयांत जें तत्व मान्य करण्यांत आलें आहे तें तत्व ( लोकसंख्येनुसार स्वतंत्र प्रतिनिधित्व ) स्थानिक संस्थांच्या बाबतींत लागूं करण्यांत यावें.

( १२ ) तिरंगी झेंडा बदलण्यांत यावा किंवा मुस्लिम लीगच्या निशाणाला तितकेंच महत्व देण्यांत यावें.

( १३ ) हिंदुस्थानांतील मुसलमानांची मुस्लिम लीग ही एकमेव प्रातिनिधिक आणि अधिकारयुक्त संघटना आहे असें मान्य करण्यांत यावें.

( १४ ) प्रांतांतून संयुक्त मंत्री–मंडळें बनविण्यांत यावीत.

या वाढत्या मागण्या मुस्लिम लीगच्या मनोवृत्तीवर चक्क प्रकाश पाडणाऱ्या आहेत. पुरविल्या गेलेल्या मागण्याच्या मानानें पुढें येणाऱ्या मागण्यांची संख्या वाढतच आहे. या मागण्या सन १९३८ सालच्या होत्या. सन १९३९ सालीं प्रत्येक विभागांत मुसलमानांचा अर्धा हिस्सा ही मागणी झाली. सन १९४० सालीं हिंदुस्थानवर शस्त्रक्रिया करणारी पाकिस्तानची योजना आंखण्यांत आली व १९४१ सालांत तर ही शस्त्रक्रिया आपलें ध्येय म्हणून मुस्लिम लीगनें ठरविली आहे. वरीलप्रमाणें मुस्लिम लीगच्या वाढत्या मागण्यांचा इतिहास आहे.

# पाकिस्तानच्या निरनिराळ्या योजना : : : : ४

लाहोर येथील मुस्लिम लीगच्या अधिवेशांत पाकिस्तानचा ठराव पास झाला व त्यांतील तत्वास अनुसरून एक सविस्तर योजना आखण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास देण्यांत आला; परंतु कार्यकारी मंडळानें अद्यापि आपली सविस्तर योजना पुढें मांडलेली नाहीं. त्यामुळें पाकिस्तानमध्यें कोणकोणते प्रदेश येणार, हैद्राबाद, काश्मीर वगैरे देशी संस्थानांचे काय होणार, पाकिस्तानमधील हिंदूंना आणि इतरांना कोणकोणतीं संरक्षणें मिळणार, पाकिस्तानची प्रत्यक्ष योजना केव्हां अंमलांत येणार, मध्यंतरीच्या काळांत काय योजना होणार वगैरे बाबतींत अधिकृत माहिती कांहींच मिळत नाहीं. 'पाकिस्तानचा पुकारा' एवढेंच मुस्लिम लीगनें सध्यां काम हातीं घेतलेलें दिसतें. मुस्लिम लीगनें अधिकृत योजना मांडलेली नसली तरी सर शिकंदर हयातखान, अलीगडचे प्रोफेसरद्वय, पंजाबी आणि डॉ. लतीफ या चौघा मुसलमानांनीं पाकिस्तानच्या आपल्या योजना लेखरूपानें पुढें मांडलेल्या आहेत. त्यानंतर डॉ. आंबेडकर यांनीं 'पाकिस्तानवरील विचार' या नांवाचें पुस्तक लिहिलें आहे त्यांतहि पाकिस्तानची



नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

योजना सविस्तर पुढें मांडलेली आहे. या सर्व योजना नमूद करून त्यांतील गुणदोष दाखविण्याचा येथें विचार आहे. सर शिकंदर हयातखान, अलीगडचे प्रोफेसर, पंजाबी आणि डॉ. लतिफ या चौघांच्या योजनेंत खालील गृहीत प्रमेयें आहेत.—(१) हिंदुस्थान हें सध्यां एक राष्ट्र नाहीं. ( २ ) हिंदुस्तानांत हिंदु आणि मुसलमान अशीं दोन राष्ट्रें आहेत. ( ३ ) हिंदु आणि मुसलमान हे धर्मानें विभिन्न आहेत एवढेंच नव्हे तर ते संस्कृतीनें, राजकीय विचारानें आणि आर्थिक दृष्टीनें एकमेकांशीं विरोधी आहेत. रीतिरिवाज, समाजरचना, नैतिक मूल्यें, धर्मबंधनें, राजकीय आणि सांस्कृतिक ध्येयें, परंपरा, भाषा, साहित्य, कला आणि जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा दोन्ही समाजाचा परस्पर विरोधी आहे. ( ४ ) हिंदु आणि मुसलमानांचें मिळून एकराष्ट्र होणें कधींहि शक्य नाहीं.

वरील चार गृहीत प्रमेयांवर उभारलेल्या योजनांपैकीं पंजाबीनें आपली योजना ‘ Confederacy of India ’ या पुस्तकांत सविस्तर मांडली आहे. ती खालीलप्रमाणें:—

हिंदुस्तानचे खालीलप्रमाणें पांच विभाग करण्यांत यावेत. (१) पहिल्या विभागाचें नाव इंदस्थान ( Indus Region ) असें असावें. यांत खालील प्रांत यावेत.

( १ ) अंबाला, कांगरा, ऊना, गरशंकर वगैरे पूर्वेकडील हिंदु विभाग कमी करून सर्व पंजाब ( २ ) सिंध ( ३ ) वायव्य सरहद्द प्रांत ( ४ ) काश्मीर ( ५ ) बलुचिस्तान ( ६ ) भावलपूर ( ७ ) चित्रळ ( ८ ) कपुरथळा वगैरे. या इंदस्थानची लोकसंख्या तीन कोटी तीस लक्ष सुमारें होईल व त्यांपैकीं शेंकडा ८२ मुसलमान, शेंकडा ८ हिंदू आणि शेकडा ८ शीख अंदाजें होतील.

( २ ) दुसऱ्या विभागाचें नांव हिंदुस्थान असें ठेवावें. त्यांत खालील प्रदेशांचा समावेश करावा.

( १ ) संयुक्त प्रांत ( २ ) मध्यप्रांत ( ३ ) बिहार आणि बंगालमधील हिंदूभाग ( ४ ) ओरिसा ( ५ ) आसाम ( ६ ) मद्रास प्रांत ( ७ ) मुंबई प्रांत ( ८ ) राजस्थानखेरीज देशी दक्षिणी संस्थानें. या सर्वांची लोकसंख्या २१ कोटि ६० लक्ष सुमारें होईल. पैकीं शेंकडा ८४ हिंदु व शेंकडा ११ अंदाजें मुसलमान होतील.

( ३ ) संयुक्त राजस्थान संस्थानें असें तिसऱ्या विभागाचें नांव असावें. यांत राजस्थान संस्थानें व मध्य हिंदुस्थानांतील संस्थानांचा समावेश होईल. याची लोकसंख्या पावणेदोन कोटी अंदाजें होईल. त्यांपैकीं शेंकडा ८६.५ हिंदू व शेंकडा आठ मुसलमान होतील.

( ४ ) हैद्राबाद, म्हैसूर वगैरे संस्थानें. याचें नांव हैद्राबाद विभाग असें ठेवावें. या विभागाची लोकसंख्या २ कोटी १५ लक्ष होईल व हिंदु शेंकडा ८५ व मुसलमान शेंकडा ९ होतील.

( ५ ) बंगाल फेडरेशन असें या पांचव्या विभागाचें नांव ठेवावें. बंगालमधील पूर्वेकडील मुस्लिम भाग आणि आसाम मधील मुस्लिम भाग हे या फेडरेशनमध्यें येतील याची लोकसंख्या सुमारें तीन कोटि होईल व त्यांपैकीं शेंकडा ६६ मुसलमान व शेंकडा ३४ हिंदू होतील. वरीलप्रमाणें पांच विभाग पाडल्यानंतर प्रत्येक विभागासाठीं एकेक गव्हर्नर-जनरल नेमण्यांत यावा व त्यावर व्हॉइसरॉयची नेमणूक करावी. मध्यवर्ती विधिमंडळांत कोणत्या विभागाचे किति प्रतिनिधि घ्यावयाचे ते त्या विभागाच्या महत्वावरून ठरविण्यात येईल. वरीलप्रमाणें पंजाबी योजना आहे.

अलीगडच्या प्रोफेसरद्वयांनीं आपली योजनाहि सविस्तरपणें मांडलेली आहे. ती योजना खालीलप्रमाणें. अलीगड योजना या नांवानें ती संबोधली जाते. या योजनेंत हिंदुस्तानचे चार विभाग सुचविले आहेत. पहिल्या विभागाचें नांव पाकिस्तान ठेवलें असून सदर विभागांत खालील प्रांत घेतले आहेत. ( १ ) पंजाब ( २ ) वायव्य सरहद्द प्रांत ( ३ ) सिंध ( ४ ) बलुचिस्तान ( ५ ) कपुरथळा ( ६ ) भावलपूर ( ७ ) काश्मीर आणि जम्मू ( ८ ) चित्रळ ( ९ ) बिलासपूर ( १० ) सिमला हिलस्टेटस्.

याची लोकसंख्या सुमारें चार कोटी होईल व त्यांत मुसलमान शेंकडा ६० टक्केच राहतील.

( २ ) दुसऱ्या विभागाचें नांव बंगाल विभाग असें ठेवावयाचें आहे. यांत बंगालमधील हवडा आणि मिदनापूर हे जिल्हे सोडावयाचे व आसामधील सिल्हेट जिल्ह्याचा समावेश करावयाचा. याची लोकसंख्या सुमारें सव्वा पांच कोटी होईल व त्यांपैकीं शेंकडा ७५ टक्केच फक्त मुसलमान होतील.

( ३ ) तिसऱ्या विभागाचें नांव हिंदुस्थान असें राहील. एक, दोन आणि चार विभाग सोडून बाकी राहिलेला सर्व प्रदेश यांत घ्यावा. याची लोकसंख्या अंदाजें २१ कोटी होईल व त्यांत फक्त शेंकडा ९ टक्के मुसलमान राहतील.

( ४ ) चौथ्या विभागाचें नांव हैद्राबाद असें ठेवावें. यांत खालील प्रदेश येतील. ( अ ) हैद्राबाद संस्थान, वऱ्हाड आणि कर्नाटक मिळून हा पोटभाग होईल. याची लोकसंख्या ३ कोटी होईल पैकीं फक्त ७ टक्के लोकसंख्या मुसलमान असेल. ( आ ) दिल्ली प्रांत रोहिलखंड, अलीगड वगैरे भाग यांची लोकसंख्या सव्वा कोटी पैकीं मुसलमान शेंकडा २८ टक्के होतील.

( इ ) मलबार प्रांत याची लोकसंख्या ५० लाख होईल पैकीं मुसलमान फक्त २७ टक्के होतील. याशिवाय सबंध हिंदुस्तानांतील ५० हजारांवरील लोकसंख्येच्या शहरांना ' स्वतंत्र शहरें ' समजण्यांत यावें व त्यांनां स्वतःच्या कारभारांत संपूर्ण स्वातंत्र्य असावें. हैद्राबादचा स्वतंत्र राष्ट्राचा दर्जा मान्य करण्यांत यावा व हैद्राबादकडून घेतलेले वऱ्हाड, कर्नाटक, उत्तर सरकार हे मुलुख हैद्राबादला परत करण्यांत यावेत. हैद्राबादचा स्वतंत्र राष्ट्र या नात्याचा दर्जा मान्य झाल्यानंतर दक्षिणेंतील मुसलमानांचें तें केंद्रस्थान होईल. यानंतरची तिसरी योजना डॉ. लतीफ यांची आहे. या योजनेंत हिंदुस्तानचे एकंदर पंधरा विभाग करण्यांत आलेले आहेत. त्यांपैकीं चार मुस्लिम विभाग आणि अकरा हिंदू विभाग होणार आहेत.

देशी संस्थानांनीं आपल्या इच्छेनुसार कोणत्याहि विभागांत सामील व्हावयाचे आहे. जे चार मुस्लिम विभाग होणार आहेत ते खालीलप्रमाणें:—

(१) वायव्य सरहद्द प्रांत, सिंध, बलुचिस्तान, पंजाब, खैरपूर, भावलपूर हीं संस्थानें.

(२) पूर्व बंगाल आणि आसाम.

(३) दिल्ली-लखनौ विभाग. या विभागाची सुरवात पतियाळच्या पूर्व बाजूस करून लखनौपर्यंत आणि रामपूरला वळसा घालून आग्रा, दिल्ली, लखनौ, कानपूर सहा प्रांत घेऊन हा विभाग पुरा करावयाचा आहे.

(४) हैद्राबाद विभाग यांत सबंध हैद्राबाद संस्थान आणि वऱ्हाड, कर्नाटकमधील मद्रासपर्यंतचा भाग येणार आहे. मद्रास पर्यंतचा भाग मिळाल्यामुळें हैद्राबाद विभागाला समुद्रकिनारा प्राप्त होईल.

**हिंदुविभाग खालीलप्रमाणें होतील:—**

(१) राहिलेला बंगालचा व आसामचा भाग.

(२) ओरिसा.

(३) बिहार, संयुक्तप्रांत, मध्यहिंदुस्तानांतील संस्थानें वगैरे.

(४) राजपुतान्यांतील रजपूत संस्थानें.

(५) काठेवाड आणि गुजराथ.

(६) महाराष्ट्र.

(७) हैद्राबाद संस्थानांत जाणारा भाग वगळून कर्नाटक.

(८) तामीळ नाड.

(९) आंध्र.

(१०) मलबार प्रांत.

(११) हिंदु-शीख विभाग यांत काश्मीरचा कांहीं भाग येतो.

याप्रमाणें हिंदुस्तानचे पंधरा विभाग करून हिंदुविभागांतील अल्पसंख्यांक मुसलमानांच्या संरक्षणासाठीं खालील बंधनें कायद्यांतच नमूद करण्यांत आली पाहिजेत.

(१) स्वतंत्र मतदारसंघ व सध्यांचे स्वतंत्र जातीय प्रतिनिधित्व कायम ठेवण्यांत आलें पाहिजे.

( २ ) देशी संस्थानांतून मध्यवर्ती विधिमंडळांत कमीतकमी एक तृतियांश मुस्लिम प्रतिनिधि पाठविण्यांत आले पाहिजेत.

( ३ ) इस्लामी धर्म, व्यक्तिगत कायदा आणि संस्कृति यांच्या संबंधींचे सर्व कायदे विधिमंडळांतील मुस्लिम सभासदांनी करावयाचे व या कायद्यांनां विधिमंडळानें मान्यता दिलीच पाहिजे.

( ४ ) प्रधानमंडळांत हिंदु आणि मुसलमान जमातीचे प्रतिनिधि पाहिजेतच. शांतता–सुव्यवस्था आणि शिक्षण यासाठीं एक प्रधान आणि एक उपप्रधान नेमण्यांत यावा. प्रधान हिंदु असल्यास उपप्रधान मुस्लिम असलाच पाहिजे.

( ५ ) पब्लिक सर्व्हिस कमिशनमध्यें एक मुसलमान सभासद पाहिजेच.

( ६ ) मुसल्मानांच्या व्यक्तिगत कायद्यासंबंधींचे निकाल मुस्लिम न्यायाधीशानींच केले पाहिजेत. वरीलप्रमाणें संरक्षणें या योजनेंत सुचविलेली आहेत.

## शिकंदर योजना

सर शिकंदर हयातखान यांच्या योजनेप्रमाणें हिंदुस्थानचे सात विभाग करण्यांत यावयाचे आहेत. ते खालीलप्रमाणें:—

( १ ) आसाम, बंगाल आणि त्यांतील संस्थानें.

( २ ) बिहार आणि ओरिसा.

( ३ ) संयुक्त प्रांत आणि त्यांतील संस्थानें.

( ४ ) मद्रास प्रांत, त्रावणकोर, मद्रासी संस्थानें व कूर्ग.

( ५ ) मुंबई प्रांत, हैद्राबाद, मुंबई प्रांतांतील संस्थानें, म्हैसूर आणि मध्यप्रांतांतील संस्थानें.

( ६ ) राजपुतान्यांतील संस्थानें, ग्वाल्हेर, मध्यहिंदुस्तानांतील संस्थानें मध्यप्रांत आणि वऱ्हाड, ओरिसा संस्थानें.

( ७ ) पंजाब, सिंध, वायव्य सरहद्द प्रांत, काश्मीर वगैरे.

वरीलप्रमाणें सात विभाग करावेत. याशिवाय १९३७ सालच्या सुरवातीस हिंदुस्तानांतील लष्कराची जातीय दृष्ट्या जी स्थिति होती व लष्करांत जें हिंदुमुसल्मानांचे प्रमाण होतें तें पुढें बदलून उपयोगी नाहीं.

मध्यवर्ती प्रधान मंडळांत मुसलमान प्रधान कमीतकमी एक तृतियांश पाहिजेत. त्याचप्रमाणें प्रधानमंडळांतील प्रधानापैकीं एक तृतियांश प्रधान देशी संस्थानांतील पाहिजेत. आपल्या विभागाचा विश्वास न राहिल्यास त्या प्रधानानें राजिनामा दिला पाहिजे. या अटीशिवाय खालील संरक्षण बंधनेंहि कायद्यांत नमूद केली पाहिजेतः—

(१) अल्पसंख्यांकांच्या सर्व योग्य हक्कांचें संरक्षण आणि त्यांच्या संस्कृतीचें आणि धार्मिक हक्कांचें संरक्षण.

(२) देशी संस्थानिकांच्या बरोबरील तहांचें संरक्षण.

(३) देशी संस्थानें आणि ब्रिटिश हिंदुस्तानांतील प्रांत यांच्या अधिकारांत मध्यवर्ती सत्तेनें कोणत्याहि प्रकारची ढवळाढवळ करूं नये.

(४) संरक्षण, परराष्ट्रीय राजकारण, जकात, नाण्याचा प्रश्न, वाहतुकीचीं साधनें वगैरे अगदीं जरूरीचीं खातींच मध्यवर्ती सत्तेकडे देण्यांत यावींत व बाकी सर्व अधिकार व शेषाधिकार हे प्रांताकडेच रहावेत. एखादा विषय मध्यवर्ती सरकारच्या कक्षेंत येतो कीं प्रांतीय सरकारच्या कक्षेंत येतो याबद्दल शंका उत्पन्न झाल्यास त्याचा निर्णय व्हाइसरॉय साहेब जो देतील तो अखेरचा मानण्यांत यावा.

वरीलप्रमाणें थोडक्यांत सर शिकंदर हयातखान यांची योजना आहे. आपण आतांपर्यंत या चार योजनांची तोंडओळख करून घेतली. आतां त्यांतील गुणदोषांचें क्रमशः थोडक्यांत विवेचन करूं. या योजना आंखतांना जीं गृहीत प्रमेयें धरलीं आहेत त्यासंबंधीं येथें टीका कर्तव्य नाहीं. त्या गृहीत प्रमेयांचा उहापोह 'पाकिस्तानचें तत्वज्ञान' या विभागांत आणि इतरत्र होईलच. या ठिकाणीं प्रत्येक योजनेंतील मूलतः गुणदोष दाखवावयाचे आहेत.

## पंजाबी योजना

या योजनेंत पहिला विभाग इंदस्थान या नांवाचा आहे. सदर विभागांत सिंधी, पंजाबी, बलुची, पुश्तु, गुरुमुखी, उर्दू वगैरे भाषा बोलल्या जाणार म्हणजे भाषेच्या दृष्टीनें एकसूत्रीपणा राहत नाहीं. ब्रिटिश सत्तेच्या उदयापूर्वी या विभागांतील पांच प्रांतांचें एकमेकांशीं कधींहि

सख्य नव्हतें. या प्रांतांचें राजकारणदृष्ट्या कधींहि पूर्वी एकत्रीकरण झालेलें नाहीं. शिखांचें या भागांतील वर्चस्व तर प्रसिद्धच आहे. या भागांत शीख आणि हिंदू शेंकडा १६ टक्के या नात्यानें अल्पसंख्य म्हणून राहणार. अशा रीतीनें या विभागांत अल्पसंख्याकांचा प्रश्न सुटत नाहीं. एक भाषा होत नाहीं. हें प्रांत एकत्र आणण्याला यांचा पूर्वेतिहास सलोख्याचा आणि मैत्रीचा नाहीं. या विभागांतील शीख आणि मुसलमान हे जर एकमेकांशीं गुण्या-गोविंदानें नांदतील अशी अपेक्षा करावयाची तर मग सबंध हिंदुस्तानांत मुसल्मान, शीख, हिंदू वगैरे सर्व जमाती मैत्रीनें वागतील अशी अपेक्षा करणें कां चुकीचें होईल? या योजनेंतील दुसरा विभाग हिंदुस्तानचा आहे. यांत अडीच कोटी मुसलमान अल्पसंख्य म्हणून रहावयाचे आहेत. हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत आणि अरबीसमुद्रापासून ब्रह्मदेशाच्या सरहद्दीपर्यंत या विभागांतील प्रांत पसरलेले आहेत. ते प्रांत एकमेकांशीं कांहीं ठिकाणीं चिंचोळ्या पट्टीनें जोडले गेले आहेत. राजकीय व्यव-स्थेच्या दृष्टीनें २१ कोटी ६० लक्ष लोकसंख्येचा प्रांत एकत्रित आणून त्याची व्यवस्था लावणें ही गोष्ट केवळ अशक्यच आहे. भाषेच्या दृष्टीनें या विभागांत कोणतीहि सोय पाहिलेली नाहीं.

चौथ्या विभागांत हैद्राबाद संस्थानाशीं म्हैसूर संस्थान कां जोडलें आहे याचा बिलकूल उलगडा होत नाहीं. म्हैसूर घेतल्यानंतर त्रावणकोर व कोचीन ही दोन संस्थानें कां घेतलीं नाहींत हेही कळत नाहीं. पांचव्या विभागांत शेंकडा ६६ टक्केच फक्त मुसलमान आहेत व हिंदूंची संख्या शेंकडा ३४ टक्के आहे. म्हणजे या बंगाल विभागांत अल्पसंख्यां-कांचा प्रश्न उलट तीव्र स्वरूपाचा होणार आहे. सध्यां ब्रिटिश हिंदुस्ता-नांत शेंकडा फक्त २५ टक्के मुसलमान आहेत व हा अल्पसंख्यांकांचा प्रश्न सोडविण्यासाठीं हा सारा खटाटोप आहे आणि त्यामुळें या विभागांतील अल्पसंख्य लोकांची संख्या शेंकडा ३४ झाली आहे. अशा सर्व दृष्टीनें पंजाबाची योजना तर्कदुष्ट आणि अव्यवहार्य आहे आणि त्यामुळें अल्प-संख्याकांचा प्रश्न बिलकुल सुटत नाहीं.

## अलीगड योजना.

अलीगड येथील प्रोफेसरद्वयाची योजना वाचली म्हणजे पंजाबीची योजना बरी म्हणण्याची वेळ येते. या योजनेनें सबंध हिंदुस्थानांत मुसलमानांचें अधिराज्य स्थापण्याचा प्रयत्न केला आहे. हैद्राबाद संस्थानांत शेंकडा ९० टक्के लोकसंख्या हिंदूंची असतांना केवळ राजा मुसलमान म्हणून हैद्राबाद संस्थान मुसलमानांचें केंद्र कल्पिलें आहे. पाकिस्तान विभागांतील शेंकडा ६० टक्के मुसलमान बाकीच्यांवर अंमल गाजविणार. त्याचप्रमाणें बंगाल विभागांतील ५७ टक्के मुसलमान ४३ टक्के असणाऱ्या इतर लोकसंख्येवर आपलें राज्य करणार. या योजनेनुसार १२ कोटी लोकसंख्या मुसल्मानी अधिराज्यांत जाणार व २१ कोटी हिंदुस्थानांत राहणार. यापैकीं ५० हजारांच्या वर लोकवस्ती असलेलीं सर्व शहरें वेगळीं काढण्याचीं व त्यांना ' स्वतंत्र शहरें ' करण्याची सूचना आहेच. हैद्राबादचे निझामसाहेब हे या योजनेचे प्राण आहेत व त्या दृष्टीनेंच सर्व योजनेची उभारणी आहे. हिंदुस्थानांतील मुसलमानांचे आणि पाकिस्तानांतील हिंदूंचे अल्पसंख्य या नात्याचे हक्क समान राहतील अशीहि स्थिति नाहीं. हिंदुस्थानांतील मुसलमानांना अल्पसंख्य राष्ट्र म्हणून समजावयाचें आहे. मात्र पाकिस्तानांतील हिंदूंना तो दर्जा द्यावयाचा नाहीं! अशा रीतीनें कोणत्याहि विवेकी माणसाला या योजनेचा निषेधच करणें भाग आहे.

## लतीफ योजना.

मुस्लिम प्रांतांतील हिंदूंनीं हिंदू प्रांतात आणि हिंदु प्रांतांतील मुसलमानांनीं मुसलमान प्रांतांत आपलीं पूर्वीची जमीन, शेतवाडी, घरेंदारें सोडून जावें या धोरणावर या योजनेची उभारणी आहे त्यामुळें ही योजना अव्यवहार्य ठरणारी आहे. हैद्राबाद संस्थानांत कोणतेंहि कारण न दाखवितां मद्रासपर्यंत भाग मद्राससुद्धां जोडण्यांत आला आहे. दिल्ली, लखनौ, कानपूर, आग्रा, कलकत्ता ही हिंदू विभागांतील शहरें मुस्लीम विभागांत घातली आहेत. संस्थानिकांचे आपल्या प्रजेवरील सध्यांचे अमर्याद हक्क असेंच चालू रहाणार असें गृहीत धरलें आहे. एतावता

ही योजना अव्यवहार्य आणि प्रजेच्या हक्कांना जाचक अशी आहे.

## शिकंदर योजना,

सन १९३७ सालीं व त्यानंतर हिंदी लष्करांत शेंकडा ५० टक्के मुसलमानांची आणि विशेषतः पंजाबी मुसलमानांची भरती करण्यांत आलेली आहे व ही गोष्ट सारखी कायम ठेवण्यांत यावी व हिंदी लष्करांतील मुसलमानी वर्चस्व कायम रहावें अशी सर शिकंदर हयातखान यांची मागणी आहे. हैद्राबाद संस्थान हें मुसलमानांचें राखीव कुरण राहील अशीहि तरतूद 'तहांचें संरक्षण' या मुद्दयाखालीं करून घेण्यांत आली आहे. या योजनेंत संस्थानी प्रजेच्या हक्कांची पूर्णपणें पायमल्ली करण्यांत आलेली आहे. मध्यवर्ती प्रधानमंडळांतील लोकशाहीच्या तत्वाला अनुसरून असणारें 'सामुदायिक जबाबदारीचें तत्व' झुगारून देण्यांत आलें आहे. देशाची विभागणी केवळ जातीय तत्वांवर करण्यांत आलेली नाहीं हाच या योजनेंतील चांगुलपणा आहे.

## आंबेडकर योजना

वरीलप्रमाणें पाकिस्तानसंबंधीं चार योजनांचें आपण परीक्षण केलें. आतां डॉ. आंबेडकर यांनीं 'पाकिस्तानवरील विचार' या आपल्या पुस्तकांत मांडलेल्या योजनेचा आपण विचार करूं. हिंदुस्तानांतील मुसलमानांपैकीं बहुतेक मुसलमान हे धर्मांतर करून इस्लामी धर्मांत गेले असल्यामुळें हिंदूंचें आणि त्या त्या प्रांतांतील मुसलमानांचें भाषा, वंश आणि चालीरीति या बाबतींत पुष्कळ साधर्म्य आहे हें विधान डॉ. आंबेडकर यांस मान्य आहे; परंतु भाषा, वंश, चालीरिति आणि समान देशांतील वास्तव्य या गोष्टी एकराष्ट्रीयत्वाला पुरेशा नाहींत.*

---

* As to the argument based on unity of race, unity of language and occupation of a common country the matter stands on a different footing. If these considerations were decisive in making or unmaking a nation the Hindus would be right in saying that by reason of race, community of language and habitant the Hindus and Mussalmans form one nation. As a matter of

एकराष्ट्रीयत्वासाठीं देश, भाषा, वंश, चालीरीति यापेक्षां गतकालीन सुखदुःखांतील समान भागीदारी, एकत्र केलेल्या त्यागानें मिळविलेल्या पूर्ववैभवाच्या सुखस्मृति, आणि तें पूर्व वैभव संभाळण्याची उत्सुकता, एकत्र राहण्याची इच्छा आणि भविष्यकाल सुंदर आणि समर्थ बनविण्यासाठीं आवश्यक त्या त्यागांची तयारी असावी लागते. हिंदुमुसल्मानांच्या नात्याला ही कसोटी लावल्यास हिंदु मुसल्मान हें एक राष्ट्र म्हणून राहाण्यास योग्य नाहींत असा निष्कर्ष ऐतिहासिक पुराव्यावरून आणि सद्यःस्थितीवरून निघतो असे डॉ. साहेबांचें म्हणणें आहे आणि म्हणून पाकिस्तानची आवश्यकता त्यांनीं प्रतिपादिली आहे.

बंगाल आणि पंजाब या दोन प्रांतांच्या सध्याच्या चतुःसीमा बिल्कुल न बदलता पाकिस्तानची योजना आंखण्यांत आली तर त्या योजनेमुळें जातीय प्रश्न मुळींच सुटणार नाहीं, म्हणून त्यांच्या हल्लीच्या चतुःसीमा+ बदलून या दोन प्रांतांतील मुस्लीम बहुसंख्य विभाग त्यांनीं वेगळे केले आहेत. या योजने प्रमाणें पाकिस्तानांत खालील प्रदेशांचा समावेश होतो.

( १ ) वायव्य सरहद्द प्रांत, बलुचिस्तान, सिंध आणि पंजाबमधील हिंदु शीख विभागाचे तेरा जिल्हे सोडून राहिलेल्या सतरा जिल्ह्यांचा पंजाब–या चार प्रांतांचा मिळून एक सलग गट.

सध्यांच्या पंजाबमधील हिसार, कर्नाल, अंबाला, होशियारपूर, जालंदर लुधियाना, फिरोझपूर, अमृतसर वगैरे तेरा हिंदु शीख जिल्हे हिंदुस्तानांत घ्यावयाचे आहेत.

---

historical experience neither race nor language have sufficed to mould a people into a nation.

--Dr. Ambedkar in Thoughts on Pakistan. Page 28

+ If the scheme of Pakistan is to follow the present countries of the provinces, in the North west and in Bengal then certainly it does not eradicate the evils which lie at the heart of the communal problem. It retains the very elements which give rise to it namely the pitting of minority against a majority.

--Ibid Page 106

(२) बंगाल आणि आसाममधील मुस्लिम बहुसंख्य वस्तीचा विभाग एकत्र करावयाचा. सध्यांच्या बंगालमधील पंधरा हिंदु बहुसंख्य जिल्हे हिंदुस्तानमध्यें समाविष्ट होतील आणि पंधरा मुसल्मान बहुसंख्य जिल्हे आणि असाममधील सिल्हेट जिल्हा पाकिस्तानांत येईल.

या पाकिस्तानांत येणाऱ्या मुसलमानांची संख्या डॉक्टर आंबेडकर यांनीं आपल्या पुस्तकांतील पान ११२ वर खालीलप्रमाणें दिली आहे.

**पाकिस्तान व हिंदुस्थान यांमध्यें येणाऱ्या मुस्लीम लोकसंख्येचें कोष्टक**

| पाकिस्तानमधील मुस्लिम लोकसंख्या. | | हिंदुस्तानांतील मुस्लिम संख्या. |
|---|---|---|
| पंजाब | -- १३३३२४६० | (१) ब्रिटिश हिंदुस्तानांतील सध्यांची एकंदर मुस्लिम लोकसंख्या ब्रह्मदेश आणि एडन वगळून:-- ६६४४२७६६. |
| वायव्य प्रांत | -- २२२७३०३ | |
| सिंध | — २८३०८०० | |
| बलुचिस्तान | -- ४०५३०९ | (२) पाकिस्तान व पूर्वबंगाल यांत जाणारी मुस्लिम लोकसंख्या ४७८९७३०१. |
| पूर्व बंगाल | -- २७४९७६२४ | |
| सिल्हेट | -- १६०३८०५ | |
| | ४७८९७३०१ | (३) ब्रिटिश हिंदुस्तानांत खालीं रहाणारी मुस्लिम लोकसंख्या १८५४५४६५. |

हें आंकडे देऊन पाकिस्तान विभक्त झाल्यास हिंदुस्तानांत अंदाजें दोन कोटि मुसल्मान राहतील. त्यामुळें हिंदु-मुस्लिम प्रश्न जरी सर्वस्वी सुटला नाहीं तरी त्यांचें महत्व कमी होवून त्या प्रश्नाची सोडवणूक सोपी व सुलभ होईल असें डॉ. साहेबांनीं पान ११२ वर म्हटले आहे.* याप्रमाणें प्रांतांची विभागणी केली असतांहि पाकिस्तानमध्यें सुमारें एक कोटि

* This distribution of Muslim population in terms of the communal problem means that while, without Pakistan the communal problem involves 6ll crorers of Muslims, after

मुसलमानेतर राहतात व हिंदुस्तानांत दोन कोटी (डॉक्टरसाहेबांच्या मताप्रमाणें) मुसलमान राहतात आणि यामुळें उत्पन्न होणारा अल्पसंख्यांकांचा प्रश्न संपूर्ण सोडविण्यास लोकसंख्येची अदलाबदल करणें हाच मार्ग डॉक्टर आंबेडकर यांनीं पान १०९ वर सुचविला आहे.

वरीलप्रमाणें डॉ. आंबेडकर यांची योजना आहे.

पाकिस्तानच्या ज्या योजना आतांपर्यंत पुढें आल्या आहेत त्या सर्व योजनेंत ही योजना पाकिस्तानच्या ठरावास धरून आहे. डॉ. आंबेडकर यांनीं पाकिस्तानमध्यें जे मुस्लिम प्रांत समाविष्ट केले आहेत ते मुस्लिम लीगच्या या वरील ठरावास अनुसरून आंखलेले आहेत. मात्र पाकिस्तानांतील मुस्लिम लोकसंख्या धरतांना एक कोटि लोकसंख्या पाकिस्तानमध्यें अधिक धरली आहे. वस्तुतः पाकिस्तानांत साडे तीन कोटि मुसलमानांचा समावेश होतो व हिंदुस्थानांत मुस्लीम लोकसंख्या तीन कोटी उरते. यासंबंधीं अधिक विवेचन 'पाकिस्तानची लोकसंख्या' या प्रकरणांत केलें आहे. या डॉक्टरसाहेबांच्या चुकीमुळें हिंदुस्तानांत दोन कोटीच फक्त मुसलमान उरतील आणि त्यामुळें हिंदु-मुस्लिम प्रश्न सोडविण्यास सुलभ होईल हें त्यांचें विधान चुकीचें ठरतें. हिंदुस्तानांत तीन कोटि मुसलमान उरतात व पाकिस्तानमध्यें अल्पसंख्यांकांची संख्या शेंकडा २५ टक्के उरते व हा प्रश्न सुटत नाहीं.

पाकिस्तान आणि हिंदुस्तान असे विभाग करूनहि जो हिंदु-मुस्लिम प्रश्न शिल्लक राहतो तो सोडविण्यासाठीं लोकसंख्येची अदलाबदल करावी असा तोडगा डॉ. साहेबांनीं सुचविला आहे; पण तो तोडगा मान्य होणें

---

Pakistan it will involve only two crores of muslims. Is this to be no consideration for the Hindus who want communal peace ? To me it seems that if Pakistan does not solve the communal problem in Hindustan, it enormously reduces its proportion and makes it of minor significance and much easi-er of peaceful solution.

Ibid Page 112

व अमलांत येणें दोन्हीहि अशक्यच आहे. महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र वगैरे विभागांतील मुसलमानांनीं आपलीं घरें दारें, जमीन जुमला सोडून सिंध वायव्य प्रांतासारख्या ओसाड देशांत स्थलांतर करून रहावयास जावे ही सूचना अव्यवहार्य आहे. पाकिस्तानच्या पूर्ततेसाठीं लोकसंख्येची अदलाबदल करावी कीं काय याबद्दलचा उल्लेख पाकिस्तानच्या ठरावांत नाहीं व त्यासंबंधीं आजपर्यंत मुस्लिम लीगचे जबाबदार अधिकारी मूग गिळूनच बसले आहेत. शिवाय, डॉ. आंबेडकर यांच्या साऱ्या विस्तृत विवेचनांत देशी संस्थानासंबंधीं ओझरता उल्लेखहि नाहीं. देशी संस्थानांचा प्रश्न हाताळल्यास कांहीं गुंतागुंतीचे प्रश्न उत्पन्न होतील असें दिसल्यावरून डॉ. साहेबांनीं हा प्रश्न मुद्दाम बाजूस सारला असावा असें दिसतें.

# पाकिस्तानच्या ठरावांतील दोषस्थळें : : : : ५

पाकिस्तानचा ठराव, पाकिस्तानची पूर्वपिठिका, मुसल्मानांच्या मागण्याचा इतिहास आणि पाकिस्तानच्या निरनिराळ्या सुचविण्यांत आलेल्या योजना यांचे आपण येथपर्यंत निरीक्षण केलें. मुस्लिम लीगनें अधिकृत अशी पाकिस्तानची योजना पुढें मांडलेली नाहीं. परंतु पास झालेल्या पाकिस्तानच्या ठरावांत जीं दोषस्थळें आहेत त्यांची चर्चा या प्रकरणांत करावयाची आहे.

पाकिस्तानच्या ठरावांत खालीलप्रमाणें शब्दयोजना आहे:—"ज्या प्रांतांत मुसल्मान लोकसंख्येनें अधिक आहेत अशा प्रांतांना 'स्वतंत्र राष्ट्रा' चा दर्जा देण्यांत यावा आणि त्यांतील प्रत्येक घटक स्वयंपूर्ण आणि सार्वभौम असावा."*

---

* That the areas in which the Muslims are numerically in a majority. . .should be grouped to constitute 'Independent states' in which the constituent units shall be autonomous and sovereign.

Pakistan resolution of Lahore.

या शब्दयोजनेंतून दोन परस्पर विरोधी अर्थ संभवतात. हे मुस्लिम प्रांत 'स्वतंत्र राष्ट्रें' होणार व हीं राष्ट्रें एका संयुक्त राज्यघटनेंत घटक या नात्यानें सामील होऊन एक पाकिस्तान या नांवाचें संयुक्त घटकांनी बनलेलें राष्ट्र निर्माण करणार. या अर्थाला Constituent units या शब्दयोजनेनें भरपूर पाठिंबा मिळतो; पण हा अर्थ खरा धरल्यास या घटनेखालील प्रत्येक राष्ट्र सार्वभौम (sovereign) होणें शक्य नाहीं. प्रत्येक राष्ट्रानें आपलें सार्वभौमत्व कमी करून आपल्यांतील कांहीं अधिकार मध्यवर्ती सरकारला दिल्याशिवाय संयुक्त राज्यघटना बनूंच शकत नाहीं. परंतु ठरावांत तर units या शब्दाला sovereign हें विशेषण आहे. अशा रीतीनें सार्वभौमत्व आणि घटकत्व या दोन कल्पनांच्या विरोधामुळें या ठरावांत विसंगति उत्पन्न झाली आहे. या ठरावाप्रमाणें सिंध, पंजाब, बंगाल, सरहद्द प्रांत वगैरे स्वतंत्र राष्ट्रें म्हणून राहणार कां ह सर्व पाकिस्तानचे प्रांत होऊन एक पाकिस्तान निर्माण होणार हें या ठरावानें कांहींच स्पष्ट होत नाहीं. हें या ठरावांतील पहिलें दोषस्थळ आहे.

पाकिस्तानच्या योजना मूळ ठरावांतील तिसऱ्या भागांत आहे. आणि दुसऱ्या भागांत व्हाइसरॉयसाहेबांनीं ता. १८-१०-३९ रोजीं जी घोषणा केली त्याबद्दल समाधान व्यक्त केलें आहे आणि ठरावाचा सर्व रोख ब्रिटिश राजसत्तेनें जी नवीन घटना ठरवावयाची ती मुसलमानांच्या संमतीनें ठरवावी असा आहे. त्यामुळें जास्तींत जास्त वसाहतीच्या स्वराज्याचीच या ठरावांत अपेक्षा असणार हें उघड होतें. ब्रिटिश राज्यसत्तेचें छत्र आणि अंमल गृहीत धरून ही नवीन उत्पन्न होणारीं मुस्लिम राष्ट्रें 'स्वतंत्र राष्ट्रें' कशी होणार हें एक गूढच आहे. ब्रिटिश सत्तेच्या अस्तित्वाबद्दल होकारार्थी अगर नकारार्थी या ठरावांत स्पष्ट उल्लेख नाहीं उलट ठरावाचा रोख ब्रिटिशसत्तेचें अस्तित्व मानण्याकडेच आहे. हें या ठरावांतील दुसरें दोषस्थळ आहे.

संयुक्त राज्यघटनेची जी योजना १९३५ च्या कायद्यानें स्वीकारली होती ती मुसलमानांना बिलकुल कबूल नाहीं असें ठरावांतील पहिल्या विभागांत सांगितलें आहे.

सन १९३५ च्या कायद्याप्रमाणें जी संयुक्त राज्यघटना अस्तित्वांत यावयाची होती तींत ब्रिटिश हिंदुस्थान आणि देशी संस्थानें या दोघां-चाहि समावेश होणार होता अर्थात ठरावाच्या तिसऱ्या विभागांत पाकि-स्तानचें जें तत्व म्हणून सांगितलें आहे तें तत्व ब्रिटिश हिंदुस्थान आणि देशी संस्थानें या दोघांनांहि लागू करावयाचें असा ध्वनि निघतो; पण तशी स्पष्ट शब्दयोजना ठरावांत नाहीं त्यामुळें खालील प्रश्न अनिश्चित स्वरूपांत राहतात

( १ ) पाकिस्तानची योजना देशी संस्थानांना लागू करावयाची कीं नाहीं ? केल्यास ती कोणत्या पद्धतीनें करावयाची ?

( २ ) हिंदु राजा असतांहि प्रजेंत मुसल्मान बहुसंख्यांक आहेत म्हणून काश्मीर पाकिस्तानांत समाविष्ट करावयाचें कीं नाहीं ?

( ३ ) बहुसंख्य प्रजा मुस्लिम आहे म्हणून काश्मीर पाकिस्तानांत धरलें तर त्याच न्यायानें बहुसंख्य प्रजा हिंदू म्हणून हैद्राबाद, भोपाळ हीं संस्थानें हिंदुस्थानांत आली पाहिजेत कीं नाहीं ? पाकिस्तानच्या कांहीं योजनेंत हैद्राबाद हें दक्षिणेंतील मुसल्मानांचें केंद्र होणार असें म्हटलें असल्यामुळें या प्रश्नाचा निश्चित निर्णय होणें अगत्याचें आहे. जें तत्व अंमलांत आणावयाचें तें सर्व प्रांतांनां आणि सर्व देशी संस्थानांनां सारख्याच रीतीनें आणि एकाच वेळीं लागू करण्यांत येईल याबद्दल स्पष्ट खुलासा होणें आवश्यक आहे. देशी संस्थानांसंबंधीं अनुल्लेख हें या ठरावांतील तिसरें दोषस्थळ आहे.

मुस्लिम प्रांतांतून तेथील हिंदु वगैरे अल्पसंख्यांकांशीं विचारविनिमय करून धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय, राज्यकारभारविषयक आणि इतर हक्कांसंबंधीं आणि हितासंबंधीं पुरेशीं, परिणामकारक आणि बंधनकारक संरक्षणें कायद्यांत स्पष्टपणें नमुद करण्यांत यावीत व त्याच-प्रमाणें ज्या प्रांतांत मुस्लिम अल्पसंख्य आहेत त्या प्रांतांत मुसल्मानांना वरीलप्रमाणें संरक्षणें मिळावीत असें ठरावांत म्हटलें आहे. ही सर्व भाषा केवळ दरबारी वाटते. धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय, राज्यकारभारविषयक बाबतींतील संरक्षणें मिळाल्यानंतर ज्यांना

संरक्षण पाहिजे असे ' इतर हक्क आणि हितसंबंध ' कोणते शिल्लक राहतात तें कळत नाहीं. तेव्हां संरक्षणाच्या बाबी तपशीलवार ठरल्या पाहिजेत व तीं संरक्षणें कायद्यांत कशी नमूद करावयाचीं तेंहि ठरलें पाहिजे. वरील यादीप्रमाणें अल्पसंख्यांकांशीं विचारविनिमय करून संरक्षणें दिल्यांस बहुसंख्यांकांना काय शिल्लक राहील याचा अंदाजच लागत नाहीं. अल्पसंख्यांकांनां द्यावयाच्या संरक्षणाची तपशीलवार माहिती अजून लीगच्या ठरावानें नेमलेल्या कमिटीनें दिली नाहीं हें चौथें दोषस्थळ आहे.

पाकिस्तानच्या ठरावाच्या शेवटीं खालील शब्दयोजना आहे. " संरक्षण, परराष्ट्रीय राजकारण, दळणवळणाची साधनें, जकात आणि इतर सर्व बाबतींतील अधिकार ही अखेरीस या नवीन स्वतंत्र राष्ट्रांना उपभोगतां यावीत या दृष्टीनें वरील मूलभूत सिद्धांतावर आधारलेली नवीन राजकीय घटना आखण्यासाठीं हें अधिवेशन लीगच्या कार्यकारी मंडळास अधिकार देत आहे " म्हणजे पाकिस्तानच्या योजनेस अनुसरून जीं स्वतंत्र राष्ट्रें निर्माण व्हावयाची आहेत त्यांच्या हातांत संरक्षण, परराष्ट्रीय राजकारण, जकात, दळणवळणाचीं साधनें वगैरे बाबतींतील अधिकार अखेरीस ( finally ) यावयाचे आहेत. याचाच अर्थ असा कीं सुरवातीस हे सर्व अधिकार या स्वतंत्र राष्ट्रांच्या हातीं नसणार. संरक्षण, परराष्ट्रीय राजकारण वगैरे सर्व महत्वाच्या बाबतींत प्रथमतः अधिकार नसलेलीं अशीं हीं स्वतंत्र राष्ट्रें निर्माण होणार आहेत ! ' स्वतंत्र राष्ट्र ' या शब्दांची यापेक्षां अधिक ती थट्टा कोणती ? यांत नमूद केलेली अखेरीची वेळ कोणी ठरवावयाची ? मध्यंतरीच्या काळांत हे अधिकार या स्वतंत्र राष्ट्रासाठीं कोणी आणि कसें गाजवावयाचे ? या साऱ्या प्रश्नांचा खुलासा या ठरावांत नाहीं. हें या ठरावांतील पांचवें दोषस्थळ आहे पाकिस्तानच्या कैवाऱ्यांनीं ठरावांतील दोषस्थळें नाहींशी केली पाहिजेत. एरव्हीं पाकिस्तानची योजना विचारार्ह होईल कीं नाहीं याची शंकाच आहे.

——::——

# पाकिस्तान—
# मुस्लिम लीगची बाजू : : : : : ६

पाकिस्तानच्या बाजूनें मुस्लिम लीगच्या वतीनें जी विचारसरणी पुढें येत आहे ती विचारसरणी यथार्थ रीतीनें या प्रकरणांत मांडण्याचा विचार आहे. पाकिस्तानचा विचार करण्यापूर्वी पाकिस्तानची बाजू समजून घेणें जरूरीचें आहे. पाकिस्तानच्या वतीनें खालील प्रमाणें विचारसरणी पुढें येते:—

ब्रिटिश राजसत्तेचा हिंदुस्तानांत उदय होण्यापूर्वी येथें मुस्लिम राज्य नांदत होतें. हिंदुस्तानांत मुसलमान जेते म्हणून आले आणि साम्राज्य गाजविणारे म्हणून नांदले. मुस्लिम सत्तेचा पाडाव करून ब्रिटिश राजसत्ता येथें प्रस्थापित झाली व मुसलमानांचे महत्व अगदीं कमी झाले. हिंदुस्तानचे राजे म्हणून वावरणारे मुसलमान हिंदूंच्या बरोबर ब्रिटिशांच्या गुलामगिरीत बांधले गेले. हिंदूंनीं ब्रिटिश राजसत्तेचा फायदा घेतला. इंग्रजी शिक्षण घेऊन ब्रिटिश सरकारच्या नोकरींत हिंदु घुसले आणि या बाबतींत त्यांनीं पुढारीपण मिळविलें. शिक्षणांत हिंदु पुढारलेले झाले. संख्येनें आणि आर्थिक दृष्ट्या ते मुसलमानांना भारी होतेच. अशा

रीतीनें संख्याबलानें, राजकीय सत्तेनें, शैक्षणिक पुढारीपणानें, आर्थिक वर्चस्वानें हिंदुसमाज मुसलमान समाजाची गळचेपी करूं लागला. मुसलमानांना कोणत्याहि बाजूनें आपली प्रगती करून घेणें अशक्य होऊं लागले. वर्तमानपत्रासारखी प्रसिद्धीची आणि लोकशिक्षणाची सर्व साधनें हिंदूंच्या हातीं असल्यामुळें हिंदूंनीं मुसलमानांवर केलेल्या अत्याचारांना वाचाहि फुटूं शकली नाहीं. अशा प्रकारें बहुसंख्य हिंदूंकडून कोंडमारा होऊं लागल्यामुळें मुसलमानांसारख्या पराक्रमी आणि वर्धिष्णु समाजाला हिंदुस्तानांत दुय्यम जमात म्हणून जगण्याचा प्रसंग येऊं लागला. या हिंदू आक्रमणापासून समाजाचें रक्षण व्हावें व त्याची उन्नति व्हावी म्हणून मुस्लिम समाजाला चळवळ सुरूं करावी लागली व त्यासाठीं ब्रिटिश सरकारकडे वेळोवेळीं संरक्षणें मागावी लागली. पहिल्या प्रथम मुसलमानांना स्वतंत्र प्रतिनिधित्व मिळालें. पुढें स्वतंत्र प्रतिनिधित्व आणि स्वतंत्र मतदारसंघ मिळाला. परंतु पंजाब, बंगालसारख्या प्रांतांत मुस्लिम बहुसंख्य असूनहि योग्य प्रमाणांत प्रतिनिधित्व मिळालें नाहीं आणि त्यामुळें स्वतंत्र मतदारसंघ आणि स्वतंत्र प्रतिनिधित्व याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. पुढें मुंबई इलाख्यांतून सिंध वेगळा करण्यासाठीं, बलुचिस्थान आणि वायव्य सरहद्द प्रांत यांना प्रांतीय अधिकार देण्यासाठीं आणि पंजाब, बंगालमध्यें मुसलमानांचें बहुमत असावें यासाठीं मुसलमान समाजानें चळवळ आरंभली. नंतर सिंध वेगळा झाला. वायव्य सरहद्द प्रांताला प्रांतीय अधिकार मिळाले आणि सर्वत्र प्रांतीय स्वायत्ततेचें राज्य सुरूं झालें. या प्रांतीय स्वायत्ततेंत सर्व प्रांतांतून मुसलमानांना भागीदारी मिळेल अशी मुसलमान समाजाची भावना व अपेक्षा होती. राष्ट्रीय सभा बहुमतांत आली तरी ती मुस्लिम हितविरोधी कोणतीहि गोष्ट करणार नाहीं, उलट मुस्लिम समाजाच्या हितास जागरूक राहील अशी उमेद मुस्लिम समाज बाळगून होता. पण ही उमेद फोल ठरली. कॉंग्रेस आणि हिंदुमहासभा यांच्या कृतींत कांहींच फरक आढळून आला नाहीं. हिंदुमहासभा जें नुस्ती बोलली तेंच प्रत्यक्ष कॉंग्रेसनें कृतींत उतरविलें. कॉंग्रेसचे बोल गोड आणि सभ्य असतात एवढेच. " हिंदुस्थान हिंदूंचाच

आहे व हिंदूंचेच राज्य या देशांत राहणार " असें स्पष्टपणें बजावून हिंदु-महासभा मुस्लिम समाजाला जागृत तरी करते. उलट हिंदु-मुसलमान हे भाऊ भाऊ आहेत असें म्हणून आणि क्षुद्र सत्तेसाठीं लालचावलेल्या मुसलमान समाजांतील कांहीं उल्लूंना ( show boys ) हाताशीं धरून कॉंग्रेस आपलें कार्य साधतें. मुसलमान समाजांत भेद पाडणें आणि या भेदाच्या जोरावर सबंध हिंदुस्थानांत हिंदूंचें अधिराज्य चालविणें हाच हिंदूंची प्रतिनिधिभूत संस्था जी कॉंग्रेस तिचा कुटिल डाव आहे. हिंदु हे बहुसंख्य असल्यामुळें मध्यवर्ती सत्तेत हिंदूंचें म्हणजेच कॉंग्रेसचें बहुमत होणार व या बहुमताच्या जोरावर मध्यवर्ती सत्तेतहि हिंदूच प्रभावी होणार हें उघड आहे. अशा रीतीनें सर्व हिंदुस्थानांत हिंदूंचें अधिराज्य होऊन मुसलमानांना गुलाम म्हणून राबण्याचा प्रसंग येणार अशी भीति मुसलमान समाजाला दिसूं लागली. कॉंग्रेसच्या दोन वर्षांच्या राजवटीनें या भीतिला बळकटी आणली व हिंदुस्थानांत यापुढें मुस्लिम धर्म, मुस्लिम संस्कृति, मुस्लिम भाषा जगणें शक्य नाहीं असें दिसून आले. हिंदुस्थानांत जगावयाचे असेल तर हिंदूपासून वेगळे होऊन, मुस्लिम प्रांत स्वतंत्र तोडून घेऊन, पाकिस्तान निर्माण करूनच जगणें शक्य आहे एरव्ही नाहीं. सुरवातीस हिंदुसमाज नीट रीतीनें वागेल अशा कल्पनेनें अल्पसंख्यांक म्हणूनच मुसलमान समाजानें आपलें हक्क मागितले. परंतु मूळपासुन हिंदू आणि मुसलमान हीं दोन राष्ट्रें आहेत, त्यांचे धर्म, संस्कृति, भाषा, आचार विचार, जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन भिन्न आहेत याची जाणीव मुसलमान समाजाला होती. परंतु या जाणीवेनें प्रेरित होऊन स्वतंत्र राष्ट्र या नात्यानें तो समाज मागणी करीत नव्हता. ब्रिटिशांच्या गुलामगिरीशिवाय हिंदुस्थानांतील हिंदूंत आणि मुसलमानांत दुसरें कोणतेंहि साधर्म्य नाहीं. हिंदूंचा आणि मुसलमानांचा पूर्वेतिहास भांडणाचा, लढाईचा आहे. जित आणि जेते असाच त्यांचा संबंध आलेला आहे. हिंदु-मुसलमानांनीं मिळून कोणतीहि सुखदुःखें भोगलेलीं नाहींत. मुसलमानांनां आजहि हिंदूंबरोबर एकत्र रहावें असें वाटत नाहीं.

हिंदु आणि मुसलमान हीं दोन राष्ट्रें आहेत ही गोष्ट हिंदूमहासभेचे अध्यक्ष श्री. सावरकर यांनांहि मान्य आहे. अशा स्थितींत एकत्र राहून एकमेकाच्या पायांत पाय घालून एकमेकांनां पाडीत बसण्यापेक्षां किंवा गुलाम म्हणून राहण्यापेक्षां ज्या प्रांतांतून मुस्लिम बहुसंख्य आहेत तें प्रांत वेगळे तोडून घेऊन पाकिस्तानांत रहाण्याची मुसलमानांनी इच्छा दर्शविली तर त्यांत बिघडलें कोठें ? हिंदुस्थानांतील हिंदु-मुसलमानांचा प्रश्न सुटण्यास आणि हिंदु आणि मुसलमान या दोन्ही राष्ट्रांनां आपा-पल्या परीनें आपली उन्नति करून घेण्यास हिंदुस्थानचे दोन भाग पाडणें हाच एक उपाय आहे.

# पाकिस्तान आणि हिंदु महासभा : : : : : ७

हिंदुमहासभेची संस्थापना हिंदुसमाजाची सामाजिक आणि तत्सम उन्नत्ति करण्यासाठीं झाली. सुरवातीस हिंदुमहासभा राजकारणांत भाग घेत नसे, परंतु श्री. सावरकर हे हिंदुमहासभेचे अध्यक्ष झाल्यापासून हिंदु महासभेचा सारा नूर पालटला आहे. हिंदुमहासभा ही सामाजिक संस्था आहे ही गोष्ट त्यांनीं नाकबूल केली आहे. सर्व बाबतींतील राजकीय, धार्मिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक–हिंदुसमाजाचें हितसंरक्षण करण्यासाठीं व हिंदुसमाजास बलिष्ठ करण्यासाठीं हिंदुमहासभेचें अस्तित्व आहे. हिंदुत्व रक्षणासाठीं हिंदुस्तानचें स्वातंत्र्य मिळविणें हेंहि हिंदुमहासभेचें ध्येय आहे.। हिंदुमहासभेच्या अध्यक्षपदावरून भाषण करतांना स्वातंत्र्यवीर सावरकरांनीं पाकिस्तानच्या कल्पनेचा तीव्र निषेध केला आहे व सर्वथा विरोध करण्याची सिद्धता दर्शविली आहे. " या भारताचें, या आर्यावर्ताचें नांव आम्हां हिंदूंचा देश म्हणून हिंदुस्तानच राहिले पाहिजे. आमच्या देशाची राष्ट्रीय भाषा नागरी लिपींत लिहिली जाणारी संस्कृतनिष्ठ हिंदीच पाहिजे. हिंदुत्व रक्षणासाठीं व हिंदुत्वाचें संवर्धन

करण्यासाठीं आम्हांस स्वराज्य–स्वातंत्र्य पाहिजे. हिंदुस्तान हें अखंड, अविभाज्य आहे व तें तसेंच राहणार आहे.

आ सिंधु सिंधुपर्यंता यस्य भारत भूमिका।
पितृभूः पुण्यभूश्चैव स वै हिंदुरिति स्मृतः।

अशी आमची हिंदू शब्दाची व्याख्या आहे. या व्याख्येंत हिंदु, शीख, आर्यसमाजी, जैन, बुद्ध वगैरे हिंदुस्तानांतील सर्व लोक येतात. मुसलमान आणि इतर अल्पसंख्यांक जमाती यांचेविरुद्ध आमचें धोरण उग्रतेचें राहणार नाहीं. परंतु त्यांचे कोणत्याहि प्रकारें लाड पुरविले जाणार नाहींत. प्रत्येक माणसाला एक मत हीच आमची नीति राहील. स्वतंत्र प्रतिनिधि, स्वतंत्र मतदारसंघ वगैरे गोष्टी आम्हांस कबूल नाहींत. नोकरीमध्यें फक्त लायकीचाच विचार केला जाईल. धर्म, जात वगैरे अन्य गोष्टींचा नोकरीशी कोणताहि संबंध नाहीं. प्रत्येकाला आपला धर्म, स्वतःच्या घरीं राष्ट्राच्या हिताशीं अविरोधी अशा रीतीनें पाळण्याचा हक्क आहे. धर्म, संस्कृति आणि या संबंधींचे अल्पसंख्यांकांचे योग्य ते अधिकार मानण्यास आम्ही तयार आहोंत व त्याबद्दल अल्पसंख्यांकांनां आश्वासनहि देण्यास तयार आहोंत. या पलीकडे अल्पसंख्यांकाचे लाड पुरविण्यास आम्ही सिद्ध नाहीं. स्वातंत्र्य संग्रामांत मुसलमान आले तर त्यांच्यासह, उदासीन राहिले तर त्यांनां वगळून, विरोधी झाले तर त्यांच्या विरोधाला न जुमानतां हिंदु राष्ट्र आपलें स्वातंत्र्ययुद्ध पुढें चालूं ठेवण्यास समर्थ आहे. एखाद्या प्रांतांत मुसलमान बहुसंख्य आहेत म्हणून किंवा त्यांचा धर्म वेगळा आहे म्हणून त्यांनां हिंदुस्थानचीं शकलें करण्याचा काडीमात्र अधिकार पोंचत नाहीं. हिंदूंचा हिंदुस्थान हा अखंड अविभाज्य आणि हिंदूंचाच राहिला पाहिजे" वरीलप्रमाणें स्वातंत्र्यवीर सावरकर आणि हिंदू महासभा यांची विचारसरणी आहे.

लोकनायक बापूजी अणे यांच्या अध्यक्षतेखालीं 'हिंदु लीग' या नांवाची संस्था स्थापन झाली होती. जातीय निवाड्याच्या विरोधाची देशव्यापी चळवळ करणें हें या हिंदु लीगचें मुख्य काम होतें. लोकनायक अणे आणि

हिंदु लीग यांनींहि पाकिस्तानच्या कल्पनेला पूर्णपणें विरोध केला आहे. हिंदुशासित प्रांतांतून काँग्रेसच्या राजवटींत मुसलमानांवर अत्याचार झाले ही मुसलमानांनीं उठविलेली खोटी हूल आहे. उलट सिंध, पंजाब आणि विशेषतः बंगालमधील मुस्लिम लीगच्या मंत्र्यांनीं हिंदुहितविरोधी केलेल्या कारवाया प्रसिद्धच आहेत असें हिंदू लीगचें म्हणणें आहे. नैसर्गिक रीतीनेंच हिंदुस्तान हें एकराष्ट्र आहे. हिंदुस्तानची भौगोलिक परिस्थितीच हिंदुस्तानचें एकराष्ट्रीयत्व सिद्ध करण्यास पुरेशी आहे. हजारों वर्षांपासून हिंदुस्तान हें एक राष्ट्र या नात्यानें संबोधण्याची ऐतिहासिक परंपरा आहे. हिंदुस्तानखेरीज ( यांतच नेपाळ येतों ) हिंदूंची अशी दुसरी कुठेंहि भूमि नाहीं. अखंड, सलग आणि अविभाज्य अशा हिंदुस्तानचे वारसदार हिंदूच आहेत. या पुण्य आणि पवित्र भूमींतील कोणताहि प्रदेश आपल्या ताब्यांतून जाऊं देण्यास हिंदु कालत्रयींहि तयार होणार नाहीं अशी थोडक्यांत हिंदुमहासभेची आणि हिंदु लीगची विचारसरणी आहे.

---

८

## पाकिस्तान आणि राष्ट्रीय सभा : : : : ८

राष्ट्रीय सभेनें अलाहाबादच्या ठरावापर्यंत पाकिस्तानसंबंधीं कोणत्याहि प्रकारचा ठराव केलेला नव्हता. परंतु राष्ट्रीय सभेच्या कांहीं पुढाऱ्यांनीं पाकिस्तानबद्दल आपलीं वैयक्तिक मतें सविस्तरपणें मांडली आहेत. त्यावरून अलाहाबादेचा ठराव होईपर्यंत कॉंग्रेसमधील प्रमुख पुढाऱ्यांची पाकिस्तानसंबंधीं काय मतें होतीं हें कळून येईल. पाकिस्तानची योजना अस्पष्ट आणि अपुरी आहे. तिचा तपशील अद्यापि मुस्लिम लीगनें दिलेला नाहीं, त्यामुळें राष्ट्रीय सभेच्या कार्यकारी मंडळानें अनौपचारिक रीतीनें सुद्धां या पाकिस्तानची चर्चा केलेली नाहीं असें डॉक्टर राजेंद्रप्रसाद यांनीं मुस्लिम लीगचे अध्यक्ष जनाब जीना यांना लिहिलेल्या उत्तरांत म्हटलें आहे. महात्मा गांधी, डॉक्टर राजेंद्रप्रसाद, चक्रवर्ती राजगोपाळ, आचार्य कृपलानी वगैरे राष्ट्रीय सभेच्या पुढाऱ्यांनीं आपल्या लेखांतून आणि मुलाखतींतून पाकिस्तानबद्दल प्रासंगिक विचार प्रगट केलेले आहेत. राष्ट्रीय सभेचे सर चिटणीस आचार्य कृपलानी यांना ता. १२-५-१९४१ रोजीं नागपूर येथें 'युनायटेड प्रेस' च्या प्रतिनि-

धीनें 'पाकिस्तानबद्दल काँग्रेसचें अधिकृत धोरण काय आहे' असा प्रश्न विचारला. "पाकिस्तानची योजना अस्पष्ट आणि अपुरी आहे. तिचा तपशील दिलेला नाहीं. ती काँग्रेसकडे विचारासाठीं पाठविण्यांत आली नाहीं. अशा तपशिलाशिवाय या योजनेसंबंधीं काँग्रेसला मत देणें शक्य नाहीं. शिवाय काँग्रेस कांहीं सत्ताधीश नाहीं. सत्ताधीश ब्रिटिश सरकार आहे. पाकिस्तानची मागणी त्यांच्याकडे करावयाला पाहिजे" असे त्यांनी उत्तर दिलें. पाकिस्तानची मागणी मान्य झाली तर त्याचा हिंदुस्थानच्या ऐक्यावर आणि अविभाज्यतेवर काय परिणाम होईल याबद्दल खुलासा करितांना ते म्हणाले, "ब्रिटिश सरकारला वाटलें तर तें जनाब जीनांना 'पाकिस्तान' अगर आणखी एखादें स्थान देतील. हिंदुस्तानांत ६५० संस्थानें आहेत त्यांत आणखी एकाची भर पडेल. या ६५० संस्थानांनीं हिंदुस्तानच्या ऐक्यावर आणि अविभाज्यतेवर जितका क्षुद्र परिणाम केला तितकाच याहि आणखी एका संस्थानानें होईल."

जर काँग्रेस श्रेष्ठींची दृष्टि याप्रमाणें होती तर मग पाकिस्तानच्या योजनेचा तपशील द्या अशी मागणी डॉक्टर राजेंद्रप्रसाद यांनीं कां केली या प्रश्नाचें उत्तर देतांना ते म्हणाले, "कदाचित या योजनेचा तपशील मांडण्याचा प्रयत्न झाला तर तिची अव्यवहार्यता आणि अशक्यता जनाब जीनांना दिसून येईल असें डॉ. राजेंद्रप्रसाद यांस वाटलें असावें." यावरून काँग्रेस श्रेष्ठींना पाकिस्तानची मागणी अव्यवहार्य आणि अशक्य वाटते हें उघड दिसतें.

डॉ. राजेंद्रप्रसाद यांनीं हिंदुस्तान टाइम्सच्या खास अंकांत हिंदुस्तानच्या विभागणीच्या योजना या शीर्षकाखालीं लेख लिहिला होता. 'पाकिस्तान' या नांवाच्या पुस्तकांत तो लेख पुनर्मुद्रित करण्यांत आला आहे. त्या पुस्तकांत व नंतर जनाब जीना यांस ता. १९–४–४१ रोजीं दिलेल्या उत्तरांत त्यांनीं पाकिस्तानसंबंधीं आपले विचार स्पष्टपणें मांडले आहेत. पाकिस्तानचे आग्रही त्या योजनेचा पुरस्कार करितांना जी



नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

तात्विक भूमिका मांडतात ती डॉ. राजेंद्रप्रसाद यांना संमत नाहीं.* हिंदु आणि मुसलमान हीं दोन स्वतंत्र राष्ट्रें नाहींत. भौगोलिक, नैसर्गिक, आणि स्वभावतः हिंदुस्तान हा एकच देश आहे. हिंदुस्तानच्या तिन्ही बाजूला समुद्र आणि चौथ्या बाजूला हिमालयाची अभेद्य तटबंदी मिळाली आहे. रामायणकालापासून, मोगल राजवटी धरून, ब्रिटिश सत्तेपर्यंत हिंदुस्तान हा एक देश मानण्यांत आला आहे. म्हणून हिंदु आणि मुसलमान हे धर्मानें भिन्न आहेत यासाठीं हिंदुस्तानची विभागणी करणें योग्य नाहीं. मुसलमानांचें धार्मिक आणि सांस्कृतिक हक्क संरक्षण होणें आवश्यक आहे तसेंच देशाच्या राज्यकारभारांतहि त्यांना योग्य तो हिस्सा मिळणें रास्त आहे परंतु त्यासाठीं त्यांनीं आपण हिंदी आहोंत हें विसरतां कामा नये." अशी तात्विक भूमिका डॉ. राजेंद्रप्रसाद यांनीं मांडली आहे.

पाकिस्तानची योजना प्रत्यक्ष व्यवहारांत आणण्याचा प्रयत्न केला तर काय काय अडचणी उत्पन्न होतील याचाहि प्रपंच त्यांनीं आपल्या 'पाकिस्तान' वरील लेखांत आणि जनाब जीना यांना दिलेल्या उत्तरांत केला आहे. या योजनेमुळें हिंदु-मुस्लिम प्रश्न सुटत नाहीं कारण पाकिस्तान मध्यें हिंदु आणि शीख अल्पजमाती म्हणून राहतात व हिंदुस्तानांतहि

* It is equally untrue that Hindus & Muslims constitute two different nations. . .It is wrong to say that India is not one country. . .Physically, Geographically and naturally India is one country. . .The Muslims have every right to insist that they shall not be interfered with in the observance of their religious rites and worship. . .That even in the administration of the country they shall have their due share. . .All these should be guaranteed and respected. . .But that does not mean and ought not to mean that they ceased to be Indians.

Dr. Rajendra Prasad on 'Pakistan' Pages 25 to 29.

Vangaurd Booklets.

मुस्लिम अल्पसंख्य म्हणून उरतात.* हिंदु आणि काँग्रेस मुसल्मान अल्पसंख्य म्हणून त्यांच्यावर अधिकार गाजवूं पाहतात ही जनाब जीनांची तक्रार आहे. त्याविरुद्ध पाकिस्तान निर्माण करून किती हिंदु आणि इतर यांना मुसलमानांच्या अधिकाराखालीं घेण्याचा त्यांचा विचार आहे असा रोकडा सवाल जनाब जीनांना डॉ. राजेंद्रप्रसाद यांनीं केला आहे.+ पाकिस्तान आणि हिंदुस्तान यांमध्यें उरणारी अल्पसंख्य हिंदुमुसल्मानांची संख्या ही परस्परांच्या हक्कसंरक्षणाची ओलीस म्हणून राहील व मुसल्मानांवर हिंदुस्तानांत अत्याचार झाला तर पाकिस्तानमधील हिंदूंना त्याचे परिणाम भोगावे लागतील ही शक्यता त्यांच्या हक्कसंरक्षणाला पुरेशी नाहीं. कारण एखाद्या देशाला स्वतंत्र आणि सार्वभौम सत्तेचा दर्जा दिल्यानंतर या प्रकारच्या भीतीनें तें राष्ट्र आपलें धोरण आंखील हें संभवनीय नाहीं. त्याचप्रमाणें संरक्षण, परराष्ट्रीय राजकारण या बाबतींत अनेक गुंतागुंतीचे प्रश्न उत्पन्न होतात त्याचाहि विचार होणें आवश्यक आहे असें डॉ. प्रसादांचें म्हणणें आहे. ता. १६-४-४१ रोजीं काढलेल्या पत्रकांत डॉ. राजेन्द्रप्रसाद यांनीं पाकिस्तानच्या योजनेला आपला विरोध स्पष्ट शब्दांत जाहीर केला आहे " काँग्रेसला हिंदूंचे राज्य स्थापन करून त्यासाठीं मुसलमानांची गळेचेपी करावयाची आहे अशी बॅ. जीनांची नेहमींची तक्रार आहे; परंतु त्यांत

* Mr. Jinha is constantly complaining that the Hindus and the congress aim at subjecting the Muslims to Hindu rule. To use his own words, how many Hindus and other non muslims and what areas does he want to subject to muslim rule in these two zones?"

Statement of Dr. Prasad 19-4-41.

+ The whole edifice of reciprocity which is contemplated in the safeguards falls to the ground once you admit the independent and sovereign status of the two states and regard them as independent countries.

Ibid.

कांहीं तथ्य नाहीं. " असें या पत्रकांत डॉ. राजेन्द्रप्रसाद यांनीं म्हटलें आहे. पाकिस्तानची योजना कशी अव्यवहार्य आहे हें दाखवितांना ते पुढें म्हणतात, "पाकिस्तानच्या योजनेंत सरहद्द प्रांत, पंजाब, सिंध, बलुचिस्तान आणि बंगाल हे प्रांत बॅ. जीनांच्या योजनेप्रमाणें येतात. या प्रांतांचें क्षेत्रफळ २८८९९८ चौरस मैल असून लोकसंख्या ८०२८३९३१ आहे व उत्पन्न रुपये ६०५६३८३२६ आहे. हे प्रांत सोडून उरलेल्या हिंदुस्तानचें क्षेत्रफळ ६०७६५७ चौरस मैल असून लोकसंख्या १७५०१३९१९ होईल व उत्पन्न रुपये ९६२६९५२९६ होईल. या दोन्ही प्रांतांच्या उत्पन्नांवरून व लोकसंख्येवरून राष्ट्राचें संरक्षण करण्यास जें मनुष्यबळ आणि आर्थिक बळ लागतें तें पुरेसें होईल असें बॅ. जीनांचें म्हणणें आहे काय? या सर्व आंकडेवारीवरून पाकिस्तानची योजना किती अव्यवहार्य आहे हें कळून येईल." वरीलप्रमाणें डॉ. राजेंद्रप्रसाद यांचे पाकिस्तानबद्दलचें मत आहे. श्री. चक्रवर्ती राजगोपाळाचार्य यांनींहि आपलें मत या प्रश्नासंबंधीं व्यक्त केलें आहे. "हा मुलगा माझा आहे" असें दोन स्त्रिया म्हणूं लागल्या व शेवटीं हा प्रश्न न्यायाधिशाकडे गेला. हा मुलगा दोघींचाहि दिसतो, तेव्हां मुलाला कापून अर्धा अर्धा भाग प्रत्येकीस देण्यांत यावा असा निर्णय न्यायाधीशानें केला. त्याबरोबर खऱ्या आईला रडें कोसळलें आणि ती म्हणाली, "महाराज, मुलाच्या केसाला धक्का लावूं नका. तो सर्वस्वी त्या बाईच्या ताब्यांत द्या. माझी कांहींच तक्रार नाहीं" या प्रकारामुळें न्यायाधीशाला निर्णय करणें सोपे झालें व तो मुलगा त्यानें खऱ्या आईच्या हवाली केला. या जुन्या गोष्टीची आठवण जनाब जीनांच्या हिंदुस्तानची छकलें करण्याच्या मागणीनें आपणांस झाली. हिंदुस्तानची चिरफाड व्हावी या कल्पनेनें महात्माजींचें अंतःकरण व्याकूळ झालें आहे पण जनाब जीनांना त्याचें काय होय? पाकिस्तानच्या योजनेनें पंजाब आणि बंगालमधील अल्पसंख्यांकांचा प्रश्न जशाचा तसाच राहतो मग ही योजना कशासाठीं? उद्यांचें मध्यवर्ती सरकार हें हिंदुमताधीन होण्याचा संभव आहे. त्यामुळें मुस्लिम प्रांताच्या प्रगतीला मध्यवर्ती सरकारकडून अडथळा येण्याची शक्यता आहे. हें

होऊं नये आणि मुस्लिम प्रांतांना स्वतःची प्रगति स्वतःच्या इच्छेप्रमाणें आणि कल्पनेप्रमाणें भरपूर करतां यावी हें बॅ. जीनांचें मनोगत दिसतें असें मला वाटतें. यासाठीं हिंदुस्तानच्या विभागणीखेरीज इतर योजना बॅ. जीना कां पुढें आणीत नाहींत ?" असें आपलें मत चक्रवर्ती राजगोपालाचार्य यांनीं मांडलें आहे. महात्माजींचें मत थोडक्यांत खालीलप्रमाणें आहे. "इतर हिंदुस्थानप्रमाणें मुसलमानांनांहि स्वयंनिर्णयाचा हक्क असला पाहिजे. आपण सध्यां एकत्र कुटुंबी आहोंत. एकत्र कुटुंबांतील कोणालाहि वांटणी मागण्याचा हक्क असतो. पण प्रत्यक्ष निर्णय करण्याचा जेव्हा प्रसंग येईल त्यावेळीं मुस्लिम जनता हिंदुस्तानच्या फाळणीचा आग्रह धरील हें मला खरें वाटत नाहीं. त्यांचा समंजसपणा या आग्रहापासून त्यांना परावृत्त करील. त्यांचा स्वार्थच त्यांना ही मागणी करूं नका असें सांगेल. या फाळणीमुळें होणाऱ्यां आत्मनाशापासून मागें सरा असें त्यांचा धर्मच त्यांनां बजावील. "हिंदुस्तानांत दोन राष्ट्रें आहेत" हा युक्तिवाद असत्य आहे. हिंदुस्तानांतील मुसलमानांपैकीं पुष्कळ मुसलमानांनीं धर्मांतर करून इस्लाम धर्म स्वीकारलेला आहे किंवा अशांचेंच ते वंशज आहेत. धर्म बदलल्याबरोबर त्यांचे कांहीं स्वतंत्र राष्ट्र होत नाहीं. बंगाली हिंदु आणि बंगाली मुसलमान यांची भाषा, अन्न, करमणूक आणि वेष हीं अगदीं सारखेच असतात. बंगाली हिंदु आणि बंगाली मुसलमान यांना बाह्य वेषावरून ओळखणें कितीतरी वेळा अशक्य होतें. दक्षिणेकडेहि थोड्या फार प्रमाणांत हाच प्रकार आहे. सर अल्ली इमाम यानां जेव्हां मी पहिल्यांदा भेटलों त्यावेळीं ते हिंदु नाहींत हें मला माहीत नव्हते. ते हिंदु मित्रांच्या परिवारांत होते आणि त्यांचें बोलणें, वेष, वागणें आणि अन्न सर्व कांहीं समानच होतें. पण त्यांच्या नांवानें त्यांनां दगा दिला. कैद--इ--आझाम जीनांच्याबद्दल तें सुद्धां खरें नाहीं. जीना हें आडनांव हिंदूंतहि आहे. मी जनाब जीनांना प्रथम भेटलों त्यावेळीं ते मुसलमान आहेत हें मला माहीत नव्हतें. त्यांचें सबंध नांव जेव्हां मला सांगण्यांत आले तेव्हांच त्यांचा धर्म मला कळला. त्यांचें राष्ट्रीयत्व त्याचा चेहरा आणि वागणें यांच्यावरून स्पष्ट दिसत

होते. कै. विठ्ठलभाई पटेल हे दाढी राखीत आणि तुर्की टोपी घालीत त्यामुळें किती तरी दिवस ते धर्मानें कोण आहेत याबद्दल मला विचार करावा लागला हें वांचून वाचकांना आश्चर्य वाटेल. हिंदु वारसा कायदा पुष्कळ मुस्लिम गटांना लागूं पडतो. "आपण ब्राह्मण वंशाचे आहोत" असें सर महंमद इकबल अभिमानानें सांगत असत. इकबल आणि किश्लू हीं आडनांवें हिंदू आणि मुसल्मान या दोघांतहि आहेत. हिंदुस्थानांतील हिंदु आणि मुसल्मान हीं दोन स्वतंत्र राष्ट्रें नाहींत. परमेश्वरानें ज्यांना एकरूप केले, त्यांना वेगळे करणें हे माणसाला शक्य नाहीं.

आणि जनाब जीना म्हणतात त्याप्रमाणें इस्लाम हा इतका असहिष्णु धर्म खरोखरीच आहे काय ? इस्लाम आणि हिंदुधर्म किंवा इतर धर्म यांच्यांत कांहींच कां साम्य नाहीं ? इस्लाम हा हिंदुधर्माचा केवळ वैरीच आहे काय ? हिंदुमुसल्मानांच्यामध्यें कितीतरी साम्य आहे. ते सख्खे बंधु आहेत असें अलीबंधू आणि त्यांचे मित्र यांनीं मानले तें सारे खोटेंच होतें काय ?

जनाब जीनांचे म्हणणें कांहीं हिंदू वाईट आहेत असें नाहीं. हिंदु आणि मुसल्मान या दोघांमध्यें बिलकुल साम्य नाहीं असें जनाब जीना म्हणतात. जनाब जीना आणि त्यांच्या विचाराचे लोक हे इस्लामची सेवा करीत नाहींत असें मी स्पष्ट म्हणतों. इस्लाम ( सेवा ) या शब्दांतच अंतर्भूत असणाऱ्या संदेशाचा ते विपरीत अर्थ लावीत आहेत. मुस्लिम लीगच्या नांवावर सध्यां जे प्रकार चालू आहेत त्यामुळें मला तीव्र दुःख होत आहे आणि म्हणून मी असें म्हणतो. हिंदुस्तानांतील मुसल्मान समाजांत 'असत्या' चा प्रचार सध्या सुरू आहे पण या प्रचाराविरुद्ध धोक्याची सुचना देणें हें माझें कर्तव्य आहे. मुसल्मानांच्या संकटाच्या प्रसंगी मी त्यांची मनोभावें सेवा केली आहे आणि हिंदु-मुस्लिम ऐक्य हें माझ्या आयुष्याचें कार्य आहे म्हणून ही धोक्याची सूचना देणें हें माझें कर्तव्य ठरतें."

वरीलप्रमाणें महात्माजींनीं पाकिस्तानसंबंधीं आपलें मत स्पष्ट शब्दांत प्रदर्शित केलेलें आहे.

## पाकिस्तान आणि अपक्ष पुढारी : : : : : १

अपक्ष पुढारी हा शब्दप्रयोग अलीकडे रूढ झाला आहे. अपक्ष पुढाऱ्यांची परिषदहि मुंबई आणि त्यानंतर पुणें येथें झाली. सर तेजबहादूर सप्रू हे या परिषदेचे अध्यक्ष आहेत म्हणून सर तेजबहादूर सप्रू यांचे पाकिस्तानच्या योजनेसंबंधीं मत खालीं दिलें आहे. " जीवनाच्या निरनिराळया अंगांतील आपली अप्रतिहत प्रगति ही अल्पसंख्यांकांनीं आपुलकीनें केलेल्या सहकारितेमुळें जलद आणि निश्चित होऊ शकते असें माझें बऱ्याच वर्षांपासूनचें मत आहे. म्हणून अल्पसंख्यांकांची सहकारिता मिळवून देणाऱ्या कोणत्याहि योजनेचा, इतर पुष्कळांच्या मानानें बराच पुढें जाऊन, मी पुरस्कार करीन मात्र त्याला एक अट आहे.

'मुसलमान, हिंदू, शीख किंवा कोणीहि हिंदुस्तानची फाळणी करणारी योजना जर पुढें मांडील तर त्याला मी केव्हांहि अनुकूलता दाखवणार नाहीं.

'हें म्हणतांना माझ्या देशांतील मुस्लिम बंधूंच्या खऱ्या हितसंबंधाविरुद्ध मी एक अक्षरहि बोलत नाहीं असें मला निश्चित वाटतें.

हिंदुस्तानच्या राज्यकारभारांत हिंदुप्रमाणेंच मुसलमानांचें परिणामकारी आणि मानाचें स्थान आहे हें मी मानतों. पाकिस्तानचा अर्थ काय हें निश्चितपणें सांगणें कठीणच काम आहे, तरीसुद्धा मद्रासच्या अधिवेशनांत मुस्लिम लीगच्या पुढाऱ्यानें पाकिस्तानची घोषणा जोरानें केली आहे. इतर समाज विशेषतः पाकिस्तानमध्यें जाणाऱ्या प्रदेशांतील अल्पसंख्य समाज हे आपणांस ही गोष्ट बिलकुल मान्य नाहीं असें म्हणू शकतील हें मुस्लिम लीगच्या पुढाऱ्यांनीं ध्यानांतच घेतलेलें दिसत नाहीं.

'त्यांच्यावर काय बळजबरी करावयाची आहे? पाकिस्तान सोडून हिंदुस्तानांत जे पुष्कळ मुसलमान उरतात त्यांची वाट काय? पाकिस्तानांतील मुसलमानांसाठीं हिंदुबहुमताच्या आधीन होण्याचें त्यांनीं कबूल करावयाचे काय?

'अशा रीतीनें हिंदुस्तानची विभागणी करणें म्हणजे एकमेकांच्या प्रगतीस अडथळा करणाऱ्या, एकमेकांविरुद्ध कारस्थानें करणाऱ्या आणि एकमेकांविरुद्ध भांडणाऱ्या दोन शत्रुपक्षांतच हिंदुस्तानची विभागणी केल्यासारखे होणार आहे.

'या दोघांमध्यें शांतता कोण ठेवणार? ही शांतता काय ब्रिटिश ठेवणार? जर पाकिस्तान आणि हिंदुस्तान पूर्णपणें स्वतंत्र होणार तर ही कामगिरी ब्रिटिशांनीं कां व कशासाठीं करावयाची?'

पाकिस्तानच्या योजनेबद्दल ब्रिटिशांचे काय मत आहे हें निश्चयानें सांगणें कठीण आहे. मि. ॲमेरी यांचे या बाबतींतील वक्तव्य अगदीं सौम्य शब्दांत आहे. परंतु या योजनेच्या व्यवहार्यक्षमतेबद्दल त्यांचें मत त्यावरून दिसून येतें.

" पाकिस्तानच्या मागणीला ब्रिटिशांनीं जर संमति दिली तर त्यांनीं हिंदुस्तानचा घोर विश्वासघात केला असें मी म्हणेन. गेल्या १७५ वर्षांत हिंदुस्तानांत त्यांनीं जी कामगिरी केली त्याच्यावर या संमतीनें बोळा फिरविल्यासारखें होईल."

हें मत इतर अपक्ष पुढारी यांनाहि सर्वसामान्यपणें मान्य दिसतें.

# पाकिस्तानची लोकसंख्या : : : : १०

या पुस्तकाच्या पूर्वार्धात पाकिस्तानची पूर्वपीठिका, मुसलमानांच्या वाढत्या मागण्यांचा इतिहास, पाकिस्तान ठरावांतील दोषस्थळें, पाकिस्थानच्या निरनिराळ्या योजना आणि पाकिस्तानबद्दल अनुकूल, प्रतिकूल मतें आपण पाहिली. आतां या भागांत पाकिस्तानची व्यवहार्यता, पाकिस्तानचें तत्त्वज्ञान वगैरे विवेचन करून हिंदु-मुस्लिम प्रश्नाच्या निर्णायक स्वरूपाबद्दल विचार करावयाचा आहे.

पाकिस्तानची पूर्वपीठिका या प्रकर्णात पाकिस्तानसंबंधीं मुस्लिम लीगनें लाहोर येथील अधिवेशनांत केलेला ठराव दिला आहे. त्यावरून खालील गोष्टीं निश्चित होतात.

(१) पाकिस्तानांतले प्रांत सलग एकमेकांशीं लागून पाहिजेत.

(२) पाकिस्तानांतल्या प्रांतांत मुस्लिम बहुसंख्य पाहिजेत.

(३) पाकिस्तानांतील अल्पसंख्यांकांनां त्यांच्या संरक्षणासाठीं इतर प्रांतांतल्या मुसलमानांनां जे हक्क मिळणार ते मिळावयाचे आहेत.

(४) पाकिस्तानच्या प्रदेशांना स्वतंत्र राष्ट्राचा दर्जा प्राप्त व्हवयाचा आहे.

( ५ ) पाकिस्तानच्या रूपानें जीं स्वतंत्र राष्ट्रें किंवा एक स्वतंत्र राष्ट्र निर्माण होणार आहे त्याच्या हातीं अखेरीस परराष्ट्रीय राजकारण, संरक्षण, दळणवळणाचीं साधनें, जकात वगैरे खातीं यावयाची आहेत. याचाच अर्थ कांहीं काल तरी ही खातीं या राष्ट्रांकडे राहाणार नाहींत.

ही पांच तत्त्वें निश्चित धरून आपण पाकिस्तानचें स्वरूप प्रादेशिक विभागणीच्या दृष्टीनें कोणतें होतें तें पहिल्यानें पाहूं.

ब्रिटिश हिंदुस्तानांतल्या १७ प्रांतांपैकीं ब्रिटिश बलुचिस्तान, बंगाल, वायव्यसरहद्द प्रांत, पंजाब, सिंध या पांच प्रांतांत मुसलमान बहुसंख्य आहेत. या पांच प्रांतांपैकी बंगालमध्यें सन १९३१ च्या शिरगणतीप्रमाणें मुसल्मान शेंकडा ५४ व पंजाबमध्यें शेंकडा ५६ आहेत. बंगाल व पंजाब या दोन्हीं प्रांतांत मुसल्मानांचें बहूसंख्याकत्व केवळ कांहीं थोड्या संख्येवरच अवलंबून आहे. बंगाल आणि पंजाब मध्यें पुष्कळ जिल्हे हिंदु बहुसंख्य वस्तीचे आहेत त्याचप्रमाणें इतर जिल्ह्यांतून मुसल्मान बहुसंख्य आहेत. हे मुस्लिम बहुसंख्य जिल्हे एकमेकास लागून सलग आहेत. पंजाब आणि बंगाल या प्रांतांच्या सध्यांच्या चतुःसीमा कायम ठेवणें हें पाकिस्तानच्या योजनेस सर्वस्वी विरोधी होणारे आहे. ज्या सलग प्रांतांत मुस्लिम बहुसंख्य आहेत तेच प्रांत एकत्रित करावयाचे आहेत. अर्थात पंजाब आणि बंगाल मधील जे जिल्हे हिंदु आणि इतर यांचे आहेत आणि मुस्लिम जिल्ह्यापासून अलग आहेत ते जिल्हे पाकिस्तानांत घेण्याची भाषा बोलणें म्हणजे पाकिस्तानच्या ठरावाबाहेर हिंदु प्रांतांवर आक्रमण करण्यासारखे होईल.

आतां आपण फक्त पंजाब प्रांताचा लोकसंख्येच्या दृष्टीनें विचार करूं. सध्यांच्या पंजाबमध्यें तीस जिल्हे आहेत त्यापैकीं सतरा जिल्ह्यांत मुसलमान बहुसंख्य आहेत व तेरा जिल्ह्यांत हिंदु आणि शीख हे बहुसंख्य आहेत.

मुसलमान ज्यांत बहुसंख्य आहेत ते जिल्हे त्यांतील मुसलमानांची लोकसंख्या किती टक्के आहे तें खालील कोष्टकावरून कळेल.

| जिल्ह्याचें नांव | मुसलमानांची शें. संख्या | जिल्ह्याचें नांव | मुसलमानांची शें. संख्या |
|---|---|---|---|
| १ लाहोर | ६० | २ सियाल्कोट | ६२ |
| ३ गुजराणवाला | ७० | ४ शिकारपूर | ८५ |
| ५ गुजरात | ६४ | ६ शाहपूर | ८३ |
| ७ झेलम | ८९ | ८ रावळपिंडी | ८३ |
| ९ अटक | ९१ | १० मिनवली | ८७ |
| ११ मान्टगोमेरी | ६९ | १२ ल्यालपूर | ७२ |
| १३ झांग | ८३ | १४ मुझारपूर | ८६ |
| १५ डेरागाझीखान | ८६ | १६ मुल्तान | ८० |
| १७ बिलाक ट्रान्स फ्रान्टीयर ट्रक १०० | | | |

वरील सतरा जिल्हे मुस्लिम बहुसंख्य असून सलग आहेत. खालील तेरा जिल्हे हिंदु–शीख बहुसंख्य आहेत. ते येणेंप्रमाणें.

| जिल्ह्याचें नांव | हिंदु–शीख यांची शें. संख्या | जिल्ह्याचें नांव | हिंदु–शीख यांची शें. संख्या |
|---|---|---|---|
| १ हिसार | ७२ | २ रोहटक | ८३ |
| ३ गुजराण | ६८ | ४ कर्नाळ | ७० |
| ५ अंबाला | ७० | ६ सिमला | ८५ |
| ७ कांग्रा | ९५ | ८ होश्यारपूर | ६८ |
| ९ जलंदर | ५६ | १० लुधियाना | ६५ |
| ११ फिरोझपूर | ५६ | १२ अमृतसर | ५३ |
| १३ गुरुदासपूर | ५० | | |

वरील तेरा जिल्ह्यांत मुसलमान बहुसंख्य नसून हिंदु–शीख हे बहुसंख्य आहेत आणि हे तेरा जिल्हे सलग आहेत. अर्थात पाकिस्तानची योजना मुस्लिम लीगच्या ठरावाप्रमाणें पंजाबास लागूं करावयाची झाल्यास वर नमूद केलेले सतरा जिल्हे पाकिस्तानांत व तेरा जिल्हे हिंदुस्तानांत जातील हें उघड आहे.

आतां आपण बंगालसंबंधीं विचार करूं. सध्यांच्या बंगालमध्येंहि तीस जिल्हे असून त्यापैकीं फक्त पंधरा जिल्ह्यांत मुस्लिम बहुसंख्य आहेत व

पंधरा जिल्ह्यांत मुस्लिमेतर हे बहुसंख्य आहेत. बंगालमधील ज्या जिल्ह्यांत मुसलमान बहुसंख्य आहेत त्यांची नांवें आणि त्यांतील मुसलमानांची शेंकडा संख्या खालीलप्रमाणें आहे. हें प्रमाण १९३१ च्या खानेसुमारीवरून घेतलेले आहे. १९४१ च्या खानेसुमारीच्या वेळीं बंगालमध्यें हिंदु-मुसलमानांच्या दरम्यान मोठा वाद झाला व खानेसुमारी खोटी केल्याचे आरोप प्रत्यारोप झाले. अर्थात योग्य खानेसुमारीनंतर जो निर्णय घेण्यांत येईल तोच प्रमाण मानिला पाहिजे.

| जिल्ह्याचें नांव | मुसलमानांची शें. संख्या | जिल्ह्याचें नांव | मुसलमानांची शें. संख्या |
|---|---|---|---|
| १ नादिया | ६२ | २ मुर्शिदाबाद | ५५ |
| ३ जेसोर | ६२ | ४ राजशाही | ७६ |
| ५ रंगपूर | ७१ | ६ बोग्रा | ८३ |
| ७ पाबना | ७७ | ८ मान्दा | ५५ |
| ९ डाक्का | ७० | १० मैमनसिंग | ७७ |
| ११ फरीदपूर | ६५ | १२ बकरगंज | ७२ |
| १३ तिपेरा | ७६ | १४ नौखोली | ७६ |
| १५ चितागांग | ७६ | | |

खालील पंधरा जिल्ह्यांत हिंदु वगैरे बहुसंख्य आहेत. ते जिल्हे आणि लोकसंख्येंतील हिंदु वगैरेंचे प्रमाण खालीलप्रमाणें:—

| जिल्ह्याचें नांव | हिंदुवगैरेंचें शें. प्रमाण | जिल्ह्याचें नांव | हिंदुवगैरेंचें शें. प्रमाण |
|---|---|---|---|
| १ बरद्वान | ८२ | २ बीरभम | ७४ |
| ३ बांकुरा | ९५ | ४ मिदनापूर | ९३ |
| ५ हुगळी | ८३ | ६ हवडा | ७९ |
| ७ हवडा शहर | ७९ | ८ चोवीस परगणा | ६६ |
| ९ डाक्का शहर | ५९ | १० कलकत्ता | ७५ |
| ११ कलकत्ता उपनगरें | ८१ | १२ खुलना | ५१ |
| १३ जालपायगुरी | ७७ | १४ दार्जिलिंग | ९७ |
| १५ दिनाजपूर | ५० | | |

ज्या पंधरा जिल्ह्यांत मुसलमान बहुसंख्य आहेत ते जिल्हे सलग आहेत आणि या प्रदेशास लागूनच आसाममधील मुसलमान बहुसंख्य जिल्हा सिल्हेट हा आहे. या जिल्ह्यांत मुसल्मानांची शेंकडा लोकसंख्या ६० आहे. अर्थातच पाकिस्तानच्या योजनेप्रमाणें बंगालमधील पंधरा जिल्हे आणि आसाममधील एक जिल्हा असा एक प्रांत पाकिस्तानमधील होईल. बंगालमधील पंधरा जिल्हे व आसाममधील बाकी सर्व भाग हिंदुस्तानांत राहील. पंजाब आणि बंगालसंबंधीं लोकसंख्येच्या दृष्टीनें विचार केल्या-नंतर आतां तीन प्रांत बलुचिस्तान, सिंध आणि वायव्यसरहद्दप्रांत विचा-रासाठीं उरले. ब्रिटिश बैलुचिस्तान हा सलग प्रांत आहे व त्यांत मुसल-मानांची शेंकडा लोकसंख्या सुमारें ९० आहे. हा प्रांत पाकिस्तानमध्यें समाविष्ट होणें क्रमप्राप्त आहे. सिंधमध्यें मुसलमानांची लोकसंख्या शेंकडा ७३ आहे. सिंधमध्यें एकंदर सात जिल्हे आहेत. त्यांत कमीतकमी शेंकडा दहा पासून जास्तींतजास्त शेंकडा तीसपर्यंत जिल्हेवार हिंदूंची लोकसंख्या आहे. कोणत्याहि जिल्ह्यांत शेंकडा तीस पेक्षां हिंदूंची संख्या जास्त नाहीं.

सिंधमधील हिंदूंची पुष्कळशी वस्ती शहरांतूनच आहे. खेडयांत राह-णारे हिंदू अगदींच थोडे आहेत; एवढेंच नव्हे तर सिंधमधील महत्वाच्या शहरांतून हिंदूच बहुसंख्य आहेत. तेथील व्यापार, सावकारी वगैरे सर्व हिंदूंच्याच हातीं आहे. हिंदु हे पुढारलेल्या वर्गापैकीं आहेत. सिंधमधील दहा हजारांपेक्षां ज्या शहरांची लोकसंख्या अधिक आहे अशा शहरांत हिंदु किती आणि मुसलमान किती त्याचें कोष्टक खालीं दिलें आहे.

| शहराचें नांव | एकंदर लोकसंख्या | मुस्लिम सं. | हिंदु सं. | हिंदूंचें शें.प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ हैद्राबाद | ९६०२१ | २७११६ | ६८९०५ | ७१ |
| २ कराची | २४७७९१ | ११८४१२ | १२९३७९ | ५३ |
| ३ लारखाना | २६८४१ | १०९४५ | १५८९६ | ५९ |
| ४ तंडोआदम | १३४६९ | ३२०४ | १०२६५ | ७६ |
| ५ रोहरी | १६९०० | ६८०४ | १००९६ | ६० |

| शहराचें नांव | एकंदर लोकसंख्या | मुस्लिम सं. | हिंदु सं. | हिंदूंचे प्रमाण |
|---|---|---|---|---|
| ६ शिकारपूर | ६२५०५ | २२६५४ | ३९८५१ | ६४ |
| ७ सक्कर | ६९२७७ | २७६४२ | ४१६३५ | ६९ |
| ८ जाकोबाबाद | १५७४८ | ७७८३ | ७९६५ | ५१ |

सिंधमध्यें एकंदर महत्वाचीं शहरें आठच आहेत व या साऱ्या शहरांत हिंदूच बहुसंख्य आहेत एवढेंच नव्हे तर हैद्राबादसारख्या शहरांत हिंदूंची लोकसंख्या शेंकडा ७० च्या वर आहे. पाकिस्तानच्या योजनेप्रमाणें हीं सारी शहरें सिंध प्रांतांतील असल्यामुळें हिंदु बहुसंख्य असूनहि पाकिस्तानांत समाविष्ट होणार हें उघड आहे. अलीगडच्या प्रोफेसरद्वयांनीं आपली पाकिस्तानयोजना पुढें मांडतांना पन्नास हजारांवरील हिंदुस्तानांतील सर्व शहरें हीं स्वतंत्र शहरें अशीं मानण्यांत यावीत व त्यांस स्वतःच्या कारभारांत स्वातंत्र्य असावें असें म्हटलें आहे. या योजनेस अनुसरून हैद्राबाद, कराची, शिकारपूर आणि सक्कर हीं चार स्वतंत्र शहरें होतील व तेथील बहुसंख्य हिंदूंचा प्रश्न अशा रीतीनें सुटेल.

वायव्य सरहद्द प्रांतांत मुसलमान वस्ती शेंकडा ९०, आहे. हिंदूंची वस्ती शहरांत आणि खेडेगांवांतहि आहे; पण शहरांतसुद्धां बहुतेक ठिकाणीं हिंदु अल्पसंख्यच आहेत. दहा हजारांवरील ज्या शहरांत हिंदु बहुसंख्य आहेत तीं शहरें आणि त्यांतील लोकसंख्या खालीं दिली आहे.

| शहराचें नांव | एकंदर लोकसंख्या | हिंदु वगैरे संख्या | प्रमाण |
|---|---|---|---|
| पेशावर कॅन्टोन्मेंट | ३४४२६ | १७९५० | ५२ |
| नांवशेरा ,, | १६१३७ | ८६०१ | ५३ |
| बन्नूशहर | २४९८० | १६७८४ | ६७ |

या तीनं शहरांतून हिंदु बहुसंख्य आहेत पण त्यांतील दोन कॅन्टोन्मेंटच्या हद्दी आहेत. तेथील शहरें आणि कॅन्टोन्मेंट एकत्र केल्यास हिंदु बहुसंख्य रहात नाहींत. खास बन्नू शहरांत कॅन्टोन्मेंट धरून देखील हिंदु बहुसंख्य आहेत.

पाकिस्तानच्या योजनेप्रमाणें लोकसंख्येस अनुसरून सर्व वायव्य सरहद्द प्रांत पाकिस्तानचा भाग होणार. ब्रिटिश हिंदुस्तानांतील सर्व प्रांतांचा

विचार करतां पाकिस्तान ठरावांतील योजना गृहीत धरून मुसल्मान बहु-संख्य असे सलग प्रांत होतात तें खालीलप्रमाणें—

१ बलुचिस्तान २ वायव्य सरहद्द प्रांत ३ सिंध ४ पंजाब पैकीं सतरा जिल्हे ५ बंगाल पैकीं १५ जिल्हे आणि आसाममधील सिल्हेट जिल्हा. वरील पांच प्रांतांपैकीं बलुचिस्तान, वायव्य सरहद्द प्रांत, सिंध आणि पंजाबपैकीं भाग हे सर्व सलगच आहेत व त्यांचा एक प्रांत करण्यासहि हरकत नाहीं. पूर्व बंगालचा एक स्वतंत्र प्रांत करावा लागेल. वरील-प्रमाणें प्रांतरचना केल्यास त्यांत किती मुसल्मान लोकसंख्येचा समावेश होईल व त्यामुळें हिंदुस्तानच्या राजकारणावर आणि हिंदु-मुस्लिम प्रश्नावर काय परिणाम होईल हें पाहणें अतिशय महत्वाचें आहे. या प्रश्नाचा विचार डॉ. आंबेडकर यांनीं 'पाकिस्तानवरील विचार' या आपल्या पुस्त-कांत 'पाकिस्तान आणि जातीय शांतता' या प्रकरणांत पान ११२ ते ११४ वर केला आहे. त्यांत त्यांनीं खालीलप्रमाणें आंकडे दिले आहेत.

### पाकिस्तानांतील मुस्लिम संख्या

| | |
|---|---|
| पंजाब | १३३५२४६० |
| वायव्य सरहद्द प्रांत | २२२७३०३ |
| सिंध | २८३०३०० |
| बलुचिस्तान | ४०५३०९ |
| पूर्व बंगाल स्टेटपैकीं | |
| बंगाल | २७४९७६२४ |
| सिल्हेट जिल्हा | १६०३८०५ |
| एकूण संख्या | ४७८९७३०१ |

एकंदर ब्रिटिश हिंदुस्तानांत ठोकळ मानानें साडेसहा कोटि मुसलमान आहेत. त्यांपैकीं साडेचार कोटि मुसलमान मुस्लिम प्रांतांत जातील व फक्त दोनच कोटि मुसलमान हिंदुस्तानांत राहतील असें धरून डॉ. आंबेडकर यांनीं पुढील पानावर सर्व गणितें मांडली आहेत;पण हा जो वरील हिशेब डॉ. आंबेडकर यांनीं केला आहे तो सर्वस्वी चुकीचा झालेला आहे.

विषयाच्या गडबडींत ही चूक झाली असेल पण ही चूक महत्वाची आहे व त्यामुळें पुढील सर्व विधानें तर्कदुष्ट झालीं आहेत. डॉ. आंबेडकर यांनीं पंजाब आणि पूर्वबंगालमधील मुसलमानांची संख्या धरण्यांत चूक केली आहे. सध्यां जो पंजाब आहे त्याची लोकसंख्या हिंदुमुसलमान शीख वगैरे सर्व धरून अंदाजें २ कोटि ३५ लक्ष आहे व त्यांत मुस्लिम-संख्या १ कोटी ३० लक्ष आहे. ही मुसलमानांची संख्या सर्व पंजाब-मधील आहे. पण पाकिस्तानांत त्यांतील मुस्लिम बहुसंख्य असे फक्त १७च जिल्हे येणार आहे. या मुस्लिम पंजाबची सर्व लोकसंख्या अंदाजें १ कोटि ३५ लक्ष होईल. अर्थात यांतहि हिंदु वगैरे अल्पसंख्यांकांची संख्या सहजच ३५ लक्ष होईल आणि मुस्लिम पंजाबमधील मुसलमानांची संख्या जास्तींतजास्त एक कोटीचे आसपास येईल. यापेक्षां जास्त होणें शक्य नाहीं, कारण पंजाबमधील जे तेरा हिंदुबहुसंख्य जिल्हे आहेत त्यांतहि मुसलमानांची वस्ती आहेच. सबंध पंजाबमधील मुसलमानांची संख्या १ कोटि ३३ लाख आहे, पैकी १ कोटि पाकिस्तानांत जाणार व ३३ लक्ष अल्पसंख्य या नात्यानें हिंदुस्तानांत येणार; परंतु डॉ. आंबेडकर यांनीं पंजाबची संख्या धरतांना सध्यांच्या पंजाबमधील सर्व मुसलमानांची संख्या धरलेली आहे त्यामुळें मोठी चूक झाली आहे. वायव्य सरहद्द, सिंध आणि बलुचिस्तान यांतील संख्या ठीक आहे. परंतु बंगालमधील लोकसंख्येंतहि तशीच चूक झाली आहे. सध्यांच्या बंगालची सर्व लोक-संख्या अंदाजें पांच कोटि आहे व त्यांपैकीं मुस्लिम संख्या पावणे तीन कोटि आहे परंतु बंगालमधील तीस जिल्ह्यांपैकीं फक्त १५ मुस्लिम बहुसंख्य जिल्हे पाकिस्तानांत यावयाचे आहेत व हिंदु बहुसंख्य जिल्ह्यांतहि मुस्लिम संख्या बरीच आहे. अंदाजें दोन कोटि मुसलमान पूर्व बंगाल (पाकि-स्तान भाग) मध्यें येतील. त्यापेक्षां अधिक येणें शक्यच नाहीं. वरील-प्रमाणें हिशेब केल्यास पाकिस्तानांतील मुसलमानांची खरी संख्या खालील-प्रमाणें होईल.

| | |
|---|---|
| पंजाब | १ कोटी |
| वायव्य सरहद्द | २२ लाख |

| | |
|---|---|
| सिंध | २८ लाख |
| बलुचिस्तान | ४ लाख |
| बंगाल सिल्हेटसह | २ कोटी |
| एकूण ३ कोटि ५४ लक्ष | |

म्हणजे पाकिस्तानांत सबंध ब्रिटिश हिंदुस्तानांतील साडे सहा कोटि पैकीं फक्त साडेतीन कोटी मुसल्मानांचा समावेश होतो व तीन कोटि मुसल्मान हिंदुस्तानांत राहतात. डॉ. आंबेडकर यानीं साडेचार कोटि मुसल्मान पाकिस्तानांत समाविष्ट होतात व फक्त दोन कोटिच हिंदुस्तानांत उरतील असें धरून पान ११३ वर बरीच गणितें केली आहेत पण तींहि अर्थात चुकीचीं झालीं आहेत. आतां ब्रिटिश हिंदुस्तानांतील पाकिस्तानची लोकसंख्या किती होते आणि त्यांत मुसल्मान आणि इतर किती राहतील तें खालील कोष्टकांवरून समजेल.

| प्रांताचें नांव. | एकंदर लोकसंख्या | मुस्लिम संख्या | इतर संख्या |
|---|---|---|---|
| मु. पंजाब | १ कोटी ३५ लाख | १ कोटी | ३५ लाख |
| वायव्य सरहद्द | २४ लाख | २२ लाख | २ लाख |
| सिंध | ३८ लाख | २८ लाख | १० लाख |
| बंगाल मु. | २ कोटी ५० लाख | २ कोटि | ५० लाख |
| बलुचिस्तान | ५ लाख | ४ लाख | १ लाख |
| | चार कोटी ५२ लाख | तीन कोटी ५४ लाख | ९८ लाख |

म्हणजे पाकिस्तानची लोकसंख्या ठोकळ मानानें साडेचार कोटी होते व त्यांत साडेतीन कोटि मुसल्मान व एक कोटि अल्पसंख्यांक हिंदु शीख वगैरे राहतात. याचाच अर्थ एक कोटि हिंदु शीख वगैरे लोक मुसल्मानांच्या ताब्यांत जातात व पाकिस्तानांतहि अल्पसंख्यांकांचा प्रश्न सध्यां इतक्याच तीव्र स्वरूपानें उत्पन्न होतो. हिंदुस्तानांतहि तीन कोटि मुसल्मान राहतात आणि त्यामुळें हिंदु-मुस्लिम प्रश्न सुटत नाहींच.. हल्लींची ब्रिटिश हिंदुस्तानांतील लोकसंख्या ठोकळ मानानें २५ कोटि आहे. पैकीं साडेदहा कोटि मुसल्मान आणि १८॥ कोटि हिंदु आहेत

म्हणजे शंभर लोकवस्तीपैकीं शेंकडा ७४ हिंदु व शेंकडा २६ मुसलमान आहेत. हेंच प्रमाण पाकिस्तानांत शेंकडा ७५ टक्के मुसलमान व २५ टक्के हिंदु असें पडतें. म्हणजे सबंध हिंदुस्तानांत जी स्थिति मुसलमानांची आहे बरोबर तीच स्थिति पाकिस्तानांतील हिंदूंची होणार मग यानें हिंदु–मुस्लिम प्रश्न सुटला असें कसें म्हणतां येईल? हिंदुस्तानांतहि ( पाकिस्तान सोडून ) तीन कोटि म्हणजे अंदाजे शेंकडा १५ टक्के मुसलमान राहतात व अल्पसंख्यांकांचा प्रश्न उरतोच. उलट साडेतीन कोटी मुसलमानांच्या मानीव सुखासाठीं हिंदुस्तानांतील तीन कोटि मुसलमान या योजनेस संमति देतील कीं काय हाहि प्रश्नच आहे. पाकिस्तानची योजना ब्रिटिश हिंदुस्तानास लागू केली तर काय परिणाम होईल तें आपण पाहिलें. आतां देशी संस्थानांकडे आपण वळूं.

पाकिस्तानची योजना देशी संस्थानांना लागूं करावयाची कीं नाहीं याबद्दल पाकिस्तानच्या ठरावांत स्पष्ट उल्लेख नाहीं. त्या ठरावांत फक्त 'हिंदुस्तान' असे शब्द वापरले आहेत. 'ब्रिटिश हिंदुस्तान' अशी शब्दयोजना केली नाहीं. त्यामुळें ही योजना देशी संस्थानांना लागू झाली तर बरी असा लीगचा हेतू दिसतो. मुस्लिम लीगचे अध्यक्ष जनाब जीना यांनीं नुकत्याच बंगलोर येथें केलेल्या भाषणांत 'ऑल इंडिया मुस्लिम लीगचा देशी संस्थानांशीं कांहीं संबंध नाहीं.' असें सांगितलें. "मात्र देशी संस्थानांतील मुसलमानांनीं आपली वेगळी संघटना करून आपलें सामर्थ्य वाढवावें व सत्तेसाठीं झगडा करावा" असा सल्ला दिला. राजकोट आणि काश्मीर या संस्थानांतील अंतर्गत राजकारणांत मुस्लिम लीगच्या पदाधिकाऱ्यांनीं ज्या तऱ्हेचा हस्तक्षेप वेळोवेळीं केला त्यावरून लीगचे पुढारी प्रसंग आल्यास संस्थानांतील मुस्लिम संघटनेला कोणत्या प्रकारचा सल्ला देतील हें अंदाजतां येण्यासारखें आहे आणि म्हणून पाकिस्तानची योजना देशी संस्थानांना लागू करावयाची म्हटल्यास काय परिस्थिति येतें हें पाहणें जरूरीचें आहे. पाकिस्तानची योजना लागूं करतांना त्या संस्थानांत मुसलमान प्रजा बहुसंख्य असावी हें गमक ठरविलें पाहिजे. राजा हिंदु आहे कीं मुसलमान आहे यावरून तें देशी संस्थान पाकिस्तानांत जाणार

कीं नाहीं.हें ठरविणें योग्य होणार नाहीं. याच तत्वास अनुसरून दक्षिणेकडील हैद्राबाद, महाराष्ट्रांतील जंजिरा आणि सावनूर, गुजराथमधील पालनपूर, राधनपूर, सचीन, बालासिनोर, खंबायत आणि काठेवाडमधील जुनागड, मांगरूळ, वजाणा; माणावदर, बाटवा, सरदारगड आणि दसाडा, उत्तर हिंदुस्तानांतील रामपूर, आवरा, भूपाळ, टाक, पतोडी, मालेरकोटला, लोहारू, भावलपूर वगैरे संस्थानचे राजे जरी मुसलमान असले तरी त्या संस्थानांतील प्रजा बहुसंख्य हिंदु असल्यानें या सर्व संस्थानांचा समावेश हिंदुस्तानांत केला पाहिजे. उलट काश्मीरचे राजे जरी हिंदु असले तरी काश्मीर संस्थानांतील बहुसंख्य प्रजा मुसलमान असल्यामुळें तें संस्थान पाकिस्तानांत जाईल. बलुचिस्तानमधील केलात व लासबेला, वायव्य सरहद्द प्रातांतील आंब, चित्रळ, डीर, फुलेरा, व स्वात, सिंधमधील खैरपूर ही संस्थानें त्यांतील प्रजा बहुसंख्य मुस्लिम असल्यामुळें पाकिस्तानांत जातील. शिवाय या साऱ्या संस्थानांचे राजे मुसलमान आहेत आणि हीं संस्थानें ब्रिटिश हिंदुस्तानांतील पाकिस्तानला लागून आहेत.

वरील विवेचनावरून पाकिस्तानांत जीं संस्थानें जातील त्यांचीं नांव लोकसंख्या आणि वार्षिक उत्पन्न खालीं दिलें आहे.

| संस्थानचें नांव, | लोकसंख्या | वार्षिक उत्पन्न रु. |
|---|---|---|
| काश्मीर आणि जम्मू | ३६४६२४३ | २५१७१००० |
| केलात | ३४२१०१ | १४१७०० |
| लासबेला | ६३००८ | ३६७००० |
| खैरपूर | २२७१८३ | १९४८००० |
| आंब | ३३००० | ३३५७५० |
| चित्रळ | ८०००० | |
| डीर | २५०००० | ३५०३९० |
| फुलेरा | ६६४४ | २०००० |
| स्वांत | २१६००० | १५५५००० |
| | ४८६४१७६ | २९८७८८४० |

सर्व देशी संस्थानांत मिळून ७९०९८००८ म्हणजे ठोकळ मानानें आठ कोटी लोकसंख्या आहे. पैकीं अंदाजें पन्नास लाख लोकसंख्या पाकिस्तानमध्यें जाईल. आणि साडेसात कोटि हिंदुस्थानांत जाईल. वरील सर्व विवेचनांत फक्त लोकसंख्याच जमेस धरली आहे. देशी संस्थानिकांचे ब्रिटिश सरकारबरोबर असलेले कांहीं करारमदार आणि इतर हक्क ह्यांचा विचार येथें केलेला नाहीं. देशी संस्थानें आणि ब्रिटिश हिंदुस्तान धरून पाकिस्तानांतील लोकसंख्या पांच कोटी ( हिंदु मुसलमान वगैरे धरून ) होईल.

---

# पाकिस्तानची आर्थिक परिस्थिति व संरक्षण क्षमता : : : ११

पाकिस्तानच्या ठरावांत जी योजना आंखली आहे त्या योजनेस अनुसरून पाकिस्तानांत कोणते प्रदेश समाविष्ट होतील, एकंदर पाकिस्तानची लोकसंख्या किति होईल, त्यांत मुसलमान आणि मुसलमानेंतर किती असतील या प्रश्नांचा प्रपंच मागील प्रकरणांत केला आहे.

या प्रकरणांत पाकिस्तानच्या ठरावांत जी योजना आंखली आहे त्य योजनेस अनुसरून पाकिस्तानचे उत्पन्न, खर्च, आर्थिक परिस्थिति आणि पाकिस्तान आणि हिंदुस्तान यांच्या संरक्षणक्षमतेवर त्याचे होणारे परिणाम याचा विचार करणें आहे.

एकादा नवीन प्रांत निर्माण करावयाचा झाल्यास त्या प्रांताचें क्षेत्र, त्यांतील लोकसंख्या यापेक्षांहि त्या प्रांतांत किती कर वसूल होतील, त्या प्रांताचें अंदाजपत्रक कसें होऊं शकेल, सरकारकडून ज्या गोष्टी कमीतकमी केल्या जाव्यात अशी सध्यांची अपेक्षा आहे त्या पुरविण्यास तो प्रांत समर्थ होईल किंवा काय या प्रश्नाचा विचार प्रथम करावा लागतो. येथें

तर पाकिस्तानचें स्वतंत्र राष्ट्र निर्माण करावयाचें आहे. तेव्हां या नवीन राष्ट्राच्या संरक्षण आणि संवर्धनासाठीं आवश्यक तें सामर्थ्य त्यांमध्यें आहे कीं नाहीं व तें राष्ट्र कार्यक्षम होईल कीं नाहीं हें तपासणें आवश्यक आहे. नुसते मनोरथ करुन उपयोगी नाहीं. त्या मनोरथांच्या पूर्तीला आवश्यक ती साधनसामग्री तेथें आहे कीं नाहीं हेंहि पहावें लागतें. नाहीं तर ' उत्पद्यन्ते विलीयन्ते दरिद्राणां मनोरथा: ' अशी स्थिति व्हावयाची.

पाकिस्तानमधें दोन अलग भूप्रदेश येतात. एक वायव्येकडील प्रांत पंजाब, सिंध वगैरेचा. दुसरा पूर्वेकडील बंगालचा. हे दोन विभाग एकाच अंमलाखालीं येऊन त्यांचें संयुक्त पाकिस्तान व्हावयाचें कीं हीं दोन स्वतंत्र राष्ट्रें होणार याचा खुलासा पाकिस्तानच्या ठरावांत नाहीं. परंतु विषयाच्या सोईसाठीं या दोन भूप्रदेशाच्या अंदाजपत्रकाचें पृथक विवेचन केलें आहे.

प्रथम आपण पंजाब गटाकडे वळूं.

सध्यां हिंदुस्तानांतील प्रजेकडून मुख्यत: दोन कारणासाठीं कर वसूल केले जातात. एक मध्यवर्ती म्हणजे हिंदुस्तान सरकारासाठीं व दुसरें प्रांतिक सरकारासाठीं. यासाठीं करांचीं क्षेत्रें विभागण्यांत आलीं असून हिंदुस्तान सरकारकडें जकात, एक्साइज, मीठ, हुंडणावळ आणि चलन पोस्ट, तारायंत्र, रेल्वे, उत्पन्नावरील कर (इन कम टॅक्स) हीं मुख्य उत्पन्नांचीं साधनें आहेत. प्रांतिक सरकारकडे शेतसारा, दारूताडीच्या लिलांवाचे उत्पन्न, स्टॅम्प, कोर्ट फी वगैरे उत्पन्नाच्या बाबी आहेत. हिंदुस्तान सरकारचें वार्षिक उत्पन्न ठोकळ मानानें सवाशे कोटि रुपये आहे व सर्व प्रांतिक सरकारचें वार्षिक उत्पन्न एकत्रित केल्यास तें ९० कोटिपर्यंत होईल. हिंदुस्तान सरकारला एका विशिष्ट प्रांतांतून रेल्वे, पोस्ट, तारायंत्र, हुंडणावळ या खात्यांच्या द्वारें किती उत्पन्न मिळतें तें समजणें शक्य नाहीं. रेल्वे पोस्ट, तारायंत्रें, हुंडणावळ या खात्यांच्या द्वारें होणारें उत्पन्न चाळीस कोटि रुपयांपेक्षां थोडेसें अधिक आहे. पण त्याची प्रांतवार वसुली कशी होतें तें समजणें कठीण आहे; आणि त्याची जरुरीहि नाहीं. कारण रेल्वे, पोस्ट, तारायंत्रें हुंडणावळ या खात्यावर ३५ ते ४०·

कोटी रु. खर्च होतो आणि फार तर २–३ कोटी शिल्लक राहतात, ब्रिटिश हिंदुस्थानांतील अकरा प्रांत दर वर्षी स्वतःसाठीं किती कर वसूल करितात व समजणाऱ्या मार्गांनीं ( जकात, इनकमटॅक्स, मीठ वगैरेंनीं ) मध्यवर्ती सरकारसाठीं आपल्या प्रांतांतून किती कर वसूल करून देतात तें खालील कोष्टकांवरून कळून येइल.

| प्रांताचें नांव | प्रांतिक उत्पन्न रु. | मध्यवर्ती उत्पन्न रु. |
|---|---|---|
| मद्रास | १६१३४४५२० | ९५३२६७४५ |
| मुंबई | १२४४५९५५३ | २२५३४४२४७ |
| बंगाल | १२७६६०८९२ | २३७९०१५८३ |
| संयुक्त प्रांत | १२७९९९८५१ | ४०५५३०३० |
| बिहार | ५२३८३०३० | १५४३७७४२ |
| मध्यप्रांत | ४२७४१२८० | ३१४२६८२ |
| आसाम | २५८४८४७४ | १८७५५९६७ |
| ओरिसा | १८१९९८२३ | ५६७३४६ |
| पंजाब | ११३५८६३५५ | ११८०१३८५ |
| वायव्यसरहद्दप्रांत | १८०८३५४८ | ९२८२९४ |
| सिंध | ३७०२९३५४ | ५६६४६९१५ |
| | | ७०६४०५९३६ |
| | | + ४००००००००<br>रेल्वे वगैरेंचे उत्पन्न |

पंजाब गटाचें उत्पन्न प्रांतीय व मध्यवर्ती धरून खालीलप्रमाणें होईल.

| प्रांताचें नांव | प्रांतीय उत्पन्न रु. | मध्यवर्ती उत्पन्न रु. | एकूण |
|---|---|---|---|
| पंजाब | ५६७९३१७७ | ५९००६९३ | ६२६९३८७० |
| बलुचिस्तान | शून्य | — | — |
| सिंध | ३७०२९३५४ | ५६६४६९१५ | ९३६७६२६९ |
| वायव्य प्रांत | १८०८३५४८ | ९२८२९४ | १९०११८४२ |
| | १११९०६०७९ | ६३४७५९०२ | १७५३८१९८१ |

सध्यांच्या पंजाबचें प्रांतीय उत्पन्न ११३५८६३५५ रु. आहे. मध्यवर्ती सरकारचें उत्पन्न ११८१३८५ रु. आहे. पैकीं अंदाजें निम्मे उत्पनाचा प्रांत पाकिस्तानमध्यें राहणार असल्यामुळें वरील कोष्टकांत त्यांचे निम्मे उत्पन्न दाखविलें आहे, बलुचिस्तान मध्यवर्ती सत्तेसाठीं कांहीं उत्पन्न देत नाहीं. सिंधचें प्रांतिक अंदाजपत्रक तुटीचें असल्यामुळें सिंध प्रांत विभक्त केल्यापासून सिंधला दरवर्षी मध्यवर्ती सरकारकडून १ कोटी ५ लाख रुपये देणगी मिळते. त्याचप्रमाणें वायव्य सरहद्द प्रांताला मध्यवर्ती सरकारकडून १ कोटी दहा लाख रुपये देणगी मिळते. प्रांतीय सरकारचीं उत्पन्नें हीं शिक्षण, शेतकी वगैरे राष्ट्रसंवर्धनाच्या आवश्यक खात्यावर खर्च होतात. हीं सध्याच पुरीं पडत नसून तीं वाढविण्याचा प्रयत्न त्या त्या प्रांतांकडून हल्लीं चालू आहे. अशा स्थितींत पाकिस्तानच्या मध्यवर्ती सत्तेला या गटांतील प्रांतीय उत्पन्नांतून कांहीं देणगी मिळेल हें अशक्य आहे. म्हणून पाकिस्तानच्या मध्यवर्ती सत्तेचें उत्पन्न सध्यां सिंध आणि वायव्य प्रांत यांना मिळणारी देणगी २ कोटि १० लाख वजा केल्यास ४१९७५९०२ रु. एवढें राहील व या उत्पन्नातून संरक्षण, वगैरे मध्यवर्ती सरकारचीं सर्व खातीं पाकिस्तानच्या मध्यवर्ती सरकारला भागवावी लागतील. आतां आपण बंगाल गटाकडे वळूं. सध्यांच्या सबंध बंगाल प्रांताचे प्रांतीय उत्पन्न ठोकळ मानानें बारा कोटी रुपये आहे व मध्यवर्ती सरकारसाठीं बंगाल प्रांतांत तेवीस कोटि रुपये वसूल केले जातात; परंतु पाकिस्तानच्या योजनेप्रमाणें या प्रांतांतून निम्मे जिल्हे पाकिस्तानमध्यें जाणार असून निम्मे जिल्हे हिंदुस्तानमध्यें राहणार आहेत. हिंदुस्तानांत राहणारे जिल्हे अधिक सुपीक, औद्योगिक दृष्ट्या पुढारलेले आहेत. कलकत्ता शहर, त्याचीं उपनगरें, हबडा वगैरेसारखीं शहरें हिंदुस्तानांत येतील. या शहरांतूनच उत्पन्नावरील कर, जकात वगैरेचे मोठें उत्पन्न हिंदुस्तान सरकारला मिळत आहे तेव्हां हीं उत्पन्नाची महत्वाची साधनें बंगाल गटांतील पाकिस्तानच्या बाहेर राहणार असल्यामुळें येथील पाकिस्तानच्या मध्यवर्ती सत्तेचें उत्पन्न अंदाजें सहा कोटी रुपये

होईल. प्रांतीय उत्पन्न प्रांतीक खात्यावर खर्च होईल. म्हणजे पंजाब गट आणि बंगाल गट धरून पाकिस्तानच्या मध्यवर्ती सत्तेचें वार्षिक उत्पन्न अंदाजे दहा कोटी होईल. बंगाल गटांतील पाकिस्तानमध्यें बंगालच्या उपसागरांतील कांहीं समुद्र किनारा येतो. या किनाऱ्यावर महत्वाचीं बंदरें आज नाहींत पण पुढें त्यांचें महत्व वाढण्याचा संभव आहे व यामुळें जकात, उत्पन्नावरील कर यांचें उत्पन्न वाढण्याचा संभव आहे पण त्या प्रमाणांत खर्चहि वाढेल म्हणून त्या प्रश्नाचा विचार केलेला नाहीं.

चालू युद्धपूर्व कालांत देशाच्या संरक्षणासाठीं १२१ कोटींच्या आपल्या वार्षिक उत्पन्नांतून हिंदुस्तान सरकार सुमारें ५२ कोटीं रुपये खर्च करीत होतें. ब्रिटिश साम्राज्याचा दरारा आणि त्याचें पाठबळ असल्यामुळें इतका कमी खर्च करून हिंदुस्तानचें संरक्षण होऊं शकतें असें ब्रिटिश सत्तेचें म्हणणें आहे. शास्त्रीय शोधांच्या विलक्षण वाढीमुळें संहारक्षमतेचें प्रमाण अतीशय वाढलें आहे. प्रत्येक सरकारला आपलें लष्कर लढाईच्या आधुनिक सर्व साधनांनीं सज्ज ठेवावें लागतें. यापुढील काळांत संरक्षणासाठीं नाविक विशेषतः वैमानिक दल पहिल्या दर्जाचें असणें अवश्य आहे. पंजाब आणि बंगाल गटाच्या पाकिस्तानच्या ( काश्मीर धरून ) चतुःसीमा पाहिल्यास पंजाब गटाला उत्तरेकडून रशिया आणि चीन, वायव्येकडून अफगाणिस्तान, पश्चिमेकडून पर्शिया व बंगाल गटाला पूर्वेकडून ब्रह्मदेश आणि जपान या बाजूनें आपलें संरक्षण केलें पाहिजे. अरबी समुद्र आणि बंगालचा उपसागर यांना लागून असणाऱ्या किनाऱ्याला परकीय आक्रमणापासून भीति आहे. ब्रिटिश हिंदुस्तानांत हिंदु मुसलमान सुखानें एकत्र राहणें अशक्य आहे म्हणून पाकिस्तानची मागणी होत आहे. त्यामुळें पाकिस्तान वेगळें निघाल्यास पाकिस्तान आणि हिंदुस्थान यांचें परस्पर संबंध स्नेहाचें राहणें संभवनीय नाहीं. अशा रीतीनें चौफेर सबळ सत्तेनीं घेरलेलें दहा कोटीं वार्षिक उत्पन्नाचें पाकिस्तानचें मध्यवर्ती सरकार आपलें यशस्वी संरक्षण करूं शकेल हें बिलकूल शक्य नाहीं. पाकिस्तानमध्यें देशी संस्थानांचा समावेश करावयाचा म्हटल्यास त्यांत

 / जोशी गणेश

येणाऱ्या संस्थानांची लोकसंख्या आणि वार्षिक उत्पन्न मागील प्रकरणांत दिली आहेत. या संस्थानांचें एकंदर उत्पन्न तीन कोटी रुपये आहे. यांत स्थानिक, प्रांतीय आणि मध्यवर्ती अशा तिन्ही करांचें उत्पन्न समाविष्ट होतें. त्यांतून शिक्षण, शेतीसारख्या प्रांतीय महत्वाच्या खात्यांवर खर्च होऊन मध्यवर्ती सरकारास काय मिळेल हें अंदाजणें कठीण नाहीं. या तीन कोटींपैकीं एक कोटी मध्यवर्ती सत्तेचें उत्पन्न धरलें तरीहि देशी संस्थानें धरून होणाऱ्या पाकिस्तानच्या मध्यवर्ती सत्तेचें उत्पन्न फारतर अकरा कोटी रुपये होईल. सध्यां हिंदुस्तान सरकार लष्करी खर्चाकडे ५२ कोटी रुपये खर्च करीत आहे त्यापैकीं निम्म्यापेक्षां अधिक खर्च ब्रिटिश हिंदुस्तानच्या पाकिस्तानमध्यें जाणाऱ्या सीमाप्रांतावर होत असतो. ब्रिटिश साम्राज्यसत्तेचें पाठबळ आहे; ब्रिटिश हिंदुस्तानांत विरोधी सत्ता नाहीं तरीहि जेथें दरवर्षी २६ कोटी रुपये या प्रांतांवर खर्च होतो तेथें ब्रिटिश सत्तेच्या पाठबळाशिवाय, विरोधी हिंदुस्तान असतांना संरक्षणासाठीं किती खर्च करावा लागेल? तो खर्च पाकिस्तान कसा पुरविणार? पाकिस्तानची योजना आर्थिक दृष्टया अत्यंत अव्यवहार्य आहे हें मुस्लिम लीगच्या पुढाऱ्यांस स्पष्ट दिसत आहे व म्हणून ते पाकिस्तान आजच्च स्वतंत्र करावयाचें म्हणत नाहींत व ते केव्हां स्वतंत्र करावयाचें तेहि म्हणत नाहींत.

पाने ७०५
राज ५९
३६, भवानी पेठ

## पाकिस्तानचा निर्णय : : : : १२

दोन मित्र बरोबर प्रवास करीत होते. उन्ह सपाटून पडलें. ते चालून दमले. एक चांगलीशीं विहीर पाहून, माध्यान्य झाल्यावर ते एका झाडाखालीं भाकरी खाण्यासाठीं बसले. एकाजवळ पांच भाकऱ्या होत्या दुसऱ्याजवळ तीन होत्या. ते भाकरी खाण्यास सुरवात करणार इतक्यांत एक घोडेस्वार तेथें उतरला तोहि भुकेल्ला दिसत होता. " आपणहि बसा आमच्या बरोबर खाण्यास " असा आग्रह या दोघांनीं त्या पाहुण्यास केला. " भूक तर लागली आहे पण आपणांजवळ तरी पुरेसें आहे कां ? तो पाहुणा उत्तरला. "नसायला काय झाले ? भरपूर आहे आमच्याजवळ" ते दोघे म्हणाले. प्रत्येक भाकरीचे तीन तीन तुकडे करण्यांत येऊन सर्वांना समान वांटणी देण्यांत आली. भाकरी खाणें झाल्यानंतर घोडेस्वार जाण्यास निघाला त्यापूर्वी त्यानें या दोघांच्या हरकतीस न जुमानतां आठ आणे काढले व या दोघांच्या पुढ्यांत टाकले आणि आभार मानून तो सटकला. आतां आठ आण्यांची वांटणी करण्याचा प्रश्न या दोघांत उद्भवला. ज्याच्या पांच भाकऱ्या होत्या त्यानें पांच आणे घेतले व ज्याच्या

तीन भाकऱ्या होत्या त्याला तीन आणे देऊं केले. तीन भाकरीवाला तीन आणे घेण्यास कबूल होईना. " आपण दोघांनीं मिळून पाहुण्यास खाणें दिलें तर दोघांनीं मिळून सारखे आठ आणे वांटून घेतले पाहिजेत. माझ्या वांटणीस चार आणे येतील. मी तीन आणे कां घेईन ? " तो तीन भाकरीवाला म्हणाला. आपसांत तंटा संपेना. शेवटीं ते दोघे एका निःस्वार्थी न्यायधिशाकडे गेले आणि त्यांनीं सर्व हकीगत त्याला सांगितली. सर्व हकीकत ऐकून घेतल्यानंतर न्यायाधीश तीन भाकरीवाल्यास म्हाणाला, "तुमच्या तीन भाकऱ्या होत्या तर तुम्ही आपसांत तीन आणे कां घेत नाहीं ? उगीच वादाच्या भरीस कां पडता ? " " मला तुमच्या कडून न्याय पाहिजे. आपसांतील समजुतीचा उपदेश नको " तो उत्तरला " तुमची आपसांत समजूत होत नसेल तर मला न्याय देणें भागच आहे पण मग कोणी नाखुष होऊन उपयोगी नाहीं " न्यायाधीशानें दोघानाहि बजावले. दोघांनाहि आपणांला न्याय पाहिजे असें सांगितल्यावर न्यायाधीशानें आठ आण्यांपैकीं सात आणे पांच भाकरीवाल्यास दिले व एक आणा तीन भाकरीवाल्यास दिला. न्यायाधीशाचा हा न्याय पाहून तीन भाकरीवाला ओक्साबोक्शी रडू लागला. नंतर न्यायाधीशाच्या आणि तीन भाकरीवाल्यामध्यें खालीलप्रमाणे प्रश्नोत्तरें झालीं "तुम्हाला तुमचा साथीदार तीन आणे देत होता ते तुम्ही घेतले नाहींत. माझा न्याय बरोबर आहे मी तुम्हांस पटवून देतो. तुम्हांला दोघांजवळ मिळून किती भाकऱ्या होत्या. ? " न्यायाधीश

माझ्याजवळ तीन आणि माझ्या साथीदाराजवळ पांच मिळून आठ होत्या. आम्ही तिघांनीं मिळुन त्या खाल्ल्या" तो उत्तरला.

"प्रत्येक भाकरीचे किती तुकडे केले व प्रत्येकांस किती मिळाले :" न्यायाधीश

"प्रत्येक भाकरीचे तीन तुकडे केले व प्रत्येकास आठ आठ तुकडे मिळाले " —तीन भाकरीवाला

तुम्ही किति खाल्ले आणि पाहुण्याने किती खाल्ले ? " न्यायाधीश मी आठ तुकडे खाल्ले व पाहुण्यानेहि आठच खाल्ले —ती. भा.

" माझ्या तीन भाकरीचे नऊ तुकडे झाले व त्यांपैकीं पाहुण्यानें एकच तुकडा घेतला. " ती. भा.

" तुमच्या साथीदारांच्या भाकरीचे किती तुकडे झाले व त्यांपैकीं किती पाहुण्यानें घेतले ? " न्यायाधीश.

" साथीदाराच्या भाकरीचे पंधरा तुकडे झाले व त्यांपैकीं सात तुकडे पाहुण्यानें घेतले " ती. भा.

" आठ तुकडे पाहुण्यानें खाल्ले व आठ आणे दिले. त्यांपैकीं सात तुकडे साथीदाराचे म्हणून सात आणे त्याला आणि एक तुकडा तुमचा म्हणून एक आणा तुम्हांला मिळाला. न्याय बरोबर झाला ना ? " न्यायाधीश म्हणाला व तीन भाकरीवाला निरुत्तर झाला.

आपसांत तीन आणे मिळत होते पण भांडणाच्या नादी लागून न्यायानें अखेरं एकच आणा हातीं आला.

वरील गोष्ट पाकिस्तानची मागणी करणाऱ्या मुस्लिम लीगनें काळजी-पूर्वक वाचावी आणि या गोष्टींतील तीन भाकरीवाल्याची भूमिका आपण करीत आहोंत किंवा काय याचें बारकाईनें परिशीलन करावें.

पाकिस्तानची योजना ब्रिटिश हिंदुस्तानला लागू केली तर काय होईल? वायव्य सरहद्द प्रांत, बलुचिस्तान, सिंध, अर्धा पंजाब आणि अर्धा बंगाल एवढे प्रांत पाकिस्तानांत समाविष्ट होतील. या सर्व प्रांतांची सर्व लोक-संख्या अंदाजे साडेचार कोटी होईल व त्यांत मुसल्मानांची संख्या ३॥ कोटी होईल. उरलेले तीन कोटि मुसल्मान हिंदुस्तानांत राहतील. पाकि-स्तानच्या मध्यवर्ती सत्तेचें उत्पन्न १० कोटीचे होणार. व संरक्षणक्षमता बिलकूल राहणार नाहीं. पाकिस्तानांतहि शेंकडा २२ मुसलमानेतर राहणार आणि अल्पसंख्यांकांचाहि प्रश्न सुटणार नाहीं. पाकिस्तान सोडून उर-लेल्या हिंदुस्तानांत जादा सवलती, हक्क वगैरे कांहीं मिळणार नाहीं. उलट हिंदुस्तान हें विरोधी राष्ट्र म्हणून राहण्याचा संभव अधिक. देशी संस्था-नांना पाकिस्तानची योजना लागू केली तर हैद्राबाद, भोपाळ, जुनागड, पालनपूर, भावलपूर वगैरे संस्थानें प्रजा बहुसंख्य हिंदु असल्यामुळें हिंदु-स्तानांत जाणार आणि काश्मीर आणि इतर आठ संस्थानें फक्त प्रजा

बहुसंख्य मुसलमान असल्यामुळें पाकिस्तानांत येणार. या सर्व संस्था-नांची लोकसंख्या पन्नास लाख होणार या सर्व संस्थानांतील इतर सर्व मुस्लिम प्रजा (ती पन्नास लक्षापेक्षां अधिक आहे) हिंदुस्तानांतील संस्थानांच्या अंमलांत येणार. म्हणजे ६५१ संस्थानांपैकी फक्त ९ संस्थानें पाकिस्तानांत.

पाकिस्तानची योजना जर सबंध हिंदुस्थानला लागूं करा असा हट्ट मुसलमानांनीं धरला तर त्यांनां न्यायानें वरील प्रमाणें मिळणार आहे. याच्या उलट आजची मुसल्मानांची स्थिति पहाः—

वायव्य सरहद्द प्रांत, बलुचिस्तान, सिंध, संपूर्ण पंजाब आणि संपूर्ण बंगाल या आठ कोटि लोकसंख्येच्या प्रांतांतून मुसलमानांचे हिंदुविरुद्ध बहुमत कायद्यानें प्रस्थापित करण्यांत आलेलें आहे व मुस्लिम बहुमताचा अंमल या आठ कोटि लोकसंख्येच्या प्रांतांत चालू आहे. पाकिस्तानने मिळणार साडेचार कोटींचा प्रांत तर आज ताब्यांत आहे आठ कोटींचा प्रांत. याशिवाय बाकीच्या सर्व प्रांतांतून अल्पसंख्याकत्वाच्या नांवावर जादा प्रतिनिधित्व, खास सोयी, विशेष अधिकार, सर्व प्रांतीय प्रधान मंडळांतून जागा मिळत आहेत. सरकारी नोकऱ्यांतून मुसलमानांचें शेंकडा २५ प्रमाणहि निश्चित करण्यांत आले आहे. लष्करांत शेंकडा ६० पेक्षांहि अधिक लष्कर भरती पंजाब आणि वायव्य सरहद्द प्रांत यांतूनच होत आहे. हैद्राबाद, भोपाळ, जुनागड, पालनपूर वगैरे सारखीं संस्थानें मुसल-मान राजे म्हणून हातांत आहेत. काश्मीरांत बहुसंख्य प्रजा मुसल्मान म्हणून तेथील चळवळ फलद्रुप होतें आहेच. या स्थितीची पाकिस्तानच्या स्थितीशी तुलना केली तर "तीन आण्यास एक आणा" या पेक्षांहि हें प्रमाण कमी पडेल असें वाटतें.

पाकिस्तानमुळें ओढवणारी ही परिस्थिति मुसलमान समाजाला जर सविस्तरपणें आणि यथार्थ रीतीनें समजावून सांगण्यांत आली तर ते पाकिस्तानची मागणी कधींच करणार नाहींत. याच्या उलट पाकिस्तानची योजना अंमलांत आली आणि हिंदुमुसलमानांचा प्रश्न कायमचा सुटावा म्हणून पाकिस्तानांतील मुसल्मानेतरांची वस्ति हिंदुस्थानांत हलवावयाची

आणि सर्व वस्ति पाकिस्तानांत न्यावयाची आणि सर्व देशी संस्थानांतून लगेच जबाबदार राज्यपद्धतीचें संपूर्ण स्वराज्य द्यावयाचें म्हटलें व 'हिंदुस्थान अखंड आणि अविभाज्य राहात नाहीं 'एवढी भावना सोडली तर हिंदूंचा सर्वतोपरि फायदाच होणार आहे. पाकिस्तानांतील १ कोटी हिंदू वगैरे सर्वांना हिंदुस्थानांत आणतां येईल. हिंदुस्थानांतील ( ब्रिटिश हिंदुस्तानांतील तीन कोटि आणि संस्थानांतील अर्धा कोटि मिळून ) साडेतीन कोटि मुसलमानांनां पाकिस्तानांत जावे लागेल. सर्व देशी संस्थानांचे राजे केवळ नामधारीं होतील व सत्ता प्रजेच्या ताब्यांत येईल. आज बऱ्याच प्रांतांना लष्करभरतींत स्थान नाहीं तेंहि मिळेल. मध्यवर्ती सरकारांतून सिंध आणि वायव्य सरहद्द प्रांत यांस वार्षिक देणगी दोन कोटि रुपये द्यावी लागतें ती वाचेल. वायव्य सरहद्द प्रांतांच्या सीमेवरच सध्या लष्करासाठीं सुमारें २५ कोटि रुपये खर्च होतो तोहि थांबेल. हें सर्व झालें तर 'पाकिस्तान घेऊन बाहेर व्हा' अशी मागणी हिंदुसभा कदाचित् करूं लागेल. एवंच हिंदु आणि मुसलमान या दोघांच्याहि हिताच्या दृष्टीनें पाकिस्तानची मागणी त्याज्यच आहे.

सरहद्द प्रांताचे पुढारी खान अबदुल गफार खान आणि त्यांचे बंधू सरहद्द प्रांताचे पूर्वीचे मुख्य प्रधान डॉक्टर खान हे पाकिस्तानला आणि मुस्लिम लीगच्या प्रचारपद्धतीला बिलकुल अनुकूल नाहींत. सिंधचे सध्यांचे मुख्य प्रधान खान बहादूर अल्लाबक्ष आणि शांतता सुव्यवस्था खात्याचें मंत्रि सर गुलाम हुसेन हिदायतुल्ला हेहि पाकिस्तानच्या विरुद्ध आहेत. पंजाबचे मुख्य प्रधान सर शिकंदर हयातखान हे हिंदुस्तानच्या विभागणीविरुद्ध आहेत. मि. फजलूल हक्क बंगालचे मुख्य प्रधान हे जनाब जीनांच्या बाजूनें आणि जनाब जीनांच्या उलट केव्हां बोलतील याचा नियम नाहीं. सर शिकंदर आणि मि. हक्क हे दोघेहि मद्रासच्या मुस्लिम लीगच्या अधिवेशनाला हजर नव्हते ही महत्वाची गोष्ट आहे. मद्रास येथील मुस्लिम लीगच्या अधिवेशनाचे चिटणीस यांनींसुद्धां पाकिस्तानविरुद्ध आपलें मत स्पष्टपणें जाहीर केलें आहे. या सर्व गोष्टी पाहिल्या तर बहुसंख्य मुसलमानांचा पाकिस्तानला पाठिंबा आहे असें बिलकूल



नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

वाटत नाहीं. परंतु मुसलमानांना काय वाटतें याचा अंदाज कशाला? घटना समितीच्या द्वारें सर्व मुसलमानांची मतें घेऊन जर बहुसंख्य मुसलमानांनीं पाकिस्तानला पाठिंबा दिला तर पाकिस्तानचा विचार जरूर करावा असें महात्माजींनींहि सुचविलें आहेच. केवळ मुसलमानांच्या हिताच्या दृष्टीनें विचार केला तरीहि पाकिस्तानची योजना ग्राह्य ठरूं शकत नाहीं एवढेंच येथें सुचवावयाचें आहे.

एवंच संरक्षणक्षमतेच्या, ऐतिहासिक परंपरेच्या, आचारविचारांच्या, समानतेच्या या साऱ्या दृष्टींनीं विचार केल्यास हिंदुमुसलमानांनीं हिंदुस्तानांत एकत्र आणि एकराष्ट्रीयत्वाच्या दृष्टीनें राहण्यातच दोघांचेंहि आत्यंतिक हित आहे एवढेंच नव्हे तर ज्या तात्विक कारणासाठीं मुस्लिम लीग पाकिस्तान मागत आहे ती तात्त्विक भूमिकाहि सदोषच आहे.

पाकिस्तानच्या पाठीमागील तात्विक भूमिका थोडक्यांत खालीलप्रमाणें आहे. "हिंदूंचा आणि मुसलमानांचा धर्म आणि त्यांची संस्कृति परस्परविरोधी आणि विभिन्न आहे व त्यामुळें या दोन धर्मीयाचें हिंदुस्तानांत एकराष्ट्र कधींहि होणें शक्य नाहीं. हिंदु आणि मुसलमान हीं दोन स्वतंत्र राष्ट्रें आहेत व प्रत्येकास स्वतःच्या वाढीसाठीं स्वतंत्र प्रदेशाची जरूरी आहे यासाठीं पाकिस्तान पाहिजे." या भूमीकेमुळें खालील मुद्दे उपस्थित होतातः—

( १ ) हिंदुधर्म आणि इस्लाम हे परस्परविरोधी धर्म आहेत काय?

( २ ) हिंदुस्तानांतील हिंदूंची आणि मुसल्मानांची संस्कृति परस्पर विरोधी आहे काय?

( ३ ) एक धर्मीयांचें एक राष्ट्र झालेंच पाहिजे हा नियम बरोबर आहे काय?

( ४ ) भिन्न धर्मीयांचा समावेश एका राष्ट्रांत होऊं शकतो कीं नाहीं?

( ५ ) हिंदुस्तानची पूर्वपरंपरा या बाबतींत काय आहे?

या पांच मुद्यांच्या निर्णयावर पाकिस्तानची भूमिका बरोबर आहे किंवा काय तें ठरणार आहे.

हिंदु आणि इस्लाम या दोन्ही धर्मांचा इतिहास, तत्वज्ञान आणि संस्कृति येथील जनतेस यथार्थत्वें शिकविली गेली नाहींत. इंग्रजी भाषेच्या द्वारें आणि ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या दृष्टीकोनानें या दोन्ही धर्मांचा इतिहास येथें शिकविला गेला. कोणताहि धर्म चांगल्या रीतीनें समजावून घ्यावयाचा असल्यास त्या धर्माविषयीं श्रद्धा, आदर बाळगणाऱ्या आणि त्या प्रमाणें आचरण करणाऱ्या व्यक्तींकडूनच तो धर्म समजावून घेतला पाहिजे. परंतु तसें हिंदुधर्माबद्दल आणि इस्लामबद्दल दुर्दैवानें झालें नाहीं. इस्लामचे अनुयायी म्हणून हिंदुस्तानवर मुसलमान जमातींनीं राज्यलालसा आणि धनतृष्णा भागविण्यासाठीं जे अनन्वित अत्याचार केले त्या अत्याचारांना इस्लामची मान्यता होती एवढेंच नव्हे तर हे अत्याचार म्हणजेच इस्लाम धर्म असें दुर्दैवानें मानण्यांत आलें.

हिंदुधर्मांत उच्च तत्वज्ञान बिलकुल नाहीं. मूर्तिपूजा, नाना जाति आणि पंथ आणि भोळसर समजुति यांवर हिंदुधर्म उभारलेला आहे असें हिंदुधर्माबद्दल सांगण्यांत आले. असहिष्णुता, तरवारीची भाषा बोलणारा तो इस्लाम धर्म अशी इस्लामबद्दल समजूत झाली. हिंदुधर्म हा मानवतेचा धर्म आहे, तत्वज्ञानाच्या सर्व शाखांचा त्यांत समावेश झालेला आहे, तो तामसी धर्म नाहीं, सात्विक आणि सहिष्णु असा तो धर्म आहे, संकुचित विचारसरणीचा तो गुलाम नाहीं, अद्वैत, द्वैत, विशिष्टाद्वैत या साऱ्या विचारांनां त्यानें आपल्या घरीं आदरानें स्थान दिलें आहे. बुद्धिवादाला, वैचारिक भरारींनां, मतभिन्नतेला हिंदुधर्मांत पूर्ण वाव असून ईश्वराचें एकत्व आणि श्रेष्ठत्व हिंदुधर्माला मान्य आहे हें विसरण्यांत आलें. इस्लाम हा तरवारीचा धर्म नाहीं. इस्लाम हा शब्दसुद्धां सल्म-(शांति) या शब्दावरून झालेला आहे व 'ला इलाही' (ईश्वर एकच आहे) ही कुराणाची जी मुख्य शिकवणूक तिजकडे दुर्लक्ष्य झाले. "एकमेव अद्वितीयं ब्रह्म" या उपनिषद् वाक्यांशी ही शिकवणूक कितितरी सारखी आहे. कुराणांमधील "ला इलाही इल्लला" म्हणजेच उपनिषदांतील एकमेव अद्वितीयं ब्रह्मं" आहे. इस्लामनेंहि एकेश्वर वादाचा पुरस्कार केलेला आहे. तो बळजबरीवर आधारलेला नाहीं. धर्माच्या बाबतींत बळजबरी योग्य

नाहीं. असें कुराणांतील वचन (ला इकरारो फिद्दीन) आहे. ईश्वराचें एकत्व, श्रेष्ठत्व आणि ईश्वराशीं शरणागति ही इस्लामची प्रमुख तत्वें आहेत. समानतेचा, बंधुत्वाचा पुरस्कार इस्लामनें केला आहे. इतर सर्व धर्म आणि धर्मकार खोटे आहेत असें इस्लामनें किंवा महमद पैगंबरानें कधींही म्हटलें नाहीं.* उलट इतर सर्व धर्मानां मान देऊन त्या त्या धर्माचे धर्मकार हे ईश्वराचे प्रेषितच आहेत असें महंमद पैगंबरानें म्हटलें आहे. "तुमच्या देशावर प्रेम करणें हें तुमचें कर्तव्य (फर्ज़) आहे" असेंहि इस्लामनें म्हटलें आहे. शांतीचा, शरणागतीचा, एकेश्वरवादाचा, समानतेचा, दुसऱ्या धर्मकारांना ईश्वराचे प्रेषित समजणारांचा, स्वतःच्या देशावर प्रेम करावयास सांगणारांचा इस्लाम धर्म हा हिंदुधर्माशीं विरोधी आहे हें म्हणणें सत्यावर आधारलेलें आहे काय? बिलकुल नाहीं. हिंदुधर्म आणि इस्लाम हे दोन धर्म परस्पर विरोधी बिलकुल नाहींत असाच याचा निष्कर्ष निघतो.

आतां हिंदुस्तानांतील हिंदूंची आणि मुसलमानांची संस्कृति परस्पर विरोधी आहे काय तें आपण पाहूं. हिंदु संस्कृति आणि मुस्लिम संस्कृति

* Say we believe in Allah and [in] that which has been revealed to us and [in] that which was revealed to Abraham and Ishmael and Isaac and Jacob and the tribes and (in) that which was given to Moses and Jesus and (in) that whieh was given to the prophets by their Lord, we do not make any distinction between any of them and to Him do we submit.

सूरे बकर, आयत १३६

The Holy Quran by Moulavi

Mahammed Ali - 2nd Edition. Page 64.

वरील कुराण वचनांवर टीका करतांना लेखक त्याच पानांवर म्हणतातः—

This shows the cosmopolitan nature of a Muslim's belief. Not only is belief in the great prophets of Israel an article of faith with Muslim but the words 'that which was given to the prophets from their lord' make thc Muslim conception of belief in prophets as wide as the world.

परस्पर विरोधी आहेत असें म्हणणाऱ्यांचा मुख्य भर हिंदु धर्म आणि इस्लाम हे परस्परविरोधी धर्म आहेत या पायावर असतो पण तो पाया टिकाऊ नाहीं हें आपण पाहिलेंच आहे. हे दोन धर्म परस्पर विरोधी होणार हें म्हणणें सहजच लंगडें पडतें. हिंदुस्तानांतील हिंदु आणि मुसलमान यांपैकीं पुष्कळ लोक वंशानें आणि रक्तानें एकच आहेत. खास परदेशांतून आलेल्या मुसलमानांची संख्या अत्यल्प आहे आणि त्यांतूनहि मुसलमान बादशहांसकट सर्वांनीं संमिश्र विवाह पुष्कळ वेळां केलेले आहेत. हिंदु आणि मुसलमान यांची मातृभाषाहि कोठेकोठें एकच आहे. बंगालमधील हिंदु आणि मुसलमान हे दोघेहि बंगालीच बोलतात. सिंधमधील सारे सिंधीच बोलतात. महाराष्ट्रांतल्या हिंदु-मुसलमानांची भाषा मराठीच आहे. हीच स्थिति सर्व प्रांतांतून आहे. हिंदुमुसलमानांचें पुष्कळ रीतिरिवाजहि सारखेच आहेत. हिंदुस्तानांतील हिंदु व मुसलमान कलांवतांच्या सहाय्यानें संगीत, शिल्प, चित्र वगैरे कला निर्माण झाल्या व वाढल्या. हिंदी संगीत हें हिंदुमुस्लिम सांस्कृतिक ऐक्याचें प्रतीक आहे. संगीताच्या इतिहासांत हिंदू आणि मुसलमान या दोघांनींहि आजपर्यंत महत्वाची कामगिरी केली आहे. ख्याल, तराणासारखे राग या संमिश्रणाचे परिणाम होत. हिंदी कलावंतांचीं नुसती नामावली ही या ऐक्याचा पुरावा देईल. रीतिरिवाजांतहि हिंदुमुसलमानांचें साधर्म्य आहे. पंजाब आणि वायव्य सरहद्द प्रांतांतील पोषाखावरून आणि बोलण्याचालण्यावरून हिंदु कीं मुसलमान हें ओळखलें जाणें शक्य नाहीं. पोषाख, भाषा, चालीरीति, समान प्रदेश, समान सुखदुःखें यांनीं हिंदुमुसलमानांची संस्कृति संमिश्र केली आहे त्यामुळें हिंदुमुसलमानांची संस्कृति परस्पर विरोधी आहे हें म्हणणें खोटें ठरतें.

आतां आपण तिसऱ्या मुद्याकडे वळूं. एकधर्मीयांचे एक राष्ट्र झालेंच पाहिजे हा नियम खरा आहे काय? आज जगांमध्यें हिंदु, बुद्ध, ख्रिश्चन, इस्लाम, ज्यू आणि झोरोस्ट्रियन हे मुख्य धर्म आहेत आणि धर्माप्रमाणें राष्ट्रांची विभागणी करावयाची तर जगांत सहाच राष्ट्रें असावयास पाहिजेत. पार्शी आणि ज्यू यांचे स्वतंत्र राष्ट्र नाहीं. ज्यू साऱ्या

जगांत पसरलेले आहेत तर पार्शी फक्त विशेषतः मुंबई प्रांतातच आहेत. चीन आणि जपान हीं प्रमुख बुद्धधर्मीय राष्ट्रें किती तरी वर्षें एकमेकांविरुद्ध झगडत आहेत आणि जपानचा साम्राज्यलोभ चीनच्या नाशाला कारणीभूत होत आहे. तुर्की, आरब, इजिप्शिअन, पर्शियन, अफगाण हे सारे इस्लामचे अनुयायी पण या सर्वांचे मिळून एक राष्ट्र होणें कोणासच पटले नाहीं. तुर्की आणि आरब लोक तुर्की साम्राज्यांत समान दर्जा उपभोगीत असतां आरबांनीं आपला देश तुर्कांशी भांडून स्वतंत्र करून घेतला. हिंदुस्तानांतील हिंदुमुसलमान खिलाफतीची चळवळ जोरानें करीत असतां तुर्कांनीं खलिफाला हांकून लावला. ईस्लामचे अनुयायी म्हणून विचार करण्यापेक्षां तुर्क, आरब, इजिप्शिअन, अफगाण हे आपण निरनिराळ्या राष्ट्रांचे घटक आहोंत या दृष्टीनें विचार करीत आहेत आणि वागत आहेत. युरोपखंडांत बहुसंख्य खिश्चन धर्माचे अनुयायी असून आज त्यांनीं हत्याकांडाची परिसीमा गांठली आहे. खिश्चन धर्माचे तर एक राष्ट्र नाहींच, परंतु जगावरील अधिराज्याच्या अभिलाषानें त्यांनीं एकमेकाचा आणि जगाचा भीषण संहार चालविला आहे. या सर्व उदाहरणावरून धार्मिक पायावर राष्ट्राची उभारणी व्हावी किंवा एकधर्मीयांचें एक राष्ट्र असावें हा सिद्धांत कोलमडून पडतो.

---

* After the conquest of Egypt by the Ottoman Turks (1516) the Turkish Sultan of constantinople began to hold the office of the Caliph as well and continued to do so till the year 1924 when the caliphate was abolished by the nationalist Turks. It may here be noted that a new national conscience was developing gradually. Time came when The Arbs, The Turks, The Egyptians, The Persians and The Afgans began to think in terms of distinct and different nationalities. And it is this thought that to-day for all practical purposes govern their relations.

Hindus and Musalmans of India by Atulananda Chakrabarli
Paga 32-33

त्यानंतर भिन्न धर्मीयांचा समावेश एका राष्ट्रांत होऊं शकतो कीं नाहीं हा प्रश्न आपण हातीं घेऊं. धार्मिक पायावर राष्ट्राची उभारणी झाली पाहिजे किंवा एकधर्मियांचें एकराष्ट्र असलेंच पाहिजे हा सिद्धांत खरा नाहीं हें आपण पाहिलेंच आहे व त्यामुळें भिन्न धर्मीयांचा समावेश एका राष्ट्रांत होण्यास हरकत नाहीं असेंहि एकप्रकारें सिद्ध झालेंच आहे. चीन देशांत बुद्धधर्माचे, ख्रिश्चन धर्माचे, इस्लामी धर्माचे आणि तेथील मूळ धर्माचे अनुयायी आहेत आणि ते सर्व एकत्र गुण्यागोविंदानें राहून चीनला आपलें राष्ट्र मानीत आले आहेत व आपल्या राष्ट्राच्या स्वातंत्र्यसंरक्षणासाठीं आज जपानशीं शौर्यानें लढतहि आहेत. अमेरिकेंत ख्रिश्चन, ज्यू वगैरे धर्मांचे लोक आहेत व ते सारे अमेरिकेलाच आपलें राष्ट्र मानतात आणि धर्माच्या नांवावर अमेरिकेला विभागण्याची भाषा कधींहि ऐकूं येत नाहीं. रशियांतील सरकार तर धर्माला मानीतच नाहीं. " गरीबांना दास्यांत ठेवण्यासाठीं वरच्या वर्गांनीं योजलेली युक्ति म्हणजेच धर्म ' असें तें सरकार समजतें. सध्यांचा रशिया म्हणजे अनेक भाषा, अनेक संस्कृति अनेक वर्ण आणि वंश या सर्वांचे माहेरघर आहे. संस्कृति, भाषा, वर्ण आणि वंश यांच्या भेदामुळें एक राष्ट्र होऊं शकत नाहीं असे म्हणणारांना रशिया हें चोख उत्तर आहे. वरील उदाहरणांवरून भिन्न धर्मीयांचा एका राष्ट्रांत समावेश होऊं शकतो हें सिद्ध होत आहे.

त्यानंतर हिंदुस्तानची पूर्वपरंपरा काय आहे हा महत्वाचा प्रश्न पुढें येतो. भिन्न धर्म असल्यामुळें एकराष्ट्रीयत्वाला बाध येतों हें म्हणणें खरें नसेल; हिंदुधर्म आणि इस्लामी धर्म किंवा हिंदुसंस्कृति आणि इस्लामी धर्म परस्पर विरोधी नसतील; एक धर्म म्हणजे एक राष्ट्र हा सिद्धांत खरा नसेल; भिन्न धर्मियांचे एक राष्ट्र होऊं शकतें हें तत्वतः खरें असेल पण या सिद्धांताचें आम्हांला काय होय ?

या हिंदुस्तानांत गेल्या आठ नऊ शतकांत हिंदु आणि मुसलमान स्नेहभावानें नांदले आहेत काय ? हिंदु आणि मुसलमान यांचेमधील संबंध कधीं तरी स्नेहाचे होते काय ? हिंदुस्थानची परंपरा परधर्मीयांशी बरोबरीच्या नात्यानें वागविण्याची आहे काय ? गेल्या कित्येक शतकें हिंदु

मुसलमानांचें भांडण हीच नित्याची गोष्ट नाहीं काय ? वगैरे प्रश्न उपस्थित होतात. हे सारे प्रश्न खालील दोन प्रश्नांत समाविष्ट होतील.

( १ ) हिंदुस्तानांत पूर्वी निरनिराळ्या धर्मांचे आणि संस्कृतीचे लोक जेव्हां एकत्र आले तेव्हां त्यांचा प्रश्न कसा सुटला गेला.

( २ ) हिंदु मुसलमानांचे संबंध येथें कसे होते ?

मुसलमानांच्या आगमनानें भिन्न धर्मीय आणि भिन्न संस्कृतीचे लोक प्रथमच येथें आले असें झालेले नाहीं. मुसलमानांच्या पूर्वी हजारों वर्षांपासून निरनिराळ्या धर्मांचे, निरनिराळ्या वंशाचे, निरनिराळ्या संस्कृतीचे लोक येथें आले आणि त्यांचे त्या त्या वेळच्या एतद् देशीयांबरोबर घनघोर झगडे झाले. त्याबरोबरच झगड्यानंतर जेत्यांनीं जिताचा संपूर्ण नाश केला नाहीं तर एकमेकांचा धर्म, संस्कृति, चालीरीति, कला या सर्व गोष्टि समजावून घेऊन त्यांनीं आपसांत देवाण घेवाण केली व ऐक्य प्रस्थापित केले ही गोष्ट भारतवर्षाच्या इतिहासांत नमुद आहे. फार प्राचीन काळीं द्रविड लोक पहिल्या प्रथम बाहेरून हिंदुस्थानांत आले. ते येथें आल्यानंतर त्यांचे आणि येथील लोकांचे तीव्र झगडे झाले. झगड्यानंतर शांततेचा काळ आला व एकमेकांनीं एकमेकांच्या चालीरीति वगैरे समजावून घेतल्या. त्यावेळेपासून पंचायतीची राज्यव्यवस्था एतद्देशीय लोकांत चालू होती. ती द्रविड लोकांनीं स्वीकारली. द्रविड लोकांनीं आपली जातिसंस्था बद्धमूल केली. मूर्तिपूजा आणि भव्य मंदिरें या गोष्टी द्रविडांनीं हिंदुस्थानांत आणल्या व रूढ केल्या. त्यानीं येथें वैभवशाली साम्राज्येंहि स्थापिलीं, त्यानंतर बंगाली, गुजराथी आणि मराठी यांचे पूर्वज बाहेरून आले व स्थायिक झाले. त्यानंतर नॉर्डिक आर्य आले. आर्य आणि द्रविड या दोघांचे घनघोर संग्राम या भूमींत झाले. द्रविड कांहीं मागासलेले नव्हते. त्यामुळें त्यांना पराभूत करण्याचें काम आर्यांना सोपें गेलें नाहीं. या युद्धानंतर शांततेचा काळ आला व विचारांची, चालिरीतींची आणि संस्कृतीची देवाण घेवाण सुरू झाली. आर्यांमध्यें देवांची प्रतिमा करून त्याची पूजा करणें आणि त्यासाठीं भव्य मंदिरें उभारणें या गोष्टी नव्हत्या त्या त्यांनीं द्रविडांपासून घेतल्या आणि

स्वीकारल्या; द्रविडांची जातिव्यवस्था त्यांनीं उचलली आणि त्यांत आश्रमव्यवस्थेची भर घालून ' वर्णाश्रमव्यवस्था ' पूर्ण केली. आर्यांनीं द्रविड आणि आदि द्रविड यांचे देवहि स्वीकारले व त्यांना अत्यंत महत्वाचें स्थान दिलें. श्रीकृष्ण हा मूलतः वैदिक देव जो इंद्र त्याचा शत्रू होता. तो आदि आर्यांचा देव होता. त्याप्रमाणें शिवाचेंहि होते. शिव हा प्रजापतीचा शत्रू होता. पण कृष्ण आणि शिव या दोघांनाहि आर्यांनीं स्वतःचे देव म्हणून स्वीकारले. कृष्ण हा विष्णुचेंच रूप आहे आणि शिव म्हणजेच रुद्र आहे असें स्वरूप देऊन आर्यांनी त्यांना देव मानले. आज संबंध हिंदुस्थानांत कृष्ण आणि शिव हीं दोन दैवतें अतिशय लोकप्रिय आहेत पण तीं मूळचीं अनार्य आहेत. अशा रीतीनें हजारों वर्षांपासूनची हिंदुस्थानची परंपरा सहिष्णुतेची, समावून नेण्याची, ऐक्याची आहे. वैराची, नाशाची, असहिष्णुतेची नाहीं. भिन्नभिन्न लोक या हिंदुस्थानांत पूर्ण सलोख्यानें नांदलेले आहेत. असेंच या प्रश्नाचें उत्तर इतिहासाला द्यावें लागेल.

त्यानंतर हिंदु मुसल्मानांचे संबंध येथें कसें राहत आले आहेत हा महत्वाचा प्रश्न आपण हातीं घेऊं. रक्तपातानें, लुटीनें आणि लढाईनें हिंदुस्थानांतील हिंदु-मुसल्मानांचे संबंध सुरू झाले आणि ते संबंध त्याच स्वरूपांत पुष्कळ वेळ टिकले असा सार्वत्रिक समज करून देण्यांत आला आहे पण तो समज अत्यंत चुकीचा आहे. हिंदुस्थान देश संपत्तीसाठीं आणि सौभाग्यासाठीं त्यावेळीं प्रसिद्ध होता आणि जगांतील सर्व लोकांचें लक्ष या देशाकडे सहजच होते. इस्लामच्या प्रस्थापनेनंतर थोड्याच अवधींत मुस्लिम व्यापारी हिंदुस्थानांत शांततेनें व्यापार करण्यासाठीं आले. सहाव्या शतकांत त्यांची संख्या बरीच झाली. सातव्या शतकाच्या अखेरीस मलबारच्या किनाऱ्यावर पुष्कळ मुस्लिम व्यापाऱ्यांची घराणीं सुखानें नांदू लागली होती. ते व्यापार करीत, पैसा कमवीत आणि आपला धर्म सुखानें पाळीत. या व्यापाऱ्यांबरोबर पुष्कळ मुस्लिम संत, शेख आणि दरवेशीहि येथें आले होते. ते बहुजन समाजांत मिसळत, उपदेश करीत आणि धर्मप्रसाराचें काम करीत. हिंदु राजांकडून मुस्लिम व्यापाऱ्यांवर

किंवा साधुसंतावर कोणत्याहि प्रकारचा अत्याचार घडला नाहीं. ९ व्या शतकांच्या सुरवातीस मलबारच्या हिंदुराजानें स्वखुषीनें मुस्लिम धर्म स्वीकारला. अशारीतीनें हिंदुमुसलमानांचें संबंध येथें शांततेनें आणि सलोख्यानें सुरू झाले. दुसरीकडे वलीद खलिफा असतांना, महंमद बिन कासीमनें सिंधवर स्वारी केली आणि इ. स. ७१२ च्या सुमारास सिंध· आणि मुलतान हे प्रदेश जिंकले.

अधिराज्य मुसलमानाचें पण इतर सत्ता हिंदूच्यांच हातीं राहिली. सामाजिक व्यवस्थेंत आणि खेड्यांच्या स्वयंपूर्णतेंत कांहीं फरक पडला नाहीं; धार्मिक क्षेत्रांत जुलुम जबरदस्ती फारशी झाली नाहीं. सांस्कृतिक दळणवळण सुरू झाले. ज्योतिष, गणित, वैद्यक, तत्वज्ञान वगैरे विषयावरील संस्कृत ग्रंथांचीं भाषांतरें आरबी भाषेंत झाली आणि परस्पर आदर वाढूं लागला. त्यानंतर गिझनीच्या महंमदाच्या स्वाऱ्या सुरु झाल्या. " आपण जगज्जेता व्हावें. " आपल्या गिझनींत जगाची संपत्ती नांदावी " अशी आसुरी आकांक्षा " महंमदाची होती. त्यासाठीं त्यानें जेथें संपत्ति दिसली त्याठिकाणीं झडप घातली, अत्याचार केले व संपत्ति लुटली. हिंदुस्तान हा काफीरांचा देश होता आणि इस्लाम वरील निष्ठेनें महंमदानें हिंदुस्थानवरील स्वाऱ्या केल्या हें म्हणणें निव्वळ थोतांड आहे. गझनीच्या महंमदापाशीं धर्माला बिलकुल किंमत नव्हती. त्यानें हिंदुस्तान लुटले आणि इराणचे मुस्लिम राज्य कांहीं मोकळे सोडले नाहीं. तेंहि तितक्याच भीषण रीतीनें लुटलें. गझनीच्या महंमदानें किंवा इतर मुस्लिम आक्रमकांनीं जे हिंदुस्तानांत अत्याचार केले त्यांचे " हिंदूवर मुसलमानांनीं केलेले अत्याचार " असें वर्णन करणें बरोबर नाहीं. आसुरी आकांक्षेनें आणि पाशवी स्वार्थानें केलेले अत्याचार असेंच त्यांचे वर्णन बरोबर होईल. गझनीच्या सुलतान महंमदानंतर महंमद घोरी आणि त्याचा सेनापती कुतुबुद्दीन यांच्या स्वाऱ्यांस सुरवात झाली. कुतुबुद्दीननें दिल्लीवर चंद्रांकित निशाण फडकवले आणि हिंदुस्तानांतील मुस्लिम अधिराज्यास सुरवात झाली. तेराव्या शतकाच्या सुरवातीस उत्तर हिंदुस्तानांत आणि चौदाव्या शतकांत

दक्षिणेंत मुस्लिम राज्य स्थिरतेनें स्थापन झालें. आलेले मुसलमान या देशांत स्थायिक झाले आणि तें हिंदुस्थानलाच आपला देश समजूं लागले.

पुढें १५ व्या शतकापासून मोंगली साम्राज्य हिंदुस्तानांत स्थापन झालें. बाबर, हुमायून, अकबर, जहांगीर, शहाजहान, अवरंगजेब या मोंगली राज्यकर्त्यांनीं हें साम्राज्य उपभोगिलें. अकबरानें हिंदु–मुस्लिम ऐक्यासाठीं चांगलें आणि मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केले तर अवरंगजेबानें हिंदु प्रजेस समानतेनें वागविले नाहीं. या सर्व राजकीय घडामोडी होत असतां, हिंदुस्तानांतील असंख्य खेड्यावर आणि त्यांतील लोकसंख्येवर या घडामोडींचा फारच अल्प प्रमाणावर परिणाम झाला, एक राजसत्ता गेली आणि दुसरी राजसत्ता आली पण खेडेगांवची स्वयंपूर्णता आणि खेडेगांवचे जीवन कायमच राहिलें. कार्ल मार्क्स यानें ' हिंदुस्तान ' वरील आपल्या लेखांत खालीलप्रमाणें विचार प्रकट गेले आहेत.

+" भौगोलिक दृष्ट्या विचार करितां हिंदुस्तानांतील एक खेडें हें सुमोंरें हजार एकरांच्या आंत बाहेर इतकी पिकाची जमीन अथवा माळरान यांचें बनलेलें असतें. अगदीं स्थानिक स्वरूपाच्या या राज्यसंस्थेखालीं हजारों वर्षें हिंदी खेड्यांतील माणसें राहत आलीं आहेत. खेड्यांच्या सरहद्दी बहुदा पालटल्या नाहींत. स्वतःच्या खेड्यांतील नागरिकांनीं मध्यराज्य सत्तेचें कधीं व कसे तुकडे झाले याची केव्हांहि पर्वा केली नाहीं. जोपर्यंत खेडें हें अखंड राहिले असेल तोपर्यंत तें खेडें कोणाच्या राज्यांत आहे अथवा कोणत्या राजाकडून कोणत्या राजाकडे गेले आहे याची फिकीर ते करीत नसत. त्यांची अंतर्गत आर्थिक संघटना मध्यसत्तेंत होणाऱ्या वालमेलीनें बदलत नसे. देशाच्या राजधानींत कांहींहि उलाढाली झाल्या तरी निरनिराळ्या खेडयांत पाटील हाच प्रमुख नागरिक, तोच जज्ज व मॅजिस्ट्रेट आणि तोच खेडयाचा कलेक्टरहि असे हिंदुस्तानच्या भूतकाळांत राजकीय सत्तेचें स्वरूप वेळोवेळीं कसेंहि पालट-

+पान ८५०–५१ मार्क्सचें कॅपिटल-सारग्रंथ पैकीं कार्लमार्क्स आणि हिंदुस्तान या विभागांतून.

लेलें असो, अति प्राचीन काळापासून एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या दशकापर्यंत हिंदी समाजजीवन कधींहि पालटलें नव्हते. हातमाग आणि सूत कांतण्याचा रहाट यांनीं। सूत कांतणारे आणि कापड विणणारे असंख्य लोक जन्मास घातले असून हिंदी समाजघटनेचे ते आधार होते......( अरब, तुर्क, तार्तर, मोंगल वगैरे ज्यांनीं ज्यांनीं लागोपाठ हिंदुस्तान जिंकला ते ते सर्व हिंदु संस्कृतींत विरून गेले. इतिहासाच्या अविरत क्रमानुसार आपल्या प्रजेच्या उत्तम संस्कृतीनें हे रानटी नेते स्वतःच जिंकले गेले ) " अशा रीतीनें हिंदुस्तानच्या सामाजिक जीवनांत विशेष फेरफार झाला नाहीं. खेडेगांवांतील जीवन स्वयंपूर्ण आणि सलो-ख्याचे राहिले. हिंदु–मुस्लिम साधुसंतांनीं ऐक्याचा, प्रेमभावनेचा प्रचार केला; 'राम-रहीम' हे एकच आहेत असें जनतेला पटविले. गुरु नानक, कबीर, चैतन्य, ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम वगैरे संतांनीं आपल्या रसाळ वाणीनें सर्व धर्म समभाव लोकांच्या मनांत भरला आणि दोन्ही धर्मांचे लोक खेळीमेळीनें आणि गुण्यागोविंदानें राहूं लागले.

हा सर्व इतिहास पाहिला म्हणजे हिंदुस्तानांत मुसलमान आल्यापासून हिंदूंचे आणि मुसलमानांचे संबंध सर्वसाधारणपणें स्नेहाचेच रहात आले आहेत; संस्कृतीची, कलेची, भाषेची, रीतिरिवाजांची देवाणघेवाण झालेली आहे असेंच आढळून येईल.

हिंदूंचा आणि मुसलमानांचा धर्म आणि त्यांची संस्कृति परस्परविरोधी नाहींत; हिंदू आणि मुसलमान हे कित्येक वर्षें सुखासमाधानानें येथें नांदले आहेत. पारतंत्र्यांत हिंदू आणि मुसलमान हे एकत्र अखंड हिंदुस्तानांत राहिलें त्याचप्रमाणें ऐक्यतेनें स्वातंत्र्यासाठीं झगडून त्यांनीं स्वतंत्र हिंदुस्तानांतहि एकत्रच राहिले पाहिजे. यांतच हिंदू, मुसलमान आणि हिंदुस्तानांतील सर्व प्रजाजनांचे आर्थिक, सामाजिक, धार्मिक हित सांठविलेलें आहे.

———

## क्रिप्स योजना आणि नंतर— : : : : १३

महायुद्धाला सुरवात होऊन २॥ वर्षें होऊन गेलीं. रशिया सोडून सबंध युरोप जर्मनीनें पादाक्रांत केला. युद्धांत पडल्याबरोबर जपाननें मिळविलेले विजय धक्के देणारे झाले. हिंदुस्तानच्या हार्दिक सहकार्या-शिवाय हें महायुद्ध जिंकणें आणि त्वरित जिंकणें अशक्य आहे अशी खात्री चीनमधील आणि अमेरिकेंतील विचारवंतांची झाली. चीनचे पुढारी मार्शल चिआंग कै शेक हे हिंदुस्तानांत येऊन समक्ष परिस्थिति पाहून गेले. या सर्वांचा परिणाम होऊन ब्रिटिश प्रधानमंडळाच्या वतीनें हिंदुस्तानच्या राजकारणांतील अगतिकता सोडविण्यासाठीं व हिंदुस्तानचे युद्धकामीं सहकार्य मिळविण्यासाठीं सर स्टॅफर्ड क्रिप्स हे नवी दिल्ली येथें तां. २३ मार्च १९४२ रोजीं येऊन दाखल झाले.

हिंदुस्तानांतील संस्थानिक, रॉयवादी, कम्युनिस्ट, हिंदूसभावाले आणि इतर जातीय पक्षांचे लोक हे आपापल्या परीनें युध्दसहकार्य करीतच होते. कॉंग्रेसनें मात्र युध्दाच्या सुरवातीपासून युध्दकार्याशीं असहकार पुकारला होता. युध्दहेतू जाहीर करा आणि त्या युध्दहेतूंची हिंदुस्तानांत

ताबडतोब अंमलबजावणी करा म्हणजे हिंसेनेहि युध्दांत भाग घेण्याचा आम्ही विचार करूं असें काँग्रेसनें जाहीर केलें होतें. मुस्लीम लीगचें धोरण गुळमुळीत होतें. नवीन येणाऱ्या घटनेंत पाकिस्तानचें तत्व निःसंशय रीतीनें मान्य केलें गेलें पाहिजे आणि चालू युध्दकाळांत काँग्रेस सहभागीं होणार असेल तर निम्मे प्रतिनिधित्व नाहींतर बहुमत दिलें पाहिजे अशी मुस्लिम लीगच्या वतीनें जनाब जीना यांनीं मागणी केली होती. पण ती व्हाइसरॉयनीं झिटकारली होती. सर स्टॅफर्ड क्रिप्स येण्यापूर्वीची परिस्थिति थोडक्यांत वरीलप्रमाणें होती.

हिंदुस्तानवरील ब्रिटनची सत्ता युद्धकाळापुरती तरी अबाधित ठेवावयाची, ज्या पक्षाला जें पाहिजे तें आपल्या योजनेंत आहे असें दाखवावयाचें आणि हिंदी लोकांच्या हातीं सत्ता न देतां गोड वाणीनें आणि आश्वासनानें भरपूर युध्दसहकार्य मिळवावयाचें असा हेतू मनांत बाळगून क्रिप्ससाहेब हिंदुस्तानांत आले. सर स्टॅफर्ड क्रिप्स साहेबांनीं जी योजना हिंदुस्तानच्या पुढाऱ्यांच्या पुढें मांडली तिचा आशय पाकिस्तानच्या विषयापुरता खालीलप्रमाणें होता.

१ घटना समितीनें तयार केलेली नवी घटना एखाद्या प्रांतानें जर स्वीकारण्याची तयारी दर्शविली नाहीं तर विद्यमान घटनाच कायम ठेवण्याचा त्याला अधिकार राहील आणि भविष्यकालांत जर त्या प्रांताला नव्या हिंदी राज्यांत प्रवेश करावयाचा असेल तर त्याला तसें करतां येईल.

२ जे प्रांत नव्या हिंदी यूनियनमध्यें सामील व्हावयास तयार नसतील त्यांनीं, जर आपली इच्छा व्यक्त केली तर, त्यांना हिंदी राज्याच्या दर्जाइतकीच एक नवी घटना देण्याची बादशहाच्या सरकारची तयारी राहील.

३ आगामी घटनेंत वांशिक व धार्मिक अल्पसंख्यांकांच्या हितसंबंधांचें रक्षण करण्याच्या बाबतींत बादशहाच्या सरकारनें जी हमी दिली आहे तिचें परिपालन करण्याच्या दृष्टीनें त्यांत तरतूद असेल.

४ एखाद्या हिंदी संस्थानानें नवी घटना मान्य केलेली असो वा नसो नव्या परिस्थितीमुळें जरूर तेवढे त्यांच्याशीं पूर्वी झालेल्या तहनाम्यामध्यें फेरफार करणें आवश्यक होईल.

सर स्टॅफर्ड क्रिप्स आणि कॉंग्रेस पुढारी यांच्या दरम्यान सबंध क्रिप्स-योजनेवर दीर्घकाल वाटाघाट झाली. त्यांत प्रेसिडेंट रुझवेल्ट यांचे हिंदुस्तानांतील प्रतिनिधी कर्नल लुई जॉन्सन यांनींहि भाग घेतला. सत्ता-संक्रमणाच्या प्रश्नावर शेवटीं ही चर्चा निष्फळ ठरली.

संरक्षण आणि राष्ट्रीय सरकार यांचा समावेश या योजनेंत नाहीं; संस्थानी प्रजेला लोकनियुक्त प्रतिनिधी पाठविण्याचा अधिकार न देऊन त्यांना जनावराप्रमाणें विकण्याचा हक्क संस्थानिकांना देण्यांत आला आहे अशीं कारणें क्रिप्सयोजना फेटाळण्याला कॉंग्रेस वर्किंग कमिटीनें दिलीं. त्याबरोबरच क्रिप्स योजनेंत प्रांतांना फुटून निघण्याचा अधिकार देण्यांत आला होता त्यासंबंधीं कॉंग्रेस वर्किंग कमिटीनें खालील अभिप्राय व्यक्त केला आहे.

"संयुक्त हिंदी राज्यामध्यें एखाद्या प्रांताला प्रवेश न करण्याच्या नाविन्यपूर्ण तत्वाचा आगाऊच स्वीकार करणें म्हणजे हिंदी ऐक्याच्या कल्पनेवर कुऱ्हाडच घालण्यासारखें असून, त्यामुळें प्रांतांतून अडचणी वाढण्यास जास्तच मदत होईल. इतकेंच नव्हे तर जीं संस्थानें संयुक्त हिंदी राज्यामध्यें सामील होतील त्यांच्याहि मार्गांत अडचणी निर्माण होतील.

कॉंग्रेस ही हिंदी स्वातंत्र्य व ऐक्य यांचा पुरस्कार करणारी असून, नव्या जगामध्यें ज्या वेळीं लोक व्यापक फेडरेशन्सच्या दृष्टीनें विचार करीत आहेत त्यावेळीं त्या ऐक्यामध्यें दुही निर्माण करणें ही गोष्ट सर्वांच्याच दृष्टीनें विघातक असून तिची कल्पना देखील असह्य आहे. तथापि कॉंग्रेस कोणत्याहि प्रादेशिक घटकांमधील जनतेच्या इच्छेविरुद्ध संयुक्त हिंदी राज्यामध्यें रहाण्याची सक्ति करूं इच्छित नाहीं. एकच एक व सहकार्याच्या तत्वावर उभारलेल्या राष्ट्रीय जीवनाची जेणेंकरून उभारणी होईल अशी परिस्थिति निरनिराळ्या प्रादेशिक घटकांमध्यें निर्माण करण्याची आवश्यकता आहे असें वर्किंग कमिटीला वाटतें. ब्रिटिश सरकारच्या योजनेमध्यें जें तत्व ग्रथित करण्यांत आलें आहे त्याचा जर स्वीकार करण्यांत आला तर नवेच प्रश्न उपस्थित होतील आणि निरनिराळ्या प्रादेशिक घटकामधील निरनिराळ्या गटांवर दडपण येऊन सक्तीहि होईल. एका बलाढ्य संयुक्त राष्ट्रामधील प्रत्येक प्रादेशिक घटकाला शक्य तेवढी

स्वायत्तता दिली पाहिजे, असें वर्किंग कमिटीचें मत आहे. ब्रिटिश युद्धमंडळाच्या योजनेमध्यें यां संबंधीं जी तरतूद करण्यांत आली आहे तीमुळें संयुक्त हिंदी राज्याच्या प्रारंभापासूनच बाहेर रहाण्याच्या प्रवृत्तीस उत्तेजन मिळेल व तसे प्रयत्नहि केले जातील. त्याचा अपरिहार्य परिणाम असा होईल कीं, ज्या वेळीं परस्परसहकार्य आणि सदिच्छा यांचीच अतिशय जरूरी आहे, त्याच नेमक्या वेळीं त्याच दोन्ही बाबींचा अभाव दिसून येईल; एवढेंच नव्हे तर त्यामुळें प्रतिगामी राजकीय प्रवृत्तीस चिथावणी मिळून निरनिराळ्या जमातींतील अडथळे आणणाऱ्या गटांना अडचणी निर्माण करण्यास वाव मिळेल."

क्रिप्स योजना अशा रीतीनें सर्व पक्षांनीं फेटाळल्यामुळें ती योजना ब्रिटिश सरकारनें मागें घेतली आहे असें क्रिप्स यांनीं स्वदेशी परत जातांना जाहीर केलें. आपली योजना असफल झाली यामुळें उत्पन्न झालेल्या वैतागांत क्रिप्ससाहेबांनीं कांहीं असत्य विधानें केलीं व कांहीं दुगाण्याहि झाडल्या त्यामुळें उत्तरें प्रत्युत्तरें सुरू झालीं व हिंदी राजकारणांतील अगतिकतेचा पारा जास्तच वाढला. क्रिप्स येणार या जाहिरातीनें ज्या आशा निर्माण झाल्या होत्या त्या पार वितळून गेल्या. अशा अवस्थेंत एकाएकी मद्रासचे माजी मुख्यप्रधान व वर्किंग कमिटीचे एक प्रमुख सभासद चक्रवर्ती राजगोपाळाचारियर यांनीं मद्रास असेंब्ली आणि कौन्सिलमधील काँग्रेसपक्षीय सभासदांची सभा मद्रास येथें बोलावली व त्या सभेंत खालील ठराव स्वतः मांडून पास करून घेतला. या सभेस मद्रास असेंब्ली व कौन्सिलमधील एकूण १९१ काँग्रेसपक्षीय आमदारांपैकीं फक्त ५२ सभासद हजर होते. त्यापैकीं ३६ सभासदांनीं मतदानांत भाग घेतला व ठरावाला अनुकूल मत तर फक्त ३२ सभासदांनीं दिलें. तो ठराव खालीलप्रमाणें होता.

"प्रस्तुतच्या गंभीर प्रसंगी उद्भवलेल्या परिस्थितीस तोंड देण्यास हिंदुस्तान समर्थ व्हावा म्हणून राष्ट्रीय सरकार स्थापन करण्याचे प्रयत्न अयशस्वी ठरले व त्याचा परिणाम म्हणून हिंदुस्तानांतील राष्ट्रीय प्रवृत्तीची माणसें कोंडींत पडल्यामारखी झालीं आहेत म्हणून मद्रास काँग्रेस आम-

दार पक्षाला अत्यंत खेद होत आहे. शत्रु राष्ट्राच्या आक्रमणाच्या काळांत तटस्थतेच्या अथवा निष्क्रियतेच्या दृष्टीनें विचार करणें लोकांना अशक्य आहे; त्याबरोबरच संरक्षणाच्या सरकारी व्यवस्थेहून स्वतंत्र व त्यास अनुषंगिक–पूरक नसलेली परिणामकारक संरक्षण व्यवस्था संघटित करणेंहि व्यवहार्य नाहीं. या संकटाच्या कालांत चालू धोक्याला तोंड देण्यासाठीं राष्ट्रीय सरकार प्रस्थापित करण्याच्या मार्गांतील सर्व अडचणी, कॉँग्रेसनें तांतडीनें दूर करणें हें देशहिताच्या दृष्टीनें अतिशय जरूरीचें आहे आणि म्हणून ज्या अर्थी, या गंभीरतम राष्ट्रीय आपत्तीच्या क्षणी संयुक्तपणें राष्ट्रव्यापी कार्य करण्यासाठीं मुस्लिम लीगनें, संयुक्त हिंदुस्तानपासून कांहीं प्रदेशांचा वेगळा होण्याचा हक्क त्या प्रदेशांतील रहिवाशांची इच्छा समजून घेऊन आधीं मान्य करावा अशी अट घातली आहे त्याअर्थीं हिंदुस्तानच्या एकत्वाविषयीं वाद चालू ठेवण्यानें होणाऱ्या संशयित फायद्यासाठीं, या बिकट प्रसंगीं राष्ट्रीय सरकार स्थापन करण्याची संधि गमावणें हें असमंजसपणाचें धोरण होईल म्हणून व त्यांतल्यात्यांत हलकें संकट निवडणें आवश्यक झालें आहे म्हणून या पक्षाचें असें मत आहे व अखिल भारतीय कॉँग्रेस कमिटीला पक्षाची अशी शिफारस आहे कीं, हिंदुस्तानची राज्यघटना बनीवण्याच्या वेळींहि मुस्लिम लीगनें वेगळें होण्याचा आपला दावा तसाच चालू ठेवला तर कॉँग्रेसनें तो दावा मान्य करावा व अशा प्रकारें याबाबतच्या सर्व शंका आणि भय दूर करावें व चालू आणीबाणीच्या प्रसंगास तोंड देण्यासाठीं राष्ट्रीय सरकारची स्थापना करण्यासाठीं व तडजोडीच्या वाटाघाटी करण्यासाठीं मुस्लिम लीगला पाचारण करावें."

या ठरावानें चोंहींकडे कोलाहल माजला. वर्किंग कमिटींतील आपल्या सहकारी मित्रांना न विचारतां किंवा त्यांच्याशीं कोणत्याही प्रकारच्या वाटाघाटी न करतां राजाजींनीं वरील ठराव पास करून घेतल्यामुळें ऑल इंडिया कॉँग्रेस कमिटीची सभा बोलावणें आवश्यक झालें. क्रिप्स योजना व राजाजींचा ठराव हे मुख्य विषय या सभेपुढें चर्चेसाठीं होते. क्रिप्स-योजनेबाबत वर्किंग कमिटीनें जो निर्णय घेतला होता त्यास या सभेंत पाठिंबा देण्यांत आला. वर्किंग कमिटीवरील आपल्या जागेचा राजिनामा

पा. १३ 

देऊन राजाजींनीं आपला ठराव ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीपुढें मांडला. ठरावाच्या समर्थनार्थ राजाजी म्हणाले " पाकिस्तान तुमच्या हिताचें नाहीं असें मुस्लीमांना सांगून त्यांची खात्री पटविण्याचा प्रयत्न करण्याचा उपयोग नाहीं. आम्ही तुमच्यावर सक्ति करणार नाहीं, स्वयंनिर्णयाचा तुम्हांला हक्क आहे. ज्या प्रदेशांत मुस्लीमांची बहुसंख्या आहे तेथें आपलें सरकार बनविण्याचा हक्क त्यांना आहे असें आपण मुसलमानांना सांगू. कॉंग्रेसनें लीगला बोलावून याबाबत तडजोड करावी. "

डॉ. राजेंद्रप्रसाद यांनीं या ठरावाला विरोध केला. ते आपल्या भाषणांत म्हणाले " राजाजींच्या ठरावाचा मुख्य हेतु लीगचें सांत्वन करणें हा दिसत नाहीं. कसलें तरी प्रांतिक मंत्रिमंडळ बनविणें हा मुख्य हेतु दिसतो. दोन वर्षांपूर्वी देखील लीगशीं मिलाफ करण्याचा प्रश्न नव्हता. राष्ट्रीय सरकारच्या भाषेनंतरच हा प्रश्न उद्भवला आहे. राष्ट्रीय सरकार हें मृगजल आहे. त्याला अस्तित्व नाहीं. तें आम्हांला देऊं करण्यांत आलेलें नाहीं हें मला ठासून सांगितलें पाहिजे. अस्तित्वांतच नसलेल्या वस्तुमागून धांवणें व्यर्थ होय. मुस्लिम लीगची मागणी स्पष्ट नाहीं. ती अस्पष्ट आहे. फक्त हवेंतच आहे. मुस्लीम लीगला काय हवें याची स्पष्ट कल्पना देऊन लीगच्या मागणीविषयीं सविस्तर कल्पना मांडण्यास मी बॅ. जीनांना सांगितलें होतें. त्यांनीं लांबलचक पत्र पाठविलें पण त्यात उत्तर मुळींच नव्हतें. हिंदुस्तान हा युगानुयुगापासून एक व अखंड आहे. त्याचे तुकडे कधींहि होऊं शकणार नाहींत. पाकिस्तान जातीय प्रश्न सोडविणार नाहीं. त्यानें मुस्लीमांनाहि मदत व्हावयाची नाहीं. हिंदूंनाहि मदत व्हावयाची नाहीं. विभक्त झालेल्या प्रदेशांचे हित व्हावयाचें नाहीं. किंवा उरलेल्या हिंदुस्थानचेंहि हीत व्हावयाचें नाहीं. रडणाऱ्या मुलाची समजूत घालण्यासाठीं त्याला आपण खेळणें देतो. पाकिस्तान कांहीं तशाप्रकारचें खेळणें नव्हे. खुद्द जीनादेखील तसें म्हणणार नाहींत. पाकिस्तान हा जीवनमरणाचा प्रश्न आहे. "

" हिंदुस्तानांत वाढलेल्या व कार्य केलेल्या कोणाहि माणसाला पाकिस्तानची कल्पना दुःख देणारी आहे. कोणीहि सुजाण व समजुतदार माणूस

पाकिस्तानविषयीं समंजसपणें व सुजाणपणें विचार करूं शकेल कीं काय याची मला शंका आहे. भारतीय स्वातंत्र्यालाच विरोध असल्याखेरीज पाकिस्तानचा विचार कोणाहि माणसाला करतां यावयाचा नाहीं." अशा स्पष्ट शद्बांत पंडित जवाहरलाल नेहरूंनीं राजाजींच्या ठरावाला विरोध केला.

अखिल भारतीय काँग्रेस कमिटींत राजाजींचा हा ठराव १५ विरुद्ध १२० अशीं ठणठणीत मतें पडून नापास झाला. याच सभेंत श्री. जगत् नारायण यांचा खालील ठराव ९२ विरुद्ध १० अशा प्रचंड बहुमतानें पसार झाला.

"हिंदुस्थानातील कोणत्याहि भागास वा संस्थानास संयुक्त हिंदी राज्यांतून फुटून निघण्याचें स्वातंत्र्य देऊन हिंदुस्थानचे खंड पाडणारी कोणतीहि योजना निरनिराळ्या प्रांतांच्या व संस्थानांच्या जनतेच्या हितास अत्यंत विघातक आहे असें अखिल भारतीय राष्ट्रसभा समितीचें मत आहे. म्हणून काँग्रेस व राष्ट्र अशा कोणत्याहि योजनेचा स्वीकार करूं शकत नाहीं."

पंडित जगत् नारायण यांच्या वरील ठरावानें काँग्रेसचें पाकिस्तान-संबंधीचें धोरण स्पष्ट झालें आहे. हिंदुस्तानचें स्वातंत्र्य व अखंडत्व या दोन्हीहि गोष्टी राष्ट्रीय सभेला सारख्याच प्यार आहेत. व अखंड हिंदुस्तानच्या स्वातंत्र्यासाठींच राष्ट्रीय सभा सतत प्रयत्न करणार आहे हें पुन्हां एकदां जाहीर झालें. क्रिप्स वाटाघाटींचे वेळीं व त्यानंतरहि राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष मौलाना अझादच होते ही संस्मरणीय गोष्ट आहे. अखिल भारतीय राष्ट्रसभा समितीचा समारोप करतांना राष्ट्रपती मौलांना अबुल कलम अझाद यांनीं खालील महत्वाचें उद्गार काढलें.

"काँग्रेसमध्यें बरेच मुसलमान आहेत. परंतु काँग्रेसमध्यें एकहि मुसलमान, शीख अथवा ख्रिस्ती नसतांहि जोवर राष्ट्रीय भूमिका पत्करून काँग्रेस राष्ट्रहित बघतें तोंवर ती सर्व राष्ट्राची प्रतिनिधीभूत संस्था होय; वर्गीय किंवा जातीय नव्हे."

"पाकिस्तानच्या तपशिलाबाबत सर शिकंदरांना विचारलें तर ते एक सांगतात, जिनांना विचारलें तर ते भलतेंच सांगतात, राजाजींचा ठराव

 / जोशी गणेश

निराळेंच कांहीं सुचवितो. अशा परिस्थितींत काँग्रेससारख्या जबाबदार संस्थेनें पाकिस्तानची काय दखल ध्यावयाची ?"

"रामगड काँग्रेसच्या अध्यक्षीय भाषणांत मध्यवर्ती सरकार हिंदुस्तानांत एक असावें व प्रांतिक स्वायत्त घटक असें असावेत कीं, प्रांताच्या स्वायत्ततेंत मध्यसरकारला कमींत कमी हस्तक्षेप करतां यावा असें मी प्रतिपादिलें होतें."

"पाकिस्तान मुस्लीम धर्माविरुद्ध आहे. एखाद्या देशांत जेथें मुस्लीम बहुसंख्येनें रहातात तो भाग 'पाक' व इतर 'अपाक' असें म्हणणें योग्य नाहीं."

## ? : : : १४

सध्यां जगांत अत्यंत भयानक असें महायुध्द चालूं आहे. या महा-युध्दानंतर आपल्या कल्पनेला धरून आपण नवीन जग निर्माण करणार अशी घोषणा हिटलर, मुसोलिनी, टोजो, चर्चिल, रूझवेल्ट, आणि स्टॅलिन हे सर्वच करीत आहेत. जगाची पुनर्घटना करण्याचे बाबतींत महात्माजींच्याहि कांहीं खास कल्पना आहेत.

"लोकशाहि पध्दति ही राष्ट्राच्या अभ्युदयाला तारक नसून मारक आहे; प्रत्येक माणासाला त्याचा दर्जा, त्याचें शिक्षण, त्याची लायकी, त्यानें राष्ट्राकरितां केलेला त्याग वगैरे गोष्टी न पहातां त्याला मताचा अधिकार देणें ही गोष्ट तात्विक दृष्टया देखील चूक आहे. ज्यांनीं देशा-करिता महान् त्याग केला आहे ज्यांच्या हातीं देशाचें भवितव्य सुरक्षित आहे अशा एका पुढाऱ्याची निवडणूक करून त्याचें हातीं सर्व सत्ता देणें व त्यानें केलेले हुकूम बिनबोभाट पाळणें हेंच राष्ट्राच्या सौभाग्याच्या दृष्टीनें उचित आहे. पृथ्वीवर पुष्कळ मानववंश आहेत. पण ते गुणानें व बुद्धीनें सारखे नाहींत. आर्यवंश आहेत. पण ते गुणानें व बुद्धीनें

सारखे नाहींत. आर्यवंश हा श्रेष्ठ मानववंश आहे व आर्यवंशाचा प्रतिनिधि म्हणून जर्मनीला जगावर राज्य करण्याचा अधिकार आहे" असें नाझीवादाचें थोडक्यांत तत्वज्ञान आहे.

"खाजगी मालमत्ता समूळ नष्ट केली पाहिजे, सर्व उद्योगधंदे समाजाच्या मालकीचे झाले पाहिजे व जगावर कष्ट करणाऱ्यांचे म्हणजेच कामकरी व शेतकरी यांचें राज्य प्रस्थापित झालें पाहिजे. धर्माच्या पुराण्या कल्पनांतून बहुजनसमाजाची मुक्तता केली पाहिजे कारण ती एक त्यांना झोंपविण्याकरितां तयार केलेली अफूची गोळी आहे." असें थोडक्यांत समाजसत्तावादाचें म्हणणें आहे.

"स्वार्थासाठीं व्यक्तिस्वातंत्र्य, शाब्दिक रीतीनें फक्त राजकीय क्षेत्रांतील लोकशाहीला सहानुभूति आणि जगांतील आपलें महत्वाचें स्थान टिकविणें व तें टिकविण्याकरितां जें जें करावें लागेल तें तें करणें" हें इंग्लंड अमेरिकेचें धोरण आहे.

या तीन विचारसरणींचें सध्यां युध्द चालू आहे. महायुध्दांत कोणाला जय मिळतो यावर यांपैकीं कोणती विचारसरणी प्रभावी होणार हें अवलंबून आहे. महात्माजींचेहि जगाच्या पुनर्घटनेसंबंधीं खास विचार आहेत त्या विचारांचा अविष्कार हिंदी स्वातंत्र्यासाठीं चालू असणाऱ्या झगड्यांत होत आहे व होणार आहे. या सर्व जागतिक गोष्टींचा परिणाम पाकिस्तानच्या कल्पनेवर होणारा आहे. जगांतील इतर स्वतंत्र मुसलमान राष्ट्रें हीं सर्व मुसलमानांचे मिळून एक अधिराज्य स्थापावें व त्यांत आपल्या देशराष्ट्राच्या कल्पना नाहींशा कराव्यात या कल्पनेला बिलकुल अनुकूल नाहींत. तुर्कस्थान, अरबस्थान, अफगाणिस्तान, चीन मधील मुसल्मान, रशियांतील मुसल्मान या सर्वांना आपापलें राष्ट्र आणि त्याचें स्वातंत्र्य हेंच महत्वाचें वाटत आलें आहे.

यांत्रिक आणि आधिभौतिक प्रगतिमुळें धर्माचे प्राबल्य माणसांच्या व्यवहारांत दिवसेंदिवस रहात नाहींनासें झालें आहे. एकाच धर्माचे चीन व जपान प्राणपणानें एकमेकांशीं आज लढतांना दिसत आहेत. जर्मनी आणि इंग्लंड यांचाहि धर्म एकच आहे. रशिया तर धर्म माना-

यलाहि तयार नाहीं. अशा परिस्थितींत निराळा धर्म म्हणून निराळें राष्ट्र ही कल्पना टिकणारी नाहीं.

१९१४ ते १८ चें महायुद्ध संपल्यानंतर व्हर्सायच्या तहानें युरोपमध्यें बरींच लहान लहान राष्ट्रें मिर्माण केली. ही स्वतंत्र राष्ट्रें निर्माण करण्यांत जर्मनीला खच्ची करावें आणि जर्मनीच्या आजुबाजूला विरोधी राष्ट्रांचा गट निर्माण करावा हा इंग्लंड फ्रान्सचा हेतु: होता. इंग्लंडच्या नेहमींच्या पद्धतीस अनुसरून हा उघडा हेतु जगासमोर न मांडतां तो हेतु सिद्धीस जाईल अशा बेतानें स्वयंनिर्णयाचें व विकेंद्रीकरणाचें तत्वज्ञान निर्माण करण्यांत आलें. या गोंडस तत्वज्ञानाच्या जोरावर जर्मनीला खच्ची करून टाकण्याचा आपला हेतु इंग्लंड फ्रान्सनें साधून घेतला. या स्वयंनिर्णयाचें व विकेंद्रीकरणाच्या तत्वज्ञानानें पाकिस्तानला जन्म देण्यास सहाय्य केलें आहे. पण चालू महायुद्धानें हें विकेंद्रीकरणाचें तत्वज्ञान साफ चुकीचें आहे असें सिद्ध केलें आहे. संहारक यांत्रिक शक्तीच्या वाढीमुळें लहानशा स्वतंत्र राष्ट्राला स्वतःच्या बचावाची तयारी म्हणून आपला सर्व पैसा सारखा खर्च करावा लागेल व तो करूनहि संरक्षण होईल अशी बिलकुल खात्री नाहीं. अशी परिस्थिति प्राप्त झाली आहे. यामुळें या महायुद्धाचा अखेर शेवट कांहीहि झाला तरी यापुढें स्वतंत्र लहान राष्ट्र ही गोष्ट अशक्य होऊन बसली आहे. सर्व आशिया खंडाचें, सर्व युरोप खंडाचें एकीकरण करावें अशा कल्पना विचारवंतांच्या मनांत घोळत आहेत. अशा स्थितींत आहे या हिंदुस्तानचेंच दोन खंड पाडून पाकिस्तान निर्माण करणें कसें शक्य आहे ?

आमच्या मतें, स्पष्टच बोलायचें तर, मुसलमानांना, मुस्लिम लीगला, बॅ. जीनांना देखील पाकिस्तान अशक्य आहे ही गोष्ट ठाऊक आहे एवढेंच नव्हें तर त्यांना पाकिस्तान नकोहि आहे. आपल्या अतृप्त आकांक्षाना परिस्फुटता देण्यासाठीं त्यांनीं योजलेला तो एक परवलीचा शब्द आहे. हिंदुस्तानांत मुसलमानांचें अधिराज्य होतें. त्याच हिंदुस्तानांत आज मुसलमानांची दुर्दशा आहे. हिंदु बहुसंख्य आहेत, श्रीमान आहेत, धीमान आहेत, उद्यांच्या स्वतंत्र हिंदुस्तानांत त्यांच्याच हातीं सारी सत्ता

जाणार आहे; तेव्हां अज्ञ, अल्पसंख्य, दरिद्री मुसलमान समाजाचें काय होणार या भीतीनें गांगरून जाऊन मुस्लीम लीग आणि तिचे नेते बॅ. जीना यांनीं मारलेली आरोळी म्हणजे पाकिस्तान आहे.

पाकिस्तान प्रत्यक्षांत येण्यापूर्वी हिंदुस्तान स्वतंत्र होणें आवश्य आहे. ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या मगरमिठींतून पाकिस्तानच्या स्थापनेसाठीं कां होईना हिंदी स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं मुस्लीम लीग किंवा बॅरिस्टर जीना कोणते प्रयत्न करीत आहेत या प्रश्नाला ' कोणतेहि नाहींत ' हेंच उत्तर द्यावें लागेल. ब्रिटिश साम्राज्यशाही कायम ठेवून स्वतंत्र दर्जाचें पाकिस्तान कसें निर्माण करणार ? तेव्हां मुसलमानांना पाकिस्तान नको आहे हें आपण नीट ध्यानांत घेतलें पाहिजे. चक्रवर्ती राजगोपालाचारिअर यांनीं राष्ट्रीय सरकारच्या स्थापनेसाठीं पाकिस्तानची मागणी मान्य करावी असें प्रतिपादिलें व त्यासाठीं जोरदार प्रचारहि सुरू केला. हें सर्व चालू असतांहि बॅ. जीनांनीं याबद्दल एक चकार शब्दहि काढला नांहीं ही महत्वपूर्ण गोष्ट आहे. स्वतंत्र हिंदुस्तानांतील मुसल्मानांची सुरक्षितता ही पाकिस्तानच्या पाठीमागील प्रमुख भूमिका आहे. कोणताहि कागदी तह करून किंवा असेंब्ली, कौन्सिल, मध्यवर्ती कायदेमंडळ वगैरेंतील मुसलमानांचे संख्याप्रमाण ठरवून हा प्रश्न सुटणार नाहीं. हिंदु आणि मुसलमान यांच्यामधील दुही ही ब्रिटिश राजसत्तेला आवश्यक अशी गोष्ट आहे. त्यामुळें ब्रिटिश सरकारच्या राजवटींत हिंदूंनीं किंवा मुसल्मानांनीं कितीहि उदार धोरण स्वीकारलें तरी हिंदूमुस्लीम ऐक्य ही दुरापास्त गोष्ट आहे. पाकिस्तानाच्या मागणीसंबंधीं बिलकुल विचार न करतां स्वातंत्र्यासाठींच आपलें शक्तिसर्वस्व केंद्रीभूत करणें हाच मार्ग हिंदुस्तानचे स्वातंत्र्य व अखंडत्व या दोहोंसाठीं उपयोगी पडणारा आहे. स्वातंत्र्याच्या लढ्यांत हिंदु-मुसलमान मिळून जो महान् त्याग करतील त्या त्यागांतूनच हिंदुमुस्लीम ऐक्य सिद्ध होणार आहे. जो त्याग स्वातंत्र्य मिळवूं शकतो तोच त्याग हिंदुस्तानचे स्वयंभू अखंडत्व टिकविण्यास समर्थ होईल.

'हिंदुस्तानांतील हिंदू आणि मुसलमान दोघेंहि ब्रिटिशांचे गुलाम असतां आम्ही पाकिस्तान निर्माण होऊं देणार नाहीं त्यासाठीं अंतर्गत यादवी, झाली तरी परवडली ' वगैरे राणा भीमदेवी भाषा बोलणें सोईचे असलें तरी उचित नाहीं. सध्यांची ब्रिटिश गुलामगिरी ज्यांना खपतें त्यांनीं कल्पनेंतल्या पाकिस्तानविरुद्ध गिल्ला करणें सुसंबद्ध नाहीं.

ब्रिटिश राजनीतीचा डाव फोडा आणि झोडा हा उघडपणें असणारच. त्याला अनुसरून क्रिप्स-योजनेंत फेडरेशन होण्यापूर्वीच प्रांतांना बाजूला रहाण्याचा हक्क देण्यांत आला होता. तो हेतु काँग्रेसनें स्पष्ट शब्दांत नाकारला आहे. हिंदी स्वातंत्र्यासाठीं आणि हिंदी अखंडत्वासाठीं राष्ट्रीय सभा बांधली गेलेली आहे.

हिंदुस्तानच्या स्वातंत्र्यानेंच मुसलमानांची आजची दुर्दशा संपणारी आहे. मुसलमान अशिक्षित आहेत, मुसलमान मागासलेले आहेत, मुसलमान दरिद्री आहेत ही गोष्ट खरी आहे. आणि त्यामुळेंच बॅ. जीना-सारख्या माणसाला पाकिस्तानच्या आरोळीनें त्यांना झुलविणें शक्य झाले आहे. तेव्हां पाकिस्तानमुळें नव्हे तर हिंदुस्तानच्या स्वातंत्र्यामुळेंच आपलें अज्ञान, आपलें दारिद्र्य जाणार आहे अशी मुस्लीम जनतेची खात्री करून देतदेतच हिंदी स्वातंत्र्यासाठीं हिंदुमुस्लीम बहुजनसमाजाची प्रचंड त्याग-पूर्ण चळवळ सुरू करणें आणि त्यासाठीं उभय समाजाची अभेद्य संयुक्त आघाडी निर्माण करणें हाच पाकिस्तानवरील खरा उतारा आहे.

**समाप्त**

प्रति १०५ ८८७३८ राज ५८ भवानी पेठ

## कांही संदर्भ ग्रंथ.

1 Thoughts on Pakistan - Dr. B.R. Ambedkar
2 Hindus & Muslims of India - Atulanand Chakrabarti
3 Enlist India for Freedom - Edward Thompson
4 Pakistan - Dr. Rajendraprasad
5 The Hindu Muslim Question - Beni Prasad
6 India's Problem of Her Future Constitution - M. A. Jinnah
7 Pakistan - Adabistan - Delhi
8 Muslim Problem in India - Syed Abdul Latif
9 Problem of Minorities - Dr. Krishna
10 Gandhi-Muslim-Conspiracy - A. J. Karandikar

नगर वाचनालय
ता.